◆ मे २००६
◆ वर्ष सहावे
◆ अंक पाचवा

# मेहता मराठी ग्रंथजगत

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | ४ |
| **साहित्यवार्ता** | ९ |
| **दखल** | ३० |
| **तसलिमा मुलाखत** | ३२ |
| **वाचनवेडा राजाराम** | ३६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **मोहिनी** : पारू मदन नाईक | ४५ |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** अनु. सुप्रिया वकील | ५४ |
| **केतकरवहिनी :** उमा कुलकर्णी | ६० |
| **चला जाणून घेऊ या!** | |
| **साधंसुधं :** प्रमोदिनी वडके-कवळे | ७४ |
| **पुरस्कार** | ८० |
| **श्रद्धांजली** | ९६ |
| **बालनगरी** | १०० |

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
अनिरुद्ध पाटील

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी :
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-३०.
फोन : २४४७६९२४ फॅक्स :०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**
**Website - mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १०० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व ५ वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

## संपादकीय

### ‘द दा विंची कोड’वरील खटल्याचा महत्त्वपूर्ण निकाल

चार कोटी प्रतींचा विक्रमी खप आणि किमान २० कोटी डॉलर्स (८८० कोटी रुपयांची) कमाई करणाऱ्या ‘द दा विंची कोड’ या कादंबरीवरील वाङ्मयीन चौर्याचा आरोप न्यायालयाने फेटाळून लावल्याने अनेक लेखक-प्रकाशकांना हायसे वाटणे स्वाभाविक आहे.

डॅन ब्राऊनच्या या कादंबरीने गेली तीन वर्षे ‘बेस्टसेलर’ म्हणून खपात आघाडी घेतली आहे. या पुस्तकाच्या लेखक-प्रकाशकावर वाङ्मयचौर्याचा आणि कॉपीराईट कायद्याच्या उल्लंघनाचा खटला भरण्यात आला होता; त्या खटल्याचा निकाल ७ एप्रिलला लागला आणि डॅन ब्राऊनला या आरोपातून लंडनच्या उच्च न्यायालयाने मुक्त केले. लंडन हायकोर्टाचा हा निवाडा दूरगामी महत्त्वाचा आहे असे मानले जाते. कारण, हा निवाडा डॅन ब्राऊनच्या विरुद्ध गेला असता तर कोणत्याही कल्पनेचा किंवा कलाकृतीतील आशयाचा कालांतराने अन्य कोणत्या लेखकाने वापर करणे म्हणजे वाङ्मयचौर्य असे नवे सूत्र कायद्याच्या परिभाषेत वैध ठरले असते आणि आजवरच्या अनेक कलाकृतींच्या निर्मात्यांनाही त्याची झळ पोहोचली असती. एखाद्या कल्पनेवर निर्मात्याचा हक्क असतो हे खरे; पण ती कल्पना विशद करणे किंवा विकसित करणे हेही कॉपीराईट कायद्याच्या कक्षेत येते असे तत्त्व स्वीकारावे लागले असते.

१९८२ साली प्रसिद्ध झालेल्या ‘द होली ब्लड अँड द होली ग्रेल’ या संशोधनपर प्रबंधातील प्रमेयांचा वापर डॅन ब्राऊनच्या ‘विंची कोड’मध्ये केला गेला आहे आणि हे कृत्य वाङ्मयचौर्य व कॉपीराईट कायद्याच्या उल्लंघनाचे आहे असा आरोप करण्यात आला होता. या दोन पुस्तकांमध्ये येशू ख्रिस्ताचा मृत्यू सूळावर चढवल्याने झाला नाही, त्याला क्रूसावर चढवल्याचे नाटक केले गेले आणि तेथून पळण्याची संधी दिली गेली. त्यानंतर त्याने मेरी मॅगडालेन हिच्याशी लग्न केले; त्याला मुलगा झाला आणि त्याचा वंश पुढे फोफावत राहिला. ही वस्तुस्थिती गुप्त ठेवण्यात आली. आणि त्या वंशजाबाबत गुप्तता पाळणारा तसेच त्याचे संरक्षण करणारा एक पंथच निर्माण झाला. पिढ्यानुपिढ्या ही गोष्ट गुप्तपणे संक्रमित होत राहिली.

डॅन ब्राऊनने आपल्या पुस्तकाचे वास्तूशिल्प जसेच्या तसे उचलले आहे, असा आरोप मायकेल बॅजेन्ट आणि रिचर्ड प्ले यांनी केला होता. या पुस्तकाची विक्री चांगली झाली होती; पण ती बेस्टसेलरच्या यादीत झळकावी इतकी मोठी नव्हती. ‘द दा विंची कोड’चा तीन वर्षांत चार कोटी प्रतींचा खप झाला– त्यापुढे हा खप काहीच नाही हेही त्यांनी मान्य केले. डॅन ब्राऊनने न्यायालयात सांगितले की ‘द होली ब्लड अँड द होली ग्रेल’ या पुस्तकातील तसेच इतर काही पुस्तकातील कल्पनांची दखल आपण घेतलेली आहे; पण त्या कल्पना केवळ तर्काच्या पातळीवरच्या आणि इतिहास संशोधनाचा दावा करणाऱ्या आहेत. त्या तर्कावर वा ऐतिहासिक भूमिकेवर आधारून कल्पनारम्य कादंबरीची रचना करणे हे सर्वस्वी प्रतिभेचे काम आहे; आणि ते काम उत्तम प्रकारे झाल्यामुळेच ‘द विंची कोड’ला वाचकांनी उचलून धरले, त्यामुळे वाङ्मयचौर्याचा किंवा कॉपीराईट कायद्याच्या उल्लंघनाचा अशा प्रकारचा आरोप होणे सर्वथा अप्रस्तुत आहे.

लंडन हायकोर्टाने निकालात म्हटले की, डॅन ब्राऊनने जी कल्पना वापरली तिच्याबद्दल कायदेशीरदृष्ट्या काही कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. इतिहास संशोधन व सत्यप्रस्थापनेसाठी मांडण्यात आलेल्या कल्पनेचा काही भाग डॅन ब्राऊनने वापरला हे खरे असले तरी अशी निर्मिती करताना लेखक कलावंत आपली प्रतिभा वापरून तिला वेगळेच रूप देतात.

पूर्वसुरींनी केलेल्या संशोधनाद्वारे काढण्यात आलेल्या निष्कर्षांचा वापर करण्याचा, त्याचे खंडन-मंडन करण्याचा पूर्ण अधिकार अभ्यासकांना व पुढच्या पिढ्यांना आहे. वाचक-अभ्यासकांना तो अधिकार नाकारला गेला तर ज्ञानक्षेत्रात कोणालाच दुसऱ्याच्या कल्पनांचा वापर करणे अशक्यप्राय ठरेल.

हार्वर्ड विद्यापीठातील रॉबर्ट लँगडन या नामवंत सिम्बॉलॉजिस्ट प्राध्यापकाला पॅरिसच्या लूव्हरे संग्रहालयातील ‘द विंची’च्या कलाकृतींशी संबंधित धार्मिक गुप्त खुणांचा– प्रतीकांचा उलगडा करण्यासाठी पाचारण करण्यात येते. गुप्त लिपीचा किंवा खुणांचा शोध घेताना त्याला मानवी इतिहासातील एका महान अशा रहस्याचा शोध लागतो आणि हे कळल्यावर एका गुप्तपंथीयाच्या प्रेरणेने त्याच्यामागे मारेकऱ्यांचा ससेमिरा लागतो, अशी रोमांचकारक कथावस्तूची चौकट स्वीकारून डॅन ब्राऊनने वास्तववादी चित्तथरारक कथानकाची उभारणी केली आहे. पॅरिसमधील वातावरण, तेथील म्युझियम्स, स्थळे, कागदपत्रे, पेंटिंग्ज हे सर्व वास्तववादी व वस्तुनिष्ठ आहे. म्युझियममधील पेंटिंग्ज आजही सर्वांना बघायला मिळू शकतात असा खुलासाही त्याने केला आहे.

युरोपातील ‘द प्रिओरी ऑफ सायन’ ही गुप्त संघटना इ.स. १०९९ मध्ये स्थापन करण्यात आली; आणि तिचे सदस्य आजही गुप्ततेची शपथ पाळत आलेले आहेत. १९७५ मध्ये पॅरिसच्या ‘बिबिल ओथेक नॅशनल’ या संस्थेला सापडलेल्या कागदपत्रांवरून या पंथाची माहिती मिळाली आणि त्या पंथाच्या सदस्यांमध्ये सर आयझॅक न्यूटन, व्हिक्टर ह्युगो, लिओनार्दो द विंची वगैरे

नामवंत व्यक्तींचा समावेश होता हेही स्पष्ट झाले. या पंथाची कार्यपद्धती, दीक्षाविधी यांचा कादंबरीत अचूक व यथार्थ वापर केला गेला आहे असे डॅन ब्राऊन आरंभीच नमूद करतो.

रहस्याचा जो भाग या कथानकात केंद्रस्थानी आहे तो असा की येशू ख्रिस्त हा क्रूसावर बळी गेला हा जो समज आहे तो चूक आहे. सुळावरून त्याला उतरवण्यात आले तेव्हा तो मेलेला नव्हता, ग्लानीत होता. त्याला शुद्धीवर आणले जाते आणि वाचवण्यात येते. पुढे तो 'मेरी मॅगदलेन'शी लग्न करतो, संसार थाटतो, त्याला मुलगा होतो. त्याचा वंश आजतागायत चालू आहे. आणि त्या वंशाशी इमानदार राहणारा व त्याबद्दल गुप्तता पाळणारा ख्रिश्चन धर्मगुरूंचा एक पंथ स्थापन होतो. ख्रिस्ती धर्म व ख्रिश्चॅनिटी यांच्या मूळ पायालाच सुरुंग लावणारी ही घटना आहे. 'द लास्ट सपर' या लिओनार्दो द विंचीच्या पेंटिंगमध्ये मेरी मॅगदलेन ही पुरुषी वेषात आहे असेही सुचवण्यात आले आहे.

१९८२ साली प्रसिद्ध झालेल्या 'होली ब्लड अँड होली ग्रेल' या माहितीपर संशोधनात्मक पुस्तकात या दोन कल्पना मांडण्यात आल्या आहेत. त्या पुस्तकांच्या तीन लेखकांपैकी 'रिचर्ड प्ले' आणि 'मायकेल बेजेन्ट' या दोघांनी 'डॅन ब्राऊन'ने या कल्पना चोरल्या आणि कॉपीराईट कायद्याचा भंग केला असा आरोप केला. त्यासाठी लंडनच्या न्यायालयात खटला भरला. केवळ 'डॅन ब्राऊन'लाच नव्हे तर 'रँडम हाऊस' या प्रकाशनसंस्थेलाही आरोपीच्या पिंजऱ्यात लोटले. योगायोगाची गोष्ट अशी की 'होली ब्लड होली ग्रेल'चे प्रकाशनही याच प्रकाशनसंस्थेने केले आहे. २७ फेब्रुवारीला खटला सुनावणीला आला. २८ फेब्रुवारीला डॅन ब्राऊनने न्यायालयात हा आरोप नाकारला. जीझसने मेरी मॅगदलेनशी लग्न केले आणि त्यांचे वंशज आजही विद्यमान आहेत, ही कल्पना कॉपीराईटच्या कक्षेत येत नाही असे डॅन ब्राऊनतर्फे वकिलांनी स्पष्ट केले. ४ मार्च रोजी 'विंची कोड' ही कादंबरी आहे, वाङ्मयीन निकषावर तिचे मूल्यमापन व्हावे असा मुद्दा मांडला. कॅथॉलिकाच्या वतीने जीझस-मेरी विवाह आणि वंशसातत्य ही कल्पना बदनामीकारक पाखंडी आहे असे सांगण्यात आले तसेच आणखी काही साक्षीदार तपासण्यात आले.

७ एप्रिलला लेखक व प्रकाशक या दोहोंना कॉपीराईट कायद्याचा भंग केल्याच्या आरोपातून मुक्त करण्यात आले. हा खटला निवडक अशा काही कल्पना व घटना यावर उभा केला आहे, कॉपीराईट कायद्याचा भंग झाला असा आरडाओरडा करणे गैर आहे, असे न्यायाधीशांनी निकालपत्रात नमूद केले.

कल्पनांचे किंवा सत्यघटनांचे संरक्षण हे कॉपीराईट कायद्याच्या कक्षेत येत नाही. त्यासाठीच 'काल्पनिक' व 'माहितीपर' (फिक्शन आणि नॉनफिक्शन) हे प्रकार पाडले जातात. एकच कल्पना, वेगवेगळ्या प्रकारे लेखक हाताळू शकतो, तशा अनेक कादंबऱ्या असू शकतात आणि लेखकांना अशा प्रकारचे आविष्कार



स्वातंत्र्यही असते असे या निकालपत्रात म्हटले आहे.

ऐतिहासिक साहित्यातून आपल्याला हव्या त्या कल्पना मुक्तपणे घेण्याचे स्वातंत्र्य कादंबरीकाराला असायलाच हवे. त्यासाठी त्याला न्यायालयात खेचून त्याच्या प्रतिभेवर शिंतोडे उडवण्यात येऊ नयेत असे डॅन ब्राऊनने निकाल ऐकल्यावर प्रतिपादन केले.

'रँडम हाऊस' या प्रकाशनसंस्थेला या निकालाने मोठाच दिलासा मिळाला कारण निकालाच्या दिवशीच 'द दा विंची कोड'ची पाच लाख प्रतींची नवी पेपरबॅक आवृत्ती काढण्यात आली. 'द होली ब्लड अँड होली ग्रेल'च्या प्रतींनाही चांगली मागणी आहे.

**काही महत्त्वपूर्ण नोंदी :**

* मार्च २००३ मध्ये 'द दा विंची कोड'ची पहिली आवृत्ती बाजारात आली.

* हार्डकव्हर आवृत्तीच्या केवळ अमेरिकेत १ कोटी २० लाख प्रती विकल्या गेल्या आहेत.

* पेपरबॅक धरून ४ कोटी ३० लाख प्रती आजवर जगभरात विकल्या गेल्या आहेत.

* 'द दा विंची कोड'चे आजवर ४४ भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.

* या पुस्तकावर टीका करणारी सुमारे १२ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. ख्रिश्चन इतिहास, फ्रेंच लोकसाहित्य, कलासमीक्षा याचा डॅन ब्राऊनने ज्या प्रकारे वापर वा गैरवापर केला त्यावर अनेकांनी हल्ला चढवला आहे.

* कटकारस्थानांना केंद्रिभूत धरून कथावस्तूची उभारणी करणाऱ्या कादंबऱ्यांच्या लेखनाला या पुस्तकामुळे जोरदार चालना मिळाली आहे. उदा. 'द लास्ट टेम्पलर', न्यूयॉर्क टाईम्सच्या बेस्ट सेलर लिस्टमध्ये या प्रकारच्या तीन थरारकथांची वर्णी लागली आहे.

* या कादंबरीवर आधारित चित्रपट 'रॉन होवार्ड' व 'टॉम हॅक्स' हे तयार करत असून तो १९ मे रोजी प्रदर्शित होणार आहे. कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये तो १७ मे रोजी दाखवला जाईल. या चित्रपटासाठी १२.५ कोटी डॉलर्स खर्च आला आहे.

* न्यूयॉर्क टाईम्सच्या बेस्ट सेलर यादीत 'द दा विंची कोड' १५५ आठवडे अविरतपणे येत आहे. ५४ वेळेस ते प्रथम क्रमांकावर होते.

* अमेरिकेतील २३,३७४ बुकस्टोअर्समध्ये या पुस्तकाचा विशेष डिस्प्ले १९ मे रोजी करण्यात येईल, त्यासाठी २८ हजार कार्डबोर्ड कटआऊटस् तयार करण्यात आले आहेत.


* कॅथॉलिक बिशप्सनी ही www.jesusdecoded.com वेबसाईट तयार केली असून या थरारकथेतील कल्पनांवर हल्ला चढवलेला आहे. याच नावाची

डॉक्युमेंटरी टेलिव्हिजनवर दाखवण्यात येत आहे.

'द दा विंची कोड' या पुस्तकाच्या यशाचे करावे तेवढे कौतुक थोडेच ठरेल. 'हॅरी पॉटर'शी तुलना करता येईल असे हे यश आहे. या थरारकथेची एकूणच रचना अशा काही कौशल्याने केली गेली आहे की पहिली काही पाने वाचून झाल्यावर पुढे काय याची उत्सुकता क्षणभरही सैलावत नाही. गुप्त संदेश- गुप्त लिपी- त्यातून मिळणारे संकेत, त्या संकेतांचा लागणारा अन्वयार्थ– हे सारे वाचकाला चक्रावून सोडते.

जागतिक ग्रंथव्यवहारात आपला ठसा उमटवणाऱ्या लेखकात डॅन ब्राऊनने स्थान पटकावले आहे. यापूर्वी त्याची डिजिटल फोर्ट्रेस, एंजल्स अँड डेमन्स, डिसेप्शन पॉईंट ही पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. न्यू हॅम्पशायरमध्ये त्याचे वास्तव्य असते. त्याला प्रसिद्धीचा सोस नाही. लोकांमध्ये मिसळणे त्याला आवडत नाही.

कादंबरी म्हणून 'द दा विंची कोड' महान आहे किंवा महत्त्वाची आहे असे म्हणणे अवघड आहे. परंतु ख्रिस्ती धर्मीयांच्या जिव्हाळ्याच्या एका विषयाची रहस्यपूर्ण मांडणी करणारे नाट्यपूर्ण कथानक उभे करून वाचकांच्या पसंतीत तिने अग्रक्रम मिळवून आपली पताका गेली तीन वर्षे उंच फडकावत ठेवली आहे ही वस्तुस्थिती आहे खरी!





सध्या जगभरात गाजत असलेली डॅन ब्राऊन यांची खळबळजनक कादंबरी लवकरच मराठीत...!

**द दा विंची कोड**

डॅन ब्राऊन

अनुवाद : अजित ठाकूर




# साहित्यवार्ता

### * रणजित देसाईंच्या स्मृती 'प्रभुछाये'त जपणार

स्थानिक पातळीवरील राजकीय विरोधामुळे 'स्वामी'कार रणजित देसाई यांच्या स्मारकाची राज्य सरकारची योजना सध्या बारगळली असली तरी त्यांचे कुटुंबीय देसाई यांच्या कोवाड येथील वास्तूचे जतन करणार आहेत, असे त्यांच्या कन्या पारु मदन नाईक यांनी स्पष्ट केले.

रणजित देसाई यांनी ३६ दर्जेदार पुस्तकांची निर्मिती केली. त्यांचा सन्मान म्हणून कोवाडला चार एकरांची जागा राज्य सरकारने देऊ केली. मात्र स्थानिक राजकारणामुळे तेथे स्मारक होऊ शकले नाही.

देसाई यांचे वडिलोपार्जित घर गेली ३०० वर्षे सुस्थितीत असून २५ एकर जागेवरील ही वास्तू त्यांची आठवण म्हणून जतन केली जाणार आहे. देसाई यांचे ग्रंथालय, वाचनालय, त्यांचे संदर्भ ग्रंथ, दुर्मिळ वस्तू असा बराच संग्रह याच वास्तूत आहे.

देसाई यांच्या 'प्रभुछाया' या घरात तीन हजार ग्रंथ आहेत. शिवाजी व पुणे विद्यापीठांतील तीन जणांनी देसाई यांच्या साहित्यकृतींवर पीएचडी मिळवली.

देसाई यांना लहानपणापासून ओळखणाऱ्या विजया राजाध्यक्ष यांनी म्हटले की देसाई यांच्या लिखाणाला समकालीन संदर्भ असल्यामुळे ते कधीच जुने होणार नाही.

### * सुलोचनादीदींचे 'आत्मकथन'

ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनादीदी यांच्या अनुभवावर आधारित 'साधी माणसं' हे आत्मकथन त्यांच्या कन्या आणि 'नाथ हा माझा'च्या लेखिका कांचन काशीनाथ घाणेकर शब्दबद्ध करीत आहेत. हे लिखाण या वर्षाअखेरीस पूर्ण होईल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पुढील वर्षी ते 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फे प्रकाशित करण्याचा मानस आहे.

## * लहानग्या अनुषाची काव्यप्रतिभा

अनुषा गांधी या सात वर्षांच्या पुणेकर मुलीचा बालगीतलेखनासाठी सेल्बी कौंटीच्या महापौर ए. सी. वार्टन यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अनुषा सध्या अमेरिकेतल्या फार्मिंग्टन एलिमेंटरी स्कूलमध्ये दुसरीत शिकत आहे. अनुषाची काव्यप्रतिभाही विलक्षण आहे. तिने लिहिलेले 'आय वंडर व्हाय' हे गीत आता केवळ तिच्या शाळेपुरते मर्यादित राहिले नाही. राज्य पातळीवर सर्वोत्तम बालगीत म्हणून ते निवडण्यात यावे, अशी शिफारस सेल्बी कौंटीच्या महापौर ए. सी. वार्टन यांनी केली आहे. अनुषाचे वडील अजय गांधी यांनी १९८६ ची विम्बल्डन बॅडमिंटन चॅम्पियनशिप जिंकली होती, तर आई स्वाती अमेरिकेत इंडस्ट्रीयल इंजिनियर आहे.

आय वंडर व्हाय...
'आय वंडर व्हाय'
आय वंडर व्हाय
बर्डस् कॅन फ्लाय
ॲण्ड व्हाय डू बेबीज क्राय!
आय वंडर व्हाय
ट्रीज कॅन नॉट टॉक
ॲण्ड व्हाय हाउसेस कॅन नॉट वॉक!
आय वंडर व्हाय
द सन सेट
ॲण्ड व्हाय लायन्स कान्ट बी पेट!
आय वंडर व्हाय
द ग्रास इज ग्रीन
ॲण्ड व्हाय कान्ट एअर बी सीन!!

## * भारदे यांच्या भाषणांचा ग्रंथ प्रकाशित

गांधीवादी नेते व अध्यात्मवादी विचारवंत बाळासाहेब भारदे यांची विधिमंडळातील निवडक भाषणे व लेख ग्रंथरूपाने प्रकाशित झाल्याने त्यांचे विचार नव्या पिढीला मार्गदर्शक ठरतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी प्रकाशन समारंभात बोलताना केले.

या वेळी विधानसभेचे अध्यक्ष बाबासाहेब कुपेकर यांनी भारदे यांचा ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व असा उल्लेख केला. या ग्रंथामुळे लोकशाही अधिक सक्षम होईल असा विश्वास विधानपरिषदेचे सभापती शिवाजीराव देशमुख यांनी व्यक्त केला.



## * मराठी संस्कृती जपण्याचे मोठे आव्हान– कुमार केतकर

इंग्रजी भाषा आपल्याला आली पाहिजे, परंतु मराठीला विसरता कामा नये. इंग्रजी भाषा व्यक्तीची समृद्धी वाढवते. मात्र संस्कृती वाढवू शकत नाही. कारण संस्कृती मातृभाषेतून येत असते. मराठी टिकली नाही, तर संस्कृती आणि वर्तमानपत्रेही टिकणार नाहीत. त्यामुळेच मराठी संस्कृती जपण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर आहे, असे प्रतिपादन 'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर यांनी केले.

श्रीरामपूर नगर परिषदेच्या लोकमान्य टिळक वाचनालय आणि सांस्कृतिक विभागामार्फत आयोजित वसंतराव देशमुख स्मृती जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार वितरण सोहळ्यात श्री. केतकर बोलत होते.

श्री. केतकर म्हणाले, ''वर्तमानपत्रे आणि व्यापार देशाच्या एकत्रीकरणाचे सर्वात मोठे माध्यम आहे. पूर्वी दूरचित्रवाणी वाहिन्या नव्हत्या. आता मात्र विविध वाहिन्या एकच बातमी दिवसातून शंभर वेळा दाखवितात. त्यातही विशेष म्हणजे आतापर्यंतची कोणतीही मराठी वाहिनी ही मराठी माणसाने आणलेली नाही.''

मराठी भाषेचे महत्त्व विशद करताना ते म्हणाले की, आपली मराठी मुले अमेरिकेत जाऊन समरस होताना दिसतात. मात्र आपल्याच देशातल्या काही राज्यांत गेल्यावर त्यांना भाषासंवाद साधता येत नाही.

देशातल्या पंधरा टक्के लोकांना इंग्रजी भाषा येते. मात्र, त्यांचा प्रभाव उर्वरित ८५ टक्के इतर भाषकांवर पडतो, म्हणून केवळ इंग्रजीला शरण जाणेही योग्य नाही. असे असले, तरी इंग्रजीसह किमान तीन भाषा आपल्याला आल्या पाहिजेत. इंग्लंडच्या लोकसंख्येच्या दुप्पट आपल्या देशातील मराठी भाषकांची लोकसंख्या आहे. तरीही ज्यांना आपली भाषा माहीत नव्हती त्यांनी येथे येऊन राज्य केले. संवादासाठी इथली भाषा शिकण्याच्या खुबीमुळेच ब्रिटिशांना ते शक्य झाले. ज्ञानाची साधना कशी करायची याचा धडाच त्यांनी घालून दिला.

वर्तमानपत्रे व पत्रकारिता टिकायची असेल, तर मराठीसह इंग्रजीही यायला पाहिजे. ज्ञानपरंपरा रुजविण्याचे उत्तम संस्कार वर्तमानपत्रांतून होतात. पूर्वी वर्तमानपत्र दोन-अडीच तास वाचले जायचे. आता दूरदर्शनवर खूप काही बघायला मिळत असल्याने वर्तमानपत्रे दहा-पंधरा मिनिटांत वाचून होतात. दूरदर्शन पाहण्यासाठी साक्षरतेचीही गरज नसते. आताचा नवशिक्षित वाचन करतो. मात्र, सुशिक्षित दूरदर्शन बघण्यात वेळ घालवून निरक्षरतेकडे झुकत आहे. अशा स्थितीत वर्तमानपत्रांनी समाजाशी बांधिलकी सोडली, तर आपले जीवन आपण विसरून जाऊ, असे सांगून श्री. केतकर यांनी पुरस्कार विजेते बाळासाहेब तनपुरे यांच्या पत्रकारितेचा गौरव केला.

## * मराठी गजला ब्रेल लिपीत!

गझल मैफिलीमध्ये अंध रसिकांचे खुललेले चेहरे पाहून भीमराव पांचाळे यांना मराठी गझलांचा संग्रह ब्रेललिपीत आणण्याची कल्पना सुचली. गझल सागर प्रतिष्ठान तर्फे भारतीय भाषांतल्या गझला प्रथमच ब्रेल लिपीत येतील.

विजय आव्हाड हे कसदार अंध गझलकार मझल शेख यांच्यासोबत अंध रसिक गझल सागर प्रतिष्ठानच्या मैफिलींना नेमाने हजेरी लावतात. रसिकांना महाराष्ट्रातल्या नव्याजुन्या निवडक १०० गझलांची ओळख व्हावी, हा यामागचा हेतू आहे. त्यासाठी गझलकारांनी आपल्या पाच गझला २०२, नेहा सोसायटी, प्लॉट नं. १०४, गोराई २, मुंबई ४०००९२ या पत्त्यावर पाठवाव्या असे आवाहन केले आहे.

## * साहित्यिक-वाचक दुवा बनण्याचा क्रॉसवर्डचा प्रयत्न

क्रॉसवर्ड-हच साहित्य पुरस्कारांमुळे भारतीयांचे इंग्रजी साहित्य जगभरातील वाचकांपर्यंत पोचण्यास मदत होईल, साहित्यिक आणि वाचक यांच्यातील दुवा बनण्याचा प्रयत्न असल्याचे क्रॉसवर्ड बुक स्टोअर्सचे कार्यकारी संचालक आर. श्रीराम यांनी सांगितले.

सलमान रश्दी यांच्या बहुचर्चित 'शालिमार द क्लाउन' या पुस्तकास हच क्रॉसवर्ड बुक अॅवॉर्ड २००५ जाहीर झाले असून भारतीय लेखकांमध्ये कृष्णा सोबती यांच्या 'द हार्ट हॅज इटस् रिझन्स' पुस्तकाचा अनुवाद, तसेच सुकेतु मेहता यांच्या 'मॅक्झिमम सिटी : बॉम्बे लॉस्ट अॅण्ड फाउंड' या पुस्तकांचाही त्यात समावेश असल्याचे क्रॉसवर्डच्या पुणे कार्यालयाकडून सांगण्यात आले.

'द हार्ट हॅज इटस् रीझन्स' या पुस्तकाच्या मूळ लेखिका कृष्णा सोबती, तसेच अनुवादिक रिमा आनंद आणि मीनाक्षी स्वामी यांनी हा पुरस्कार नुकताच स्वीकारला आहे. भारतीय भाषांमधील साहित्यकृतींचे परीक्षण प्रसिद्ध मराठी कवी समीक्षक दिलीप चित्रे तसेच सुकांता चौधरी आणि पॉल झकारिया यांनी केले. पुरस्कार वितरणासाठी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात एसएमएसद्वारा पॉप्युलर पुस्तकासाठी राहुल भट्टाचार्य यांच्या 'पंडित्स फ्रॉम पाकिस्तान' या पुस्तकाची निवड करण्यात आली.

प्रसिद्ध रंगकर्मी विक्रम कपाडिया, अनाहिता ओबेरॉय, रोहन इंजिनिअर, किटू गिडवानी आणि कविता शर्मा यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. निवड समितीच्या परीक्षकांपैकी नीलांजना एस रॉय, गीता डॉक्टर, मुकुंद पद्मनाभन, उर्वशी बुटालिया आणि हर्ष सेठीही उपस्थित होते.

## * दृक-श्राव्य कार्यक्रमातून व्यंकटेश माडगूळकरांचा जीवनप्रवास

व्यंकटेश माडगूळकर प्रतिष्ठानतर्फे ५ एप्रिलला 'तात्या- प्रवास एका लेखकाचा' हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे संपन्न झाला. तात्यांच्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



अध्यक्ष डॉ. शरच्चंद्र गोखले आणि ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक प्रमुख पाहुणे होते. या वेळी दृक-श्राव्य कार्यक्रमातून तात्यांचे जीवनदर्शन घडविण्यात आले. मृणाल कुलकर्णी, सचिन खेडेकर, किशोर कदम, प्रकाश इनामदार आणि निळू फुले या कार्यक्रमात सहभागी झाले होते. कार्यक्रमाची संकल्पना, नेपथ्य आणि दिग्दर्शन राहुल सोलापूरकर यांचे होते; डॉ. समीर कुलकर्णी यांनी लेखन केले होते. चित्रकार शरद कापूसकर, रविमुकुल यांचेही योगदान या कार्यक्रमास लाभले होते.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या चित्रांचे प्रदर्शनही 'आर्ट टुडे' येथे आयोजिण्यात आले होते. ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. गो. मा. पवार अध्यक्ष होते.

## * १ कोटी २० लाख रुपयांचा ग्रंथालयाचा निधी वळविला

एकाही नव्या ग्रंथालयाला मान्यता न देता किंवा दर्जात बदल न करता एक कोटी २० लाख रुपयांची तरतूद राज्य सरकारने कलासंचालनालय आणि तंत्रशिक्षण विभागाकडे वळती केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाने सरकारच्या या कृतीचा तीव्र निषेध केला आहे. यामुळे किमान एक हजार गावे ग्रंथालयांपासून वंचित राहण्याची शक्यता आहे.

सहा हजार नव्या ग्रंथालयांचे प्रस्ताव सरकारकडे २००५-०६ या वर्षात सादर झाले होते. मार्चअखेर नव्या ग्रंथालयांना मान्यता आणि निकष पूर्ण करणाऱ्या ग्रंथालयांचे दर्जाबदल ग्रंथालय संचालनालयाकडून होत असतात; मात्र संचालनालयाच्या भ्रष्टाचाराच्या अनेक तक्रारी आल्याने राज्य सरकारने सर्व अधिकार आपल्याकडे घेतले. नेहमीप्रमाणे मान्यता आणि दर्जाबदलाचे प्रस्ताव विचारात घेतले जातील, असे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी राज्य ग्रंथालय संघाच्या शिष्टमंडळाला दिले होते; मात्र प्रत्यक्षात त्यासाठी असलेला एक कोटी २० लाख रुपयांचा निधी अन्यत्र वळविण्यात आल्याने राज्यातील ग्रंथालय चळवळीला धक्का बसल्याचे संघाचे कार्यवाह कृष्णकांत शिंदे यांनी सांगितले.

## * नामदेव महाराजांची चांदीची मुद्रा

''संतांचे चारित्र्यहनन करण्याची प्रवृत्ती सध्या वाढत चालली असून, तिला रोखण्याची जबाबदारी सर्व समाजाची आहे,'' असे प्रतिपादन टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. मा. बाचल यांनी नामदेव समाजोन्नती परिषदेच्या शताब्दी महोत्सवाच्या शुभारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. नामदेव महाराजांच्या चांदीच्या नाण्याचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. माजी आमदार प्रकाश देवळे,

शिल्पकार डी. एस. खटावकर, परिषदेचे अध्यक्ष अजय फुटाणे, मुख्य विश्वस्त तु. पां. मिरजकर, परिषदेच्या पुणे विभागाचे उपाध्यक्ष रामभाऊ मेटे, अशोक वायचळ आणि रामभाऊ पारिख उपस्थित होते.

संत शिरोमणी नामदेव महाराजांचे नाणे शासनाच्या वतीने चलनात येण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे सांगून डॉ. बाचल म्हणाले, ''नामदेव शिंपी समाजाने अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे. मात्र, एकविसाव्या शतकातील परिस्थिती सध्या बदलत असून, अध्यात्माबरोबर विज्ञान आणि तंत्रज्ञानाची सांगड घालायला हवी. नामदेव समाजाचे स्वतंत्र तंत्रनिकेतन होणे गरजेचे आहे.''

नामदेव महाराजांचे चांदीचे नाणे २० ग्रॅमचे असून, त्यावर हाती वीणा घेतलेले नामदेवांचे चित्र रेखाटण्यात आले आहे. नाण्याच्या दुसऱ्या बाजूस तुळशीपत्रे कोरण्यात आली आहेत.

### * वसंतराव नाईकांविषयी अवमानकारक मजकूर

राज्याचे माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे प्रणेते दिवंगत वसंतराव नाईक यांच्याविषयीचा अवमानकारक मजकूर असलेला 'आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण' हा धडा व संबंधित पुस्तकावर बंदी घालावी, विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून हे पुस्तक वगळावे व लेखक व. म. शिरसीकर यांच्यावर कठोर कारवाई करावी आदी मागण्या विधान परिषदेत करण्यात आल्या.

या पुस्तकात वसंतराव नाईक यांच्या चारित्र्याविषयी बदनामी करणारा मजकूर असल्याचे जोगेंद्र कवाडे यांनी निदर्शनास आणले. या पुस्तकातील तो उतारा वाचत असताना अरविंद सावंत यांनी त्यास आक्षेप घेतला. हा मजकूर सभागृहात मांडून पुन्हा त्यांची बदनामी होऊ देऊ नये, असे सावंत म्हणाले.

हे पुस्तक अभ्यासक्रमातून काढून घेतले जावे व संबंधितांवर कारवाई केली जावी, असे निर्देश सभापती शिवाजीराव देशमुख यांनी सरकारला दिले. कवाडे यांनी औचित्याच्या मुद्द्याद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता.

### * हीरकमहोत्सवी 'साधना'

सानेगुरुजींनी स्थापन केलेल्या साधना साप्ताहिकाच्या हीरकमहोत्सवानिमित्त ६० लाखांचा निधी आणि राज्यभर ६० वाचन केंद्रे उभारण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती 'साधना'चे संपादक नरेंद्र दाभोळकर यांनी दिली.

राज्याला ध्येयवादी साप्ताहिकांची परंपरा आहे. मात्र, सध्याच्या बदलत्या काळात या-ना त्या कारणाने ध्येयवादी साप्ताहिके अडचणीत आली आहेत. ही बाब मराठी समाजाच्या दृष्टीने हिताची नाही. अशा काळात 'साधना'चे हीरकमहोत्सवी पदार्पण ही आशावादी बाब आहे. १५ ऑगस्ट २००६ रोजी ५९ वा वर्धापनदिन अंक आणि १५ ऑगस्ट २००७ रोजी हीरकमहोत्सवी अंक प्रसिद्ध होईल.



सा. रे. सा. पाटील यांनी नऊ लाखांचा तर पुणे महापालिकेने दहा लाखांचा निधी समारंभपूर्वक प्रदान केला.

राज्यात ६० ठिकाणी साधना वाचन केंद्रे उघडण्यात येणार आहेत. या वाचनकेंद्रातून केवळ 'साधना'चे वाचन नव्हे तर वाचनाची साधना केली जाणार आहे. वाचनसंस्कृती वाढावी, रुजावी यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात एकतरी वाचनकेंद्र असेल. याशिवाय बालवाङ्मय सर्वदूर पोहोचावे यासाठी 'सानेगुरुजी संस्कार वाहिनी' या नावाने एक वाहन तयार करण्यात आले असून त्यामार्फत संपूर्ण राज्यभरात बालवाङ्मयाचे तसेच मराठीतील अभिजात साहित्याचे प्रदर्शन आणि विक्री करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमास सदाशिव अमरापूरकर, उद्योगपती एम. एन. चैनी, मोहन धारिया उपस्थित होते.

### * नायपॉलना प्रकाशकच मिळेना!

नोबेल पारितोषिक विजेते साहित्यिक व्ही. एस. नायपॉल यांची किंमत आता ब्रिटनमधल्या प्रकाशकांनाच उरलेली दिसत नाही. नवोदित लेखकाचे साहित्य आहे, असे सांगत नायपॉल यांच्या 'इन ए फ्री स्टेट' पुस्तकाची काही प्रकरणे एका वृत्तपत्राने प्रकाशकांना पाठवली. मात्र बहुसंख्य प्रकाशकांनी पुस्तक छापण्यास नकार दिला. 'संडे टाइम्स'ने २१ प्रकाशकांकडे नायपॉल आणि स्टॅन्ले मिडलटन यांच्या पुस्तकांची प्रकरणे पाठवली. फक्त एकाने सकारात्मक प्रतिसाद दिला आणि तोही स्टॅन्ले यांच्या लेखनासाठी! नायपॉल यावर म्हणतात, ''चांगले लिहिले आहे, हे कळण्यासाठीसुद्धा गुणवत्ता लागते. ती हल्ली आढळत नाही.''

### * समग्र कुसुमाग्रज लवकरच इंटरनेटवर

मराठी साहित्यात स्वत:ची ठाशीव मुद्रा कोरणारे ज्ञानपीठ विजेते लेखक वि. वा. शिरवाडकर उर्फ कवी कुसुमाग्रज यांच्या आयुष्याचा समग्र पट उलगडणारी वेबसाईट इंटरनेटवर दाखल झाली असून कुसुमाग्रजांचे समग्र साहित्यही त्यावर लवकरच उपलब्ध होणार आहे.

गोदातीरी वसलेल्या नाशिकमध्ये कुसुमाग्रजांच्याच प्रेरणेने १९९० मध्ये 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'ची स्थापना झाली. कुसुमाग्रजांच्या साहित्याचे जतन व प्रसार हे प्रतिष्ठानचे मुख्य उद्दिष्ट. त्याचीच पूर्ती करण्याच्या हेतूने वेबसाईटचे पाऊल उचलण्यात आले आहे. www.kusumagraj.org असा पत्ता ॲड्रेस बारमध्ये क्लिक करताच फ्लॅश तंत्राचा वापर केलेल्या या वेबसाईटवरील पडदा दूर होतो. कुसुमाग्रजांच्या वेगवेगळ्या भावमुद्रांतील छायाचित्रे झळकू लागतात. सोबत त्यांच्या गाजलेल्या 'प्रेम' या कवितेतील काही ओळी आणि वि. वा. शिरवाडकर अशी लफ्फेदार सही.

कुसुमाग्रजांची तसेच 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'ची साद्यंत माहिती उपलब्ध करून देणाऱ्या या वेबसाईटमध्ये कुसुमाग्रज, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, स्मारक, सहकार्य, संपर्क, प्रतिक्रिया अशी प्रमुख दालने आहेत. कुसुमाग्रजांचा जीवनपट, त्यांच्या साहित्याची कालक्रमाने सूची, त्यांना मिळालेले विविध पुरस्कार, सामाजिक कार्य अशी विविधांगी परिचयात्मक माहिती मिळते. त्याचबरोबर, दुर्गा भागवत, शिवराम कारंथ अशा दिग्गजांसोबतची त्यांची छायाचित्रे जुन्या आठवणींना उजळा देतात. साहित्यिक तसेच सामाजिक क्षेत्रातील कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे कार्य, गोदावरी पुरस्कार तसेच जनस्थान पुरस्काराने गौरव झालेल्या मान्यवरांची सूची अशा माहितीचा दस्तावेजही या वेबसाईटमुळे खुला झाला आहे.

'मराठी वर्ल्ड डॉट कॉम'वाले अनुराग आणि भाग्यश्री केंगे यांनी या वेबसाईटचे डिझाईन केले आहे. इंटरनेटच्या प्रचंड अवकाशात अशा रीतीने मराठी साहित्यिक तळपणे गरजेचे आहे. या माध्यमातून जगभरातल्या मराठी जनांपर्यंत हे साहित्यिक पोहोचतील, असे भाग्यश्री केंगे यांनी नमूद केले. ही वेबसाईट सुरू करताना आर्थिक नफ्यातोट्याचा विचार केलेला नाही. तात्यासाहेबांविषयीची समग्र माहिती लोकांपर्यंत पोहोचावी हाच त्यामागचा हेतू आहे, अशी माहिती कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळाचे कार्यवाह विलास लोणारी यांनी दिली.

### * हस्तलिखितांच्या सर्वेक्षणात मदत करण्याचे आवाहन

प्राचीन भारतीय ज्ञानाचा ठेवा असणाऱ्या पोथ्या आणि हस्तलिखितांचे सर्वेक्षण करण्याचे काम पुणे येथील आनंदाश्रम संस्थेने नुकतेच हाती घेतले आहे.

या केंद्रातर्फे महाराष्ट्रात ठिकठिकाणी हस्तलिखितांचे सर्वेक्षण करण्यासाठी पथके पाठवण्यात येणार आहेत. त्यामध्ये प्रत्येक हस्तलिखिताची संपूर्ण माहिती घेऊन तिचे संगणकीकरण काम केले जाणार आहे, असे समन्वयक डॉ. सरोजा भाटे यांनी सांगितले.

यासाठी हस्तलिखितांचे संग्रह असणारी सर्व ग्रंथालये, संग्रहालये, देवालये, मठ तसेच अन्य संस्थांचे पदाधिकारी आणि संग्रह बाळगणाऱ्या व्यक्तींनी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे. स्वखुषीने दिलेली हस्तलिखिते स्वीकारून त्यांचे जतन केले जाईल. संपर्क– डॉ. सरोजा भाटे, समन्वयक, हस्तलिखित स्रोत केंद्र, आनंदाश्रम संस्था, २२ बुधवार पेठ, पुणे ४११००२, फोन- २४४५७११९

### * 'पेंग्विन'चीही मराठी पुस्तके

जगप्रसिद्ध पेंग्विन प्रकाशनाने मराठी पुस्तके काढण्याचे ठरविले आहे. मराठीतील समकालीन कथासंग्रह व समकालीन कवितासंग्रह, यांबरोबरच सुमारे सहा मूळ इंग्रजी पुस्तकांचे मराठी अनुवाद पेंग्विन प्रकाशनातर्फे प्रसिद्ध केले गेले आहेत.



'बदलते रंग' या समकालीन कथासंग्रहामध्ये मेघना पेठे, आशा बगे, प्रिया तेंडुलकर, मिलिंद बोकील, सानिया, रघुनाथ पाठारे, कमल देसाई, विलास सारंग, मुकुंद टाकसाळे, अर्चना मिरजकर आदी १३ लेखकांच्या कथांचा समावेश आहे. मूळ इंग्रजी पुस्तकांच्या मराठी अनुवादांमध्ये खुशवंतसिंह यांचा कथासंग्रह 'स्वर्ग', प्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ प्रा. जयंत नारळीकर यांचे विज्ञानावर आधारित पुस्तक, 'हिंदुत्व'चा सुप्रिया सहस्रबुद्धे यांनी केलेला अनुवाद, गणेश व शिव यांच्याबद्दल एका ब्रिटिश लेखिकेच्या पुराणकथांचा संध्या पेडणेकर यांनी केलेला अनुवाद, नमिता गोखले लिखित 'शकुंतला'चा अर्चना मिरजकर यांनी केलेला अनुवादक, तसेच शशी देशपांडे यांच्या पुस्तकांचा समावेश आहे.

दिल्ली विद्यापीठातील मराठीचे प्राध्यापक डॉ. शशिकांत मिरजकर या पुस्तकांच्या कामावर देखरेख करीत आहेत. डॉ. मिरजकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, 'स्क्रिझोफ्रेनिया' या दिवाकर चौधरी लिखित मनोरुग्णाच्या आत्मचरित्रपर पुस्तकाची दुसरी आवृत्ती, तसेच या मूळ मराठी पुस्तकाचा हिंदी अनुवाद पेंग्विन प्रकाशनगृहातर्फे प्रसिद्धीच्या मार्गावर आहे. जळगाव येथील कवी (कै.) गणेश चौधरी यांच्या कविता व पत्रे तसेच स्वानुभवावर आधारित हे पुस्तक त्यांचे बंधू दिवाकर चौधरी यांनी शब्दबद्ध केले आहे.

### * आदिवासी तरुणांसाठी मंचर येथे सुसज्ज ग्रंथालय

आदिवासी तरुणांना विविध स्पर्धा परीक्षांना समर्थपणे सामोरे जाता यावे यासाठी रोजगार- स्वयंरोजगार विभागाच्या मंचर येथील स्वयंरोजगार केंद्रात नुकतेच सुसज्ज ग्रंथालय सुरू केले आहे. त्यामध्ये स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त ठरतील असे संदर्भग्रंथ, साहित्य तसेच नियतकालिके उपलब्ध करून देण्यात आलेली असून, नामवंत व्यक्तींची व्याख्यानेही आयोजित करण्यात आलेली आहेत.

मंचर येथे राज्य शासनाच्या रोजगार-स्वयंरोजगार विभागामार्फत आयोजित ६१ व्या प्रशिक्षण सत्राचा आरंभ या विभागाचे उपसंचालक डॉ. सु. भ. ऱ्हाळदे यांच्या हस्ते व माहिती उपसंचालक वसंत शिर्के यांच्या उपस्थितीत करण्यात आला. मंचर प्रशिक्षण केंद्राचा आतापर्यंत १५०० आदिवासी युवकांनी लाभ घेतलेला आहे. त्यांपैकी ७०० तरुणांना शासकीय, निमशासकीय तसेच अन्य आस्थापनांमध्ये नोकरी लागली. काही तरुणांनी व्यवसायही सुरू केले आहेत. सन १९८७ मध्ये या केंद्राची स्थापना झाली.

याबरोबरच आदिवासी युवक-युवतींसाठी बेरोजगार सहकारी संस्था कार्यरत असून, त्या माध्यमातूनही काहीजणांना रोजगार उपलब्ध झाला आहे. एक हजार रुपये प्रतिमास विद्यावेतन चालू सत्रापासून देण्यात येणार आहे.

नवीन सुरू केलेल्या ग्रंथालयामध्ये इंग्रजी-गणित यासह सामान्यज्ञान, बौद्धिक

चाचणी, व्यक्तिमत्त्व विकास, स्वयंरोजगार (प्रकल्प अहवालासह) इत्यादी विषयांवरील १ हजार ग्रंथ उपलब्ध आहेत.

### * 'स्मृती ठेवूनी जाती'चे प्रकाशन

निवेदनाच्या क्षेत्रात २५ वर्षे कारकीर्द केल्यानंतर राजकीय चित्रपट काढण्याचा मानस प्रसिद्ध निवेदक व मुलाखतकार सुधीर गाडगीळ यांनी व्यक्त केला.

चित्रपट निर्माते व करसल्लागार अरुण गोडबोले यांच्या 'स्मृती ठेवूनी जाती' या पुस्तकाचे प्रकाशन गाडगीळ यांच्या हस्ते सातारा येथे झाले. राजकारणातील भ्रष्टाचारी व गुन्हेगार लोकांचे पितळ उघडे करण्यासाठी राजकीय चित्रपट काढायचा आहे, असे गाडगीळ यांनी स्पष्ट केले.

माणसा-माणसांतील संवाद हरवत चालल्याने तो वाढावा यासाठी मोफत समुपदेशन करण्याची, अनिवासी भारतीय तरुणांना भारतीय नातेवाईकांशी संवाद साधता यावा यासाठी 'कम्युनिकेशन इन्स्टिट्यूट' काढण्याची व ललित लेखन करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली.

### * टागोरांच्या कथा हिब्रू भाषेत

गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांच्या कथांचा अनुवाद हिब्रूमध्ये करण्यात आला असून इस्रायल येथील सार पब्लिशिंग हाऊसतर्फे तो नुकताच प्रकाशित करण्यात आला. भारताचे इस्रायलमधील राजदूत अरुणकुमार सिंग यांच्यासह अनेक भारतीय संस्कृतीप्रेमी या समारंभाला उपस्थित होते.

'एप' या नावाने प्रकाशित करण्यात आलेल्या हिब्रूमधील या कथासंग्रहात टागोरांच्या सर्व कथांचा अनुवाद झाला आहे. याबाबत पत्रकारांशी बोलताना सार पब्लिशिंग हाऊसचे संचालक सार गनोच म्हणाले की, रवींद्रनाथ टागोर हे भारतामधील सर्वोत्कृष्ट कथाकारांपैकी एक असून त्यांना थोर तत्त्ववेत्ते म्हणूनही ओळखले जाते. भारतातील स्त्रीजीवनाविषयीचे अत्यंत मार्मिक चित्रण या कथांमधून झाले आहे. त्यामुळेच टागोरांच्या पहिल्या अनुवादित पुस्तकासाठी आम्ही 'स्त्री' हेच पुस्तक निवडले. त्यानंतर टागोर यांचे 'मिस्टिक मूडस' व 'ब्युटिफूल डायव्हर्जंट फेस ऑफ इंडिया' ही अनुवादित पुस्तकेही प्रकाशित होतील. तिसऱ्या अनुवादित पुस्तकात भारताची विचारसरणी दर्शविणारी अनेक छायाचित्रे असून त्याखाली महात्मा गांधी आणि टागोर यांची वचनेही उद्धृत करण्यात येणार आहेत.

### * तमाशा : छायाचित्रांतून सर्वांगीण दर्शन

''आपले लोक चित्रपट बघतात म्हणजे त्यातील गोष्ट पाहतात, नाटक बघतात म्हणजे त्यातील संवादांवर लक्ष केंद्रित करतात. एखादे चित्र असो वा छायाचित्र असो त्यातही ते गोष्टच शोधू पाहतात... त्यातील दृश्यभागाकडे मात्र



दुर्लक्ष करतात. डोळे आहेत म्हणून पाहतात, पण काय पाहतात, हे त्यांनाही कळत नाही...''

छायाचित्रकार संदेश भंडारे यांच्य 'तमाशा : एक रांगडी गंमत' या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या वेळी ख्यातनाम साहित्यिक विजय तेंडुलकर यांनी अशी खंत प्रकट केली. तेंडुलकर म्हणाले की, छायाचित्रांकडे नुसते पाहण्याऐवजी ती वाचायला शिकायला हवे. आपल्याकडे ती पद्धतच नाही. चित्रांची आणि छायाचित्रांचीदेखील एक भाषा असते, ती समजून घेण्याचा प्रयत्न होत नाही. चित्रांची मांडणी, त्यातील रंगसंगती, त्यातील दृश्यभाग यापर्यंत ते पोहोचतच नाहीत. दृश्यमाध्यमांची घोर उपेक्षा आपल्याकडे सुरू आहे. ती थांबायला पाहिजे. कलाकृतींकडेच नाही तर आयुष्याकडेही जाणीवपूर्वक पाहायला आपण शिकले पाहिजे...

'लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. ते म्हणाले, ''स्वयंप्रेरणेने निर्माण झालेल्य कलाप्रकारांची बुद्धिजीवींकडून नेहमीच उपेक्षा केली जाते आणि जेव्हा त्यांची दखल घेतली जाते, तेव्हा आपण या कलांचे आश्रयदाते आहोत, अशी भावना बाळगली जाते. कोणत्याही गोष्टीचे 'डॉक्युमेन्टेशन' करण्याबद्दलही आपल्याकडे घोर अनास्था असते. अशा कलाविष्कारांमधूनच सांस्कृतिक उत्क्रांतीचा आलेख काढता येतो, याचे भान आपल्याकडील विचारवंतांना नसते. त्यामुळे कलाविष्कार हा केवळ करमणुकीचे माध्यम बनतो आणि जीवन समृद्ध करण्याची क्षमता दुर्लक्षिली जाते. या पार्श्वभूमीवर, या पुस्तकाचे विशेष महत्त्व आहे.''

संदेश भंडारे यांनी तमाशासम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर यांची वृद्धापकाळातील स्थिती पाहिल्यावर हे फोटो काढण्याची प्रेरणा मिळाल्याचे सांगितले. लोकवाङ्मय गृहाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

### * ग्रंथालयांचे अनुदान

राज्य सरकारच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने पुस्तक खरेदीतील भ्रष्टाचाराच्या संशयावरून सर्व सार्वजनिक ग्रंथालयांसाठी देण्यात येणारी अनुदानाची रक्कम थांबवली आहे. त्यामुळे ग्रंथखरेदी, तसेच सार्वजनिक ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांचा मार्च महिन्याचा पगार रखडला असून ग्रंथ चळवळच धोक्यात आली असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या कोकण विभागाचे अध्यक्ष मदन हजेरी यांनी केला आहे.

भ्रष्टाचाराच्या संशयावरून सरकारने उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे प्रभारी उपसंचालक डॉ. बा. ए. सनान्से आणि राज्य मध्यवर्ती ग्रंथालयाचे ग्रंथपाल गणेश तायडे यांना पदावरून दूर केले असून संचालक मो. मु. मेश्राम यांची चौकशी सुरू केली आहे. पण हे करत असताना दरवर्षी राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांकडे देण्यात येणाऱ्या ३८ कोटी ४८ लाख रुपयांचे अनुदान मात्र

विनाकारण थांबवण्यात आले आहे. त्यामुळेच सार्वजनिक ग्रंथालयांमधील सुमारे २० हजार कर्मचाऱ्यांना त्यांचा मार्च महिन्याचा पगारही अद्याप मिळू शकला नाही, असे हजेरी म्हणाले.

अनुदान पुनश्च सुरू झाले नाही, तर ज्या हेतूने ग्रंथालय चळवळ सुरू केली त्यावरच कुऱ्हाड मारल्यासारखे होईल, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाच्या इतर पदाधिकाऱ्यांनीही व्यक्त केली आहे. अनुदान न मिळाल्यामुळेही २००५-०६ मध्ये होणाऱ्या ७९ लाख ८७ हजार रुपयांच्या खरेदीला खीळ बसली आहे.

या सर्व प्रकारातून ग्रामीण भागातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीच्या भवितव्याची काळजी वाटत असल्याचे पुणे मराठी ग्रंथालयाचे कार्यवाह मुकुंद अनगळ यांनी सांगितले.

उच्च तंत्र शिक्षण विभागाचे मंत्री दिलीप वळसे-पाटील यांचा अनुदान थांबवण्याचा निर्णय 'तुघलकी' असून जुन्या वाचनालयांच्या वर्गबदलाचा निर्णयही त्यामुळे होऊ शकला नसल्याचे हजेरी म्हणाले.

## * द. मा. मिरासदार- वय वर्षे ८०

मराठी रसिकांच्या मनापर्यंत पोहोचलेली अशी एकही विनोदी कादंबरी आजपर्यंत निर्माण न झाल्याने, तशी लिहिण्याचा हेतू असल्याचे, विनोदी कथाकार द. मा. मिरासदार यांनी सांगितले.

१४ एप्रिल रोजी मिरासदार यांनी ८० व्या वर्षात पदार्पण केले, त्यानिमित्त आशय सांस्कृतिकच्या वतीने 'मिरासदारी' या कार्यक्रमाचे आयोजन पाथफाईंडर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आशयचे सचिव सतीश जकातदार, वीरेंद्र चित्राव, पाथफाईंडरच्या संचालिका नीलिमा खरे आदी उपस्थित होते.

१४ एप्रिल रोजी सिम्बायोसिस विश्वभवन येथे ज्येष्ठ अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर यांच्या हस्ते मिरासदार यांचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी दमांचे साहित्य, कथाकथन, नाटक, चित्रपट कारकीर्द याचा मागोवा घेणारा 'मिरासदारी' हा दृकश्राव्य कार्यक्रम झाला. त्यामध्ये अभिनेते विजय कदम, रवींद्र मंकणी, अनिरुद्ध देशपांडे, मंगेश तेंडुलकर यांचा समावेश होता. या कार्यक्रमातच अरुणा ढेरे आणि अभिराम भडकमकर यांनी दमांची प्रकट मुलाखत घेतली.

रसिकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून राहील अशी विनोदी कादंबरी अद्याप निर्माण झालेली नाही, असे मत व्यक्त करून तशा कादंबरीचा विषय मनात घोळत असल्याचे मिरासदार म्हणाले. कादंबरीबरोबरच विनोदी नाटक लिहिण्याचाही विचार आहे. मित्राचे लग्न आणि त्यानिमित्ताने होणाऱ्या गंमतीजमती, असा ढोबळ विषय डोळ्यापुढे आहे, असे मिरासदार यांनी सांगितले.

अंगविक्षेपाने विनोदनिर्मिती करण्याचा प्रकार सध्या बोकाळल्याने शब्दातला



विनोद मागे पडत चालला आहे, असे मिरासदार म्हणाले. स्वाभाविक विनोदनिर्मिती महत्त्वाची आहे. प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ विनोद जास्त काळ टिकणारा असतो, असे मिरासदार यांनी स्पष्टपणे नमूद केले.

## * शिवप्रताप कादंबरी प्रकाशित

छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा वापर केला मात्र कधीही शत्रूशी दगाबाजी केली नाही. या वास्तवाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, अशा शब्दांत 'शिवप्रताप' या कादंबरीचे लेखक उमेश सणस यांनी आपली भूमिका मांडली. या कादंबरीचे प्रकाशन केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते नुकतेच झाले.

प्रकाशनप्रसंगी प्रकाशक घनश्याम पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे भगवान साळुंखे, तसेच राजेंद्र बांदल, शुभांगी गिरमे आणि श्रीहरी सातपुते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

'शिवाजीस चढेघोडियानिशी कैद करून विजापूर दरबारी आणतो' अशी प्रतिज्ञा करून अफजलखान विजापुरातून बाहेर पडला होता, असे सांगून सणस म्हणाले की, 'महाराजांनी त्यास कपटाने मारले' हे मोगल तसेच आदिलशहा दप्तरातले उल्लेख खरे नाहीत. संकटांना धैर्याने सामोरे जाताना महाराजांच्या रयतेने त्यांना दिलेली साथ विलक्षण होती. औरंगजेब आणि ब्रिटिश या घटनेकडे विशिष्ट दृष्टीने पाहात होते.

स्वराज्य बांधणीच्या इतिहासात ही घटना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. असे असूनही हरिभाऊ आपटे आणि वसंत कानेटकर यांचे सन्मान्य अपवाद वगळता त्यावर फारसे काही लिहिले गेले नाही, असे सणस म्हणाले. अफजलखान संघर्ष ही महाराजांच्या जीवनातली अत्यंत महत्त्वाची घटना असून तिच्याद्वारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू स्पष्ट होतात. गनिमी युद्धनीतीची ही लढाई त्यांनी केवळ जिद्द आणि अनुयायांची निष्ठा यांच्या बळावर जिंकली.

## * प्रसाद प्रतिष्ठानचा पुरस्कारप्रदान समारंभ

ज्या पुरस्काराने साहित्यिकाची अंत:प्रेरणा बलवान होते तोच खरा पुरस्कार असतो. प्रसाद प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारे पुरस्कार हे अशाच स्वरूपाचे आहेत अशा शब्दांत श्रेष्ठ कवी साहित्यिक फ. मुं. शिंदे यांनी प्रसाद प्रतिष्ठानचा गौरव केला.

प्रसाद प्रतिष्ठान, नांदेड च्या वतीने यंदा डॉ. मधुकर वाकोडे, कविता महाजन व सदानंद पुंडके यांना प्रसाद ग्रंथ गौरव पुरस्कार देण्यात आले. त्यानिमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून फ. मुं. शिंदे बोलत होते. ज्येष्ठ साहित्यिक भु. द. वाडीकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

अध्यक्षीय मनोगतात भु. द. वाडीकर म्हणाले, प्रसाद प्रतिष्ठानच्या वतीने पुरस्कार मिळालेल्या या साहित्यिकांच्या लेखनाला वास्तवाचे कलात्मक सौंदर्य प्राप्त झाले आहे. हे यांच्य लेखनाचं वैशिष्ट्य आहे.

### * गोमंतक मराठी अकादमी

गोमंतक मराठी अकादमीतर्फे तीन दर्जेदार पुस्तकांचे गोमंतकीय लेखक व नाट्यकर्मी भिकू पै आंगले यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकात प्रसिद्ध मराठी समीक्षक डॉ. वि. ब. प्रभुदेसाई यांचे 'मराठीची कैफियत' डॉ. बाळकृष्णची कांनोळकर यांचे 'प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांची कथा : एक शोध' तसेच निलेश बुगडे यांनी संपादित केलेल्या 'गोमंतकाची भाषा' या पुस्तकाचा समावेश आहे.

गोव्यातील मराठी भाषाविषयक चळवळ तसेच राजभाषा आंदोलनासंबंधी डॉ. वि. ब. प्रभुदेसाई यांनी जे विविध लेख वर्तमानपत्रातून लिहिले होते त्यांचा समावेश 'मराठीची कैफियत' या पुस्तकात आहे. प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांच्या समग्र वाङ्मयावर संशोधन करून गोवा विद्यापीठाला पीएचडीसाठी सादर केलेला डॉ. कांनोळकर यांचा प्रबंध प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई यांनी 'कथा : एक शोध' या नावाने प्रसिद्ध केला आहे. अशा प्रकारचा मराठी साहित्य विश्वातील हा पहिलाच ग्रंथ आहे. ही पुस्तके प्रकाशित करून गोमंतक मराठी अकादमीने मराठी साहित्यात मोलाची भर घातल्याचे प्रतिपादन श्री. भिकू पै यांनी केले.

### * नगरमधील ग्रंथपाल प्रमाणपत्र अभ्यासक्रम बंद

नगर जिल्ह्यात गेली १८ वर्षे चालवला जाणारा राज्य सरकारचा ग्रंथपाल प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग यंदा बंद झाला असून तो पूर्ववत सुरू ठेवण्याची मागणी जिल्हा ग्रंथालय संघाने केली आहे.

नगर जिल्ह्यात १९८८ साली हा अभ्यासक्रम सुरू झाला. अभ्यासक्रमासाठी १२० विद्यार्थ्यांची संख्या आवश्यक असते मात्र तेवढे विद्यार्थी न आल्याने अभ्यासक्रम बंद करण्यात आल्याचे संघाचे अध्यक्ष प्रभाकर विसपुते यांनी सांगितले. या अभ्यासक्रमातून प्रशिक्षण घेतलेल्या जिल्ह्यात दोन हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी आहेत.

गेल्या आठ-दहा वर्षांत नवीन ग्रंथालये निर्माण न झाल्याने प्रशिक्षणार्थींना नोकऱ्या मिळाल्या नाहीत. त्यामुळे इकडे वळणाऱ्यांची संख्या कमी झाल्याची शक्यता आहे.

नगर जिल्ह्यातून नवीन दोनशे सार्वजनिक ग्रंथालयांचे प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवण्यात आले आहेत. वाढणारी वाचक चळवळ लक्षात घेऊन हा अभ्यासक्रम परत सुरू करण्याची गरज जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.



### * मोहन धारिया यांचे आत्मचरित्र लेखन

माजी केंद्रीय वाणिज्य मंत्री आणि 'वनराई'चे संस्थापक अध्यक्ष मोहन धारिया सध्या यांचे आत्मचरित्र लिहीत आहेत. यावर्षी हे चरित्र लिखाणाचे काम पूर्ण करण्याचा त्यांचा विचार आहे.

यासंबंधी बोलताना धारिया म्हणाले की, १९७५-७६ या कालखंडापर्यंतचा आपल्या चरित्राचा भाग 'सफर' या पुस्तकाद्वारे यापूर्वीच प्रसिद्ध केला आहे. त्यामध्ये जन्मापासून ते आणीबाणीपर्यंतचा प्रवास त्यात आहे.

१९७६ ते २००६ हा पुढचा तीस वर्षांचा कालखंड धारियांनी त्यांच्या उर्वरित आत्मचरित्रासाठी निवडला आहे. जनता सरकाराच्या काळात वाणिज्य मंत्रालयासह आणखी पाच खात्यांचा कारभार– धारियांकडे होता. अल्पायुषी जनता सरकार लवकरच कोसळले. त्यापूर्वी जनता पक्षाचे अध्वर्यू असणारे जयप्रकाश नारायण यांचे निधन आणि गेल्य २५ वर्षांत राजकारणात होत गेलेले बदल यासह इतिहासातल्या अनेक घटनांची झलक धारियांच्या पुस्तकामध्ये मिळेल. हाडाचा राजकारणी ते 'वनराई'ची १९८६ मध्ये स्थापन करणारा अभ्यासू पर्यावरणप्रेमी असा त्यांच्या वैयक्तिक पातळीवरचा वैचारिक प्रवास हाही दुसऱ्या भागात धारियांनी समाविष्ट केला आहे.

जनसंघ, भारतीय जनता पक्ष, जनता दल, समाजवादी पक्ष अशा अनेक विचारसरणींशी राजकीय कारकीर्दीत संपर्कात आलेले अण्णा आपल्या चरित्रात त्यांच्या बदलत गेलेल्या राजकीय भूमिकेबद्दल काय लिहितील, याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे!

### * विश्वास पाटील शिकताहेत सिनेकॅमेऱ्याची कला!

ख्यातनाम कादंबरीकार आणि रायगड जिल्ह्याचे सीईओ नव्याने मुळाक्षरं शिकत आहेत; पण ती सिनेमॅटोग्राफीच्या व्याकरणातील! 'रंग दे बसंती', 'देवदास', 'मिशन काश्मीर', '१९४२- ए लव्हस्टोरी'सारख्या गाजलेल्या चित्रपटांचे विख्यात सिनेमॅटोग्राफर विनोद प्रधान यांच्याकडे कॅमेऱ्याचे तंत्र-मंत्र पाटील सध्या शिकत आहेत.

'झाडाझडती', 'पानिपत', 'संभाजी'सारख्या कादंबऱ्यांनी मराठीत पुन्हा पुन्हा बेस्टसेलर ठरलेले पाटील आता लेखणीबरोबरच कॅमेऱ्याच्या तिसऱ्या डोळ्याशी दोस्ती करत आहेत. काही दिवसांपूर्वी तर अमिताभ आणि शाहरूख खान यांच्या एका ॲडच्या शूटमध्ये 'टेक्निकल क्रू'मध्ये त्यांचा समावेश होता. लालफितीच्या कारभारातून उसंत घेत सध्या ते कॅमेऱ्याच्या मागे उभं राहून बऱ्याच गोष्टी टिपण्याचा प्रयत्न करत आहेत.

पाटील सांगतात, 'कॅमेराचं माध्यम प्रचंड वेगळं आहे. कित्येक दिवस या

माध्यमाचं कुतूहल होतं. जाहिरातीमध्ये वापरलं जाणारं टेक्निक आणि सिनेमॅटोग्राफीत वापरला जाणारा कॅमेरा याची बारीकसारीक माहिती गोळा करण्याचं काम सुरू आहे. विनोद प्रधानसारख्या कसलेल्या सिनेमॅटोग्राफरकडे काम करण्याचा अनुभव खूप काही शिकवणारा तसंच समाधान देणारा आहे. गेल्या दोन महिन्यांपासून हा क्लास सुरू आहे. सुट्टी घेऊनच या नव्या मोहिमेवर आलो आहे.

काही दिवसांपूर्वी, अमिताभने अमेरिकन शर्टची जाहिरात जैसलमेरमध्ये शूट केली. त्यात विनोद प्रधानचे असिस्टंट होते विश्वास पाटील. ते म्हणाले, की अमिताभ हा आपल्याला नेहमीच लार्जर दॅन लाइफ भासला आहे. आख्यायिकेच्याही पलीकडचा आणि कामासाठी सर्वस्व देणारा हा मोठा कलावंत आहे, याची ओळख या शूटिंगमध्ये झाली. तसंच 'परिणिता'फेम प्रदीप सरकार यांच्यासोबत 'कॉम्पॅक' या कॉम्प्युटर कंपनीची जाहिरात करताना शाहरूखला अनुभवता आलं, कॅमेऱ्याच्या नजरेने पाहताना हे सारं खूप वेगळं जाणवत होतं. या दोन अभिनेत्यांच्या कामाची पद्धत, त्यांचा प्रोफेशनल दृष्टिकोन आणि एकूणच कलावंत म्हणून त्यांचं मोठेपण जाणून घेण्याची संधी हा आपल्याला या ट्रेनिंगमध्ये मिळालेला बोनसच आहे, असं पाटील म्हणाले.

शूटिंगमधल्या शिफ्टसपासून तिथल्या धावपळीच्या फिल्मी वातावरणाचा अनुभव हा नावाजलेला लेखक सध्या गाठीशी बांधून घेत आहे. संहिता आणि त्याच्या आवश्यकतेनुसार बदलणारी प्रकाशयोजना ते शिकत आहेत. प्रत्येक तांत्रिक बाबीतील 'बिटवीन द लाइन्स' जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

हा क्लास चालू असतानाच पाटील यांना तामिळनाडूतल्या निवडणुकांसाठी निरीक्षक म्हणून जाण्याचा निवडणूक आयोगाचा आदेश आला. त्यामुळे पाटील चेन्नईला रवाना झाले.

### * शशिकांत नार्वेकर पुरस्कारासाठी आवाहन

डॉ. सुभाष भेंडे यांनी गोवा हिंदू असोसिएशनला दिलेल्या देणगीतून १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००६ या काळात प्रकाशित झालेल्या सर्वोत्कृष्ट नाट्यसंहितेस शशिकांत नार्वेकर पुरस्कार देण्यात येणार आहे. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम रुपये ११,१११/- असे पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेच्या नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या वर्धापनदिनी पुरस्कार विजेत्यांचा सत्कार करण्यात येईल. प्रकाशकांनी वरील काळात प्रकाशित केलेल्या नाटकांच्या प्रत्येकी तीन प्रती ३० जूनपर्यंत गोवा हिंदू असोसिएशन, गोमंतधाम, ३५८, डॉ. भडकमकर मार्ग, मुंबई ४००००७ या पत्त्यावर पाठवाव्यात. हस्तलिखितांचा विचार केला जाणार नाही.

### * अकरा वर्षांचा 'कथालेखक' हर्षवर्धन देसाई!

ज्या वयात मनसोक्त खेळायचं, आई-वडिलांचं बोट धरून नाटक-सिनेमा



पाहायला जायचं, त्या वयात एखाद्या मुलानं एक कथा लिहून, त्यावर चक्क चित्रपट तयार झाला तर? मुंबईतल्या हर्षवर्धन देसाईच्या बाबतीत हे स्वप्न वास्तवात आलंय.

मुंबईच्या 'बॉम्बे स्कॉटिश स्कूल'मध्ये पाचवीत शिकणाऱ्या हर्षवर्धनने लिहिलेल्या कथेवरचा 'झूम झॅम झाँबी' हा चित्रपट पुण्यात प्रदर्शित झाला.

एक भूत आणि बच्चे कंपनीनं केलेली धमाल, असा चित्रपटाचा विषय आहे. ''एका मित्राच्या इमारतीच्या तळमजल्यावर भूत आहे, असं माझे मित्र नेहमी म्हणायचे. माझा त्याच्यावर कधीच विश्वास नव्हता. त्यातूनच ही कथा सुचली,'' असे हर्षवर्धनने सांगितले. या कथेवर चित्रपट व्हावा, अशी त्याची इच्छा होती. आई-वडिलांनी त्याला फारसे प्रोत्साहन दिले नाही; पण नाटक-चित्रपट क्षेत्राशी संबंधित असलेल्या आत्येने, डॉ. मेधा मेहेंदळे यांनी ही कथा पाहिल्यावर आपल्याच भाच्याची इच्छा पूर्ण करायचे ठरवले. स्वत:च चित्रपट काढण्याचा निर्णय घेतला. ''दिग्दर्शक अभय राजाध्यक्ष आणि पटकथाकार अनुराधा राजाध्यक्ष यांची मोलाची मदत त्यासाठी मिळाली. झाँबीचं काम करणारे राज पाटील यांच्यासह अलका कुबल आणि अन्य सर्वच कलाकारांचं उत्तम सहकार्य मिळाल्याने हे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले,'' असं डॉ. मेहेंदळे म्हणाल्या.

हर्षवर्धनचे वडील व्यवसायाने चार्टर्ड अकाउंटंट, तर आई गृहिणी आहे, आजोबा प्रा. सी. ग. देसाई हे संस्कृतचे गाढे अभ्यासक होते आणि त्यांनी शंभरावर पुस्तके लिहिली आहेत.

### * डॉ. नारळीकरांचा 'वामन' दूरचित्रवाणीवर

मानवापेक्षा बुद्धिवान, सामर्थ्यशाली 'वामन' पुन्हा एकदा पाताळातून बाहेर पडणार आहे. ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या कादंबरीतील हा यंत्रमानव देशातील प्रख्यात दूरचित्रवाणी वाहिनीवर हिंदी मालिकेच्या रूपात 'अवतार' घेण्याची चिन्हे आहेत.

'मौज'ने १९८६ मध्ये 'वामन परतून आला' ही कादंबरी प्रकाशित केली. तिच्या पाच आवृत्त्या निघाल्या. पुण्यातील मराठी निर्मात्याने तीन महिन्यांपूर्वी डॉ. नारळीकर यांच्या कल्पनेवर आधारित मालिका तयार करण्याची कल्पना देशातील प्रमुख दूरचित्रवाणी वाहिनीपुढे मांडली. त्यानंतर कर्जतमध्ये नितीन देसाई यांच्या सेटवर 'पायलट एपिसोड' तयार करण्यात आला. संबंधित वाहिनीने मालिकेला तत्त्वत: मंजुरी दिली आहे.

कादंबरीचे मालिकेत रूपांतर करण्याचे काम प्रसिद्ध पटकथालेखक विद्याधर बापट करीत आहेत. ते म्हणाले, ''मूळ कादंबरीतील वैज्ञानिक गाभ्याला धक्का न लावता त्यातील नाट्य फुलविण्यासाठी पात्रांची संख्या वाढविण्यात येणार आहे. 'वामन' या यंत्रमानवात मानवी बुद्धी, भावनांचा विकास कसा होतो, यावर

मी भर देणार आहे. निसर्गावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न मानवाला धोकादायक ठरू शकतो, या डॉ. नारळीकरांच्य संदेशाला धक्का पोहोचणार नाही, याची दक्षता घेण्यात येईल.''

### * वैचारिक सधनतेसाठी वाचन हवे

भारतीय समाज साक्षर होत असला तरी तो सुशिक्षित नाही. त्यामुळे या पुढील काळात समाजाला सुशिक्षित करण्याचे स्वप्न बाळगावे लागेल. पुस्तक वाचनातूनच ही वैचारिक सधनता येईल असे मत, पुणे 'लोकसत्ता'चे निवासी संपादक मुकुंद संगोराम यांनी व्यक्त केले.

भारतीय विचार साधनातर्फे १४ ते १६ एप्रिल दरम्यान शनिवार पेठेतील मोतीबागेत पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन संगोराम यांच्या हस्ते झाले. भारतीय विचार साधनाचे अध्यक्ष शरद थिटे, उपाध्यक्ष किशोर शशितल, विश्वस्त नंदा भागवत, चं. प. भिशीकर, मुकुंदराव पणशीकर, शरद वाघ, मुकुंद अनगळ आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शब्दांची ओळख झाल्यावर त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. समाजाला वेगळी दिशा दिली. विचारांच्या माध्यमातूनच हे घडू शकले. समाजाने शब्दांचे हे सामर्थ्य बघितले आहे. तरीदेखील वारंवार आपण चांगले गुण विसरतो हे दुर्दैव असल्याचे संगोराम यांनी सांगितले.

### * न्यूझीलंडमध्ये मराठी नाटक

प्रसिद्ध अभिनेते दिलीप प्रभावळकर यांनी 'मुखवटे आणि चेहरे' हा स्टॅण्डअप टॉक शो न्यूझीलंडमधल्या ऑकलंड आणि वेलिंग्टनला केला.

मराठी नाटक इंग्लंड, अमेरिका, जर्मन, दुबई, मस्कत, अरब, अमिराती, ऑस्ट्रेलिया येथे जाऊन थडकले असले तरी न्यूझीलंडमध्ये मात्र ते गेले नव्हते. सुमारे ४० लाख लोकसंख्या असलेल्या या छोट्या देशात सुसज्ज नाट्यगृहे आहेत. परंतु तेथे नाटकवेड्या मराठी माणसांची मात्र उपासमारच होत होती. ऑकलंड येथे मराठी माणसे अधिक प्रमाणात आहेत. त्यांचे ऑकलंड मराठी मित्रमंडळही आहे. 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' सारखी नाटकेही केली. मात्र भारतातल्या मराठी रंगभूमीशी त्यांचे आदानप्रदान आजवर नव्हते. यंदा गुढीपाडव्याच्या निमित्ताने दिलीप प्रभावळकार यांचा 'मुखवटे आणि चेहरे' या वनमॅन स्टॅण्डअप टॉक शो ऑकलंड, वेलिंग्टन येथे साडेचारशे प्रेक्षकांसमोर झाला. आता यानिमित्ताने मोठी नाटके नाही तरी छोटी नाटके आणि वनमॅन शो न्यूझीलंडमध्ये होऊ शकतील, असे वातावरण तयार झाले आहे.

### * नेरळ-कर्जत साहित्य संमेलन

मातृभाषेवर प्रेम करून तिचा प्रचार करा, असा सल्ला ज्येष्ठ साहित्यिक शं. ना. नवरे यांनी 'नेरळ-कर्जत साहित्य संमेलना'त दिला.



नेरळ वाङ्मय सेवा मंडळ संचालित साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक अण्णासाहेब बदले हे होते. व्यासपीठावर मंडळाचे अध्यक्ष सु. ना. देशपांडे, तहसीलदार किरण पाणबुडे, अनुसया पादीर, पोलिस निरीक्षक संजय बाबर आदी उपस्थित होते.

सध्याच्या जीवन पद्धतीबाबत मौलिक विचार मांडताना नवरे पुढे म्हणाले, हल्ली घराघरांत संवाद साधला जात नाही. संवाद साधला गेला तरच जवळीक साधली जाईल. दूरदर्शनच्या मालिकांनी सध्या गोंधळ घातला असला तरी त्यातील आनंद आणि सुखदुःख खरे वाटतात. त्याचा आनंद घ्यायला शिका.

साहित्य संमेलनाला ५० हजारांची देणगी देणाऱ्या सरला देशपांडे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अण्णासाहेब बदले यांनी नेरूळ गावचा इतिहास कथन केला. तीन दिवस चाललेल्या या संमेलनात डॉ. गिरीश ओक यांचे चिवित्रांगण, १५ एप्रिलला बालकवी संमेलन, कथाकथन, अष्टनायिका, दुपारी 'संत साहित्याने समाजाला काय दिले?' या विषयावर परिसंवाद, भरत जाधव यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'सही रे सही' नाटकाचा प्रयोग, १६ एप्रिलला सकाळी नऊ वाजता कवी संमेलन, दुपारी केशव मेश्राम यांच्या हस्ते बक्षीस समारंभ आणि रात्री 'गंगुबाई नॉनमॅट्रिक' हे नाटक असे कार्यक्रम झाले.

### * सर्वंकष दृष्टी असलेल्या नेतृत्वाची गरज

''अनेक क्षेत्रांमध्ये भारत वेगाने प्रगती करीत आहे. या क्षेत्रांना गरज आहे ती दीर्घ व सर्वंकष दृष्टी असलेल्या नेतृत्वाची. भारतात उदयाला येणाऱ्या नव्या नेतृत्वाला प्रतिभा, तंत्रज्ञानाची ओळख आणि सर्वांना सामावून घेण्याची दृष्टी या तीन गोष्टींची सर्वाधिक गरज आहे. आपल्या देशाला लाभलेल्या उज्ज्वल भूतकाळातून काही कल्पक; तसेच नवनिर्मितीक्षम विचार रुजविण्यासाठी नव्या नेतृत्वाने प्रयत्न करावेत,'' असे मत ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी व्यक्त केले.

'प्राग इंडस्ट्रीज'च्या २२ व्या वर्धापनदिनानिमित्त १० एप्रिल रोजी एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी 'लीडरशिप थ्रू पॅराडाइम शिफ्ट' यावर एचडीएफसी स्टँडर्ड लाइफ इन्शुरन्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दीपक सातवळेकर व कायनेटिक समूहाचे अध्यक्ष अरुण फिरोदिया यांचीही व्याख्याने झाली.

डॉ. माशेलकर म्हणाले, ''उत्पादन क्षेत्रात नवनवीन प्रयोग होण्याची गरज आहे. गेल्या वीस वर्षांत 'प्राज'तर्फे अनेक नवे प्रयोग यशस्वीरीत्या राबविण्यात आले आहेत. या प्रयोगशीलतेमुळे कंपनीने स्वतंत्र स्थान निर्माण केले असून, नव्या कंपन्यांनी याकडे डोळसपणे पाहावे.''

''सध्याची प्रगती उच्च वर्गापर्यंत सीमित आहे. ती सर्वसमावेशक नाही.

दीर्घकालीन व स्थिर स्वरूपाच्या प्रगतीसाठी ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे. सध्या आयटी क्षेत्र वेगाने विस्तारत असले तरी त्यातून दीर्घकालीन व मोठ्या स्वरूपाची रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता नाही,'' असे श्री. फिरोदिया यांनी सांगितले.

स्पर्धात्मक बाजारपेठेतही तत्त्वनिष्ठता व उच्च मूल्यांची जपणूक करणारे नेतृत्व टिकेल, असे दिपक सातवळेकर यांनी स्पष्ट केले.

श्री. प्रमोद चौधरी व सौ. परिमल चौधरी यांनी लिहिलेल्या 'एज इज व्हॉट इज' या पुस्तकाचे प्रकाशन श्री. फिरोदिया यांच्या हस्ते झाले.

*** 'तृतीयरत्न'चा प्रयोग**

महात्मा जोतिबा फुले लिखित 'तृतीयरत्न' या नाटकाला दीडशे वर्षे झाल्यानिमित्त महात्मा फुले वाड्यात नाटकाचा, नाशिकच्या व्हिजन या संस्थेतर्फे विशेष खेळ आयोजिण्यात आला होता. त्यापूर्वी नाटकांद्वारे प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या नाटककारांचा सत्कार प्रा. भगत यांच्या हस्ते करण्यात आला.

नाटक हा एक वाङ्मयीन कलाप्रकार असून, संवाद, व्यक्तिरेखा, रंगसूचना अशा कसोट्या जोतिबांनी लिहिलेले 'तृतीयरत्न' हे नाटक पूर्ण करते. त्यामुळे महात्मा फुले हेच भारतीय रंगभूमीच्या इतिहासातील आद्य नाटककार आहेत, असेही प्रा. भगत यांनी नमूद केले.

''शिवाजी महाराजांच्या जडणघडणीमध्ये दादोजी कोंडदेव यांचे फारसे महत्त्व नाही, हे सत्य जोतिबा फुले यांनी दीडशे वर्षांपूर्वीच सांगितले आहे. काही जणांना त्याविषयी आता समजले असले, तरी इतिहासातील जुन्या गोष्टी किती वेळा उगाळणार? त्यामुळे वर्तमानातील प्रश्नांचे भान सुटत चालले आहे,'' असे परखड मत नाट्य संमेलनाध्यक्ष प्रा. दत्ता भगत यांनी ११ एप्रिल रोजी व्यक्त केले.

वर्तमानात सध्या अनेक चळवळी सुरू आहेत; पण त्याला योग्य दिशा मिळायला हवी, अशी अपेक्षा व्यक्त करून प्रा. भगत म्हणाले, ''इतिहासजमा झालेल्या अनेक प्रश्नांना पुन्हा नवे रंग दिले जात आहेत. यामुळे वर्तमानातील खरे प्रश्न बाजूला पडत असून, इतिहास आणि वर्तमान यात अशीच गफलत करीत राहिलो, तर एक दिवस एकमेकांची डोकी फोडली जातील. हे टाळण्यासाठी वर्तमानाचे भान राखले पाहिजे.''

''महाराष्ट्र सरकारने जादूटोणा, अनिष्ट प्रथाविरोधी अधिनियम विधानसभेत मंजूर करून घेतले असले, तरी विधान परिषदेत मंजूर न झाल्याने अद्याप त्याला कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले नाही. महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांची नावे घेणारी मंडळी कृती करायची म्हटले, की मागे सरकतात, हेच यावरून स्पष्ट होते,'' अशी टीका डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी केली.

❐







# फुले आणि पत्री

माधुरी शानभाग

बालपणी... आसपास घडलेले पाहताना, ऐकताना, वाचताना आपल्या नकळत काही बीजरूपाने मनोभूमीत झिरपते. कालांतराने, डोळसपणा त्या बीजावर विचारांचा शिडकावा करतो. संवेदनशीलता त्यांना उबदार ठेवते. पहाटे फिरून गोळा केलेल्या फुले आणि पत्रीप्रमाणे या आठवणी एकत्र करून वाचकांसमोर मांडल्या आहेत. त्यात सलग सूत्र नाही. पण समधर्मी आठवणींचे फुलरंग,पानांची रसरशीत हिरवाई वाचनानंद जरूर देईल.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

# दखल

## प्रकाशन व्यवसायाला सर्वाधिक धोका पायरसीमुळे

**कुर्सवाला अहीम**

पॅट्रिशिया स्कॉट श्रोडर (Schroeder) या अमेरिकेच्या काँग्रेसच्या माजी सभासद असून त्या असोसिएशन ऑफ अमेरिकन पब्लिशर्स या संस्थेच्या प्रेसिडेंट व सीईओ आहेत. त्या बौद्धिक संपदा हक्काच्या कट्टर पुरस्कर्त्या आहेत. भारत आणि अमेरिका यामधील प्रकाशन व्यवसायातील प्रश्नांवर त्यांची मुलाखत टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रकाशित झाली होती.

प्रकाशन व्यवसायाच्या संबंधित अधिकारी व्यक्ती यांना ही मुलाखत उद्बोधक तर वाटेलच; पण त्याशिवाय योग्य प्रशिक्षण घेऊन प्रकाशन क्षेत्रामध्ये नव्याने येणाऱ्यांना मार्गदर्शक ठरेल.

***प्रश्न : सन २०१० पर्यंत भारत प्रकाशन व्यवसायाचे केंद्र बनेल. प्रकाशन व्यवसायातील आऊटसोर्सिंगचे एकूण मूल्य अमेरिकन डॉलर्स १.१ बिलीयन (५००० कोटी रुपये) इतक्यावर जाईल. हे कशामुळे होणार आहे?***

उत्तर : भारतात आपले काम आऊटसोर्स केल्यानंतर झालेले मूल्यवर्धन प्रकाशनगृहांना जाणवू लागले की भारतातील संपादकीय आणि प्रकाशनातील इतर क्षेत्रे यातील कौशल्ये वापरण्याच्या संधी वाढतील. भारतामध्ये पदवीधरांची विपुलता आहे. अधिक प्रभावीपणे आणि कमी खर्चामध्ये काम करणाऱ्या इंग्रजी भाषा जाणणाऱ्या लोकांची संख्याही मोठी आहे.

पण हा एक भाग झाला. या येणाऱ्या संधीचे सोने करायचे असेल तर भारताला काही बाबत सुधारणा करणे आवश्यक आहे.

***प्रश्न : हे मुद्दे कोणते?***

उत्तर : फेडरेशन ऑफ पब्लिशर्स अँड बुकसेलर्स असोसिएशन ऑफ इंडिया (FPBAI) या संस्थेच्या अंदाजाप्रमाणे भारतामध्ये प्रकाशन व्यवसायातील उलाढाल रु. ७५०० कोटी इतकी आहे. याच संस्थेच्या अंदाजाप्रमाणे प्रकाशनक्षेत्रात सुमारे २५% तोटा पायरसी (अवैध ग्रंथ मुद्रण व प्रकाशन) यामुळे झाला आहे. असोसिएशन ऑफ पब्लिशर्स इन इंडिया (API) नुसार हे नुकसान रु. २५०० कोटी इतके आहे. वॉशिंग्टन स्थित इंटरनॅशनल इंटलेक्युटल प्रॉपर्टी अलायन्स (IIPA) यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालाप्रमाणे नुकसानीचे हे प्रमाण ३९% भरते. हे सर्व अंदाज माफक स्वरूपाचे आहेत. याखेरीज अवैध फोटोकॉपिंग करणारा व्यवसाय आहे.

***प्रश्न : याखेरीज इतर प्रश्न?***

उत्तर : एक म्हणजे कॉपीराईट'प्रकाशकांनी गुंतवणूक बँकर्सप्रमाणे ग्रंथांमध्ये कॉपीराइटरूपी गुंतवणूक केलेली असते. आता कॉपीराईटवरच डल्ला मारला गेला तर प्रकाशकांकडे काहीच उरणार नाही. भारतातील न्यायालयामध्ये कॉपीराईटसंबंधी अनेक खटले वर्षानुवर्षे चालू राहिले आहेत.

दुसरा प्रश्न पाठ्यपुस्तकांचा आहे. दक्षिण आशियातील बाजरपेठेसाठी कमी किंमतीत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी अमेरिकेतील काही प्रकाशनगृहांनी येथे कार्यालये सुरू केली. हे सर्व उच्चशिक्षणासाठी लागणारी पाठ्यपुस्तके प्रकाशित करतात. आता होते काय आहे की ही कमी किंमतीची पाठ्यपुस्तके पुन्हा अमेरिकेत विक्रीकरता पाठवली जात आहेत. तीसुद्धा खर्चाच्या एकदशांश मूल्यात.

***प्रश्न : हे सर्व असेच राहिले तर भारताची जागा चीन घेईल असे तुम्हाला वाटते काय?***

उत्तर : अर्थात. इंग्रजी भाषेचा फायदा नसला तरी चीन या व्यवसायाला आपल्याकडे आकर्षित करेल. तेथे कायदा अंमलबजावणी करणारी यंत्रणा अधिक सक्षम व कडक आहे.

***प्रश्न : मग यावर उपाय कोणता?***

उत्तर : हा जटिल प्रश्न आहे. कॉपीराइट कायद्याची अधिक चांगल्या पद्धतीने अंमलबजावणी करावी याकरता आम्ही भारत सरकारशी संपर्क साधून आहोत. पाठ्यपुस्तकांच्या समस्येबाबत दोन्ही देशांमधील कस्टम्सच्या अधिकाऱ्यांनी जागरूक असणे आवश्यक आहे. हे लहान पाऊल आहे; पण पायरसीचा प्रश्न सोडवायला उपयुक्त होईल. पायरसी ही समस्या दूर होईपर्यंत, बाजारपेठेला चांगले दिवस येणार नाहीत.

सौजन्य- टाईम्स ऑफ इंडिया

अनुवाद- अविनाश पंडित

❐



# तसलिमा नसरिन- मुलाखत

**मुलाखतकार- विवेक सबनीस**

'लज्जा, 'फेरा' आणि 'नष्ट मेयेर नष्ट गद्य' अशा पुस्तकांमुळे जगभर गाजत असणाऱ्या वादळी व्यक्तिमत्त्वाच्या मानवतावादी लेखिका तसलिमा नासरिन नुकत्याच पुण्यात येऊन गेल्या. बांगला देशातून हद्दपार झालेल्या या बंडखोर लेखिकेने आपली पुरुषी वर्चस्वाच्या आधारलेली निर्भीड मते 'माय स्ट्रगल' या आपल्या भाषणातून मांडली. सतत पोलिस बंदोबस्तात फिरणाऱ्या तसलिमांच्या सर्व पुस्तकांच्या मराठी अनुवादाचे हक्क मेहता पब्लिशिंग हाऊसने घेतले आहेत. तेथेच तासभर गप्पा मारण्याची संधी मिळाली. पुणेरी वातावरणाने भारावलेल्या गंभीर स्वभावाच्या तसलिमा सुरुवातीला काहीशा गप्प असल्या तरी मग मात्र हळूहळू बोलू आणि हसूही लागल्या!

***कसं काय वाटलं तुम्हाला पुणं? कुठं कुठं फिरलात?***

पुण्याची ही माझी पहिलीच भेट आहे. फार छान आहे हे शहर! मोटरबाईकवर फिरणाऱ्या मुलींना पाहून तर मला अगदी आश्चर्य वाटलं. स्त्री स्वावलंबी आणि स्वतंत्र होत असल्याचं ते चिन्ह आहे. आमच्याकडे असं दृश्य पाहायलाही मिळत नाही! शिवाय मेहतांकडेही कामास मुली आणि महिलाच जास्त आहेत हे पाहून बरं वाटलं. 'आयुका'मध्ये डॉ. नरेश दधिच आणि राजा केळकर संग्रहालयामध्ये मी जाऊन आले, तसंच 'मिळून साऱ्याजणी' मासिकाच्या महिलांचीही भेट घेतली. माझ्या पुस्तकांवर स्वाक्षऱ्या देताना पुणेकरांशीही मी बोलत होतेच, पण या सर्व गडबडीत फिल्म इन्स्टिट्यूट पाहण्याचे मात्र राहून गेलं.

***एकंदर मराठी समाजाबद्दल तुम्ही पूर्वी काही ऐकलं वाचलं असेलच ना? पुण्याबद्दलची तुमची इमेज काय होती?***

महाराष्ट्र हे देशातले प्रगतिशील राज्य समजले जाते, हे कोल्हापूर आणि पुण्याच्या या भेटीत मला जाणवलं. इथला समाज हा पुढारलेल्या विचारांचा असावा असं वाटतंय. तसंच माझ्या सभांना झालेली प्रचंड गर्दी ही अनिल



मेहतांनी पैसे देऊन नक्कीच गोळा केली नव्हती! अर्थात केवळ इतक्या अल्पस्वल्प निरीक्षणावर मी कोणताही ठाम निष्कर्ष काढणार नाही, पण मराठी माणसाबद्दलचे माझे कुतूहल मात्र जागे झाले. पुण्याला पुन्हा यायला आवडेल. तेव्हा मात्र अधिक निवांतपणे येथे राहण्याची माझी इच्छा आहे. कदाचित पुढे मी मराठी आणि महाराष्ट्राबद्दल काही लिहीनही. पुणेकरांनी दाखवलेले प्रेम, सहानुभूती, आदरातिथ्य, मनाचा मोकळेपणा, मोठेपण यातच मी अजूनही अडकले आहे!

***महाराष्ट्राप्रमाणे आणखी कुठल्या राज्यांना तुम्ही भेटी दिल्या आहेत?***

आसाम, ओरिसा, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि बिहार येथे मी जाऊन आलेय. बिहारमधल्या स्त्रीची एकंदर अवस्था खूप वाईट असल्याचंही प्रकर्षानं जाणवलं. शिक्षणापासून लांब असणारी ही स्त्री शेकडो रूढी आणि परंपरांमुळे पेट्रियार्कल (पुरुषप्रधान) सोसायटीत स्त्री बांधली गेली आहे. तिथे तिची अवहेलना ही होणारच. दक्षिणेतल्या कोणत्याही राज्यांना मात्र अजून जाण्याचा योग जुळून आलेला नाही.

***पण विचारी स्त्री ही आता जागी होतेय असाही अनुभव तुम्हाला आला असेलच की?***

आर्थिक स्वावलंबन स्त्रीने नक्कीच मिळवलंय. त्यातून ती आज पतीच्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवू लागलीय आणि प्रसंगी घटस्फोटही घेऊ लागलीय. घरातली पत्नी ही नोकर नसून आपल्या बरोबरीची आहे, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची माणूस आहे हा संदेश त्यातून जाणं महत्त्वाचं आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या काळातही स्त्रीला गुलाम समजणारी मानसिकता मात्र फारशी बदललेली दिसत नाही. सुशिक्षित समाजातही हे चालूच आहे. माझं तर अगदी ठाम मत आहे की, स्त्री-पुरुष समानतेचा आग्रह न धरणाऱ्या आपली शिक्षणव्यवस्थाच मूलतः बदलायला हवी!

***पण आज आपल्याकडे अनेक ठिकाणी स्त्रिया आघाडीवर आहेत. लेखनातून आपले विचारही निर्भीडपणे मांडताहेत...***

निसर्गतःच पुरुषापेक्षा स्त्रीकडेच अधिक तरल अशी निरीक्षणशक्ती असते, म्हणूनच ती चांगलं लिहू शकते. पण आपल्याकडे आजही ही संधी तिला दिलीच जात नाही. किंबहुना, तिची क्षमता असूनही तिला शिक्षणापासून वंचित ठेवले जाते. रवींद्रनाथ टागोर कोणत्या शाळेत गेले होते? तरी त्यांनी महान कार्य करून दाखवलेच ना? केवळ विद्यापीठाच्या डिग्र्या मिळाल्या म्हणजे शिक्षण नव्हे. असे असते तर स्त्रीची छळवणूक, बलात्कार अथवा मुलांवरचे अत्याचार समाजात दिसलेच नसते. लोकशाही असूनही आपण स्त्रीच्या अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य कितपत जपतो?

***तुमच्या लिखाणाची सुरुवात कवितांमधून केलीत. नंतर कादंबऱ्या, स्तंभलेखन आणि विचारप्रवर्तक लेखही लिहिलेत. अजून कविता लिहिता?***

'निर्बाचित कविते'नंतर माझ्या 'कलेक्टेड पोएम्स'ही आताच आल्या आहेत. सध्या कोलकात्यात राहते. तिथेही माझं भरपूर लिखाण चालू असतं. सिनेमा, नाटकं, पेंटिंग्ज् पाहायला जाणं ही माझी आवडही सध्या पूर्ण करून घेतेय. सध्या हजारो डिव्हिडी जमवून तेथील फिल्म क्लब चळवळीतही सहभागी होते आहे. त्यातून जगभरातले चांगले सिनेमे पाहायला मिळतात. भारतातले एक महत्त्वाचे सांस्कृतिक शहर असणाऱ्या कोलकात्यात अभिजात भारतीय संगीतही ऐकायला मिळतं.

***लेखक म्हणून तुम्ही याकडे कोणत्या नजरेनं पाहता?***

मी स्वत:ला सर्वसामान्य माणूस समजते, म्हणूनच मला हवं ते करता येतं. प्रत्येक स्त्रीला मला हेच सांगायचंय की तुला जे वाटतं तेच तू कर. फक्त आपली इच्छाशक्ती त्यासाठी जबर असायला हवी. त्यामुळेच मी अजूनही तग धरून आहे, नाहीतर केव्हाच मृत्यूपंथाला लागले असते! आपल्याकडे रस्त्यावर कुत्र्याला मारलं तरी त्याचा आपण निषेध करतो, पण स्त्रीची मारहाण आपण गृहित धरलेली आहे. 'कृएल्टी रुल्स सोसायटी' असं जर मानलं तर सगळं संपलंच की! लेखक म्हणून माझा लढा या मानवी क्रौर्याशीच आहे.

***पाश्चिमात्य जगात वावरताना तुम्ही तिथली स्त्री स्वतंत्र आहे असं दिसलं का?***

अगदी शंभर टक्के नाही, पण तिथली स्त्री लिबरेटेड आहे. शेवटी 'ह्युमन राईटस्' हा विषय पौर्वात्य आणि पाश्चिमात्य जगातही तितकाच महत्त्वाचा आहे, कारण 'फ्रीडम इज फ्रीडम' हेच खरं! जगभरातल्या स्त्रीसाठी मी स्वतंत्र फोरम काढू शकत नाही पण त्यांच्यासाठी खूप लिहिते आणि त्यातून विचारांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करते. कोलकत्यात मात्र मला भेटायला येणाऱ्या महिलांशी मी सतत बोलत असते. विशेषत: संस्कारक्षम वयातल्या किशोरवयीन मुलींशी बोलायला मला खूप आवडतं.

***वृत्तपत्रांमधून तुम्ही वेळोवेळी स्तंभलेखन करता. भारतीय उपखंडातल्या पत्रकारितेबद्दल तुम्हाला काय वाटतं?***

आपल्यापेक्षा पाश्चिमात्य पत्रकारिता ही जास्त अभ्यासपूर्ण आहे, याचा प्रत्यय मला वेळोवेळी येतो. माझे साहित्य वाचल्याशिवाय माझ्याशी कुणीही बोलत नाही. भारतात मात्र याबाबतचा आळस मात्र दिसतो. सरकारचा दबाव या ना त्या निमित्ताने प्रत्ययालाही येतो. पण याचा अर्थ पाश्चिमात्य वृत्तपत्रे परिपूर्ण आहेत



असा अजिबात नाही. 'फ्रीडम ऑफ एक्सप्रेशन' असूनही अमेरिकन वृत्तपत्रे मात्र इराक वॉरमध्ये सरकारचीच तळी उचलताना दिसतात. तिथं अगदी 'न्यूयॉर्क टाइम्स'ही यास अपवाद नाही!

***तुमच्याप्रमाणे फतवा निघालेले सलमान रश्दी हे दुसरे लेखक आहेत. तुम्हाला त्यांचे लेखन कितपत आवडतं?***

पाश्चिमात्य जगात मला 'लेडी सलमान रश्दी' म्हणूनही ओळखलं जातं! पण आमच्या दोघांच्या दिशा पूर्ण भिन्न आहेत. त्यांच्यापेक्षा मला माझ्या लिखाणातून खूप वेगळं काही सांगायचं असतं. रश्दीपेक्षा मला भारतीय लेखकांपैकी अमिताव घोष यांचं साहित्य जास्त आवडतं. वाचकाला केवळ खूष करणारं लेखन मला आवडत नाही. सामाजिक उत्तरदायित्व, समान सत्ता आणि न्याय यावर माझ्या लिखाणाचा भर राहिला आहे.

***आज स्त्रीची प्रगती झाली म्हणजे ती लिबरेटेड झाली का?***

पुरोगामीपणाचा आव आणणाऱ्या बॉलिवूडमधल्या नट्या शेवटी काय करतात? हाऊसवाइफ म्हणून त्या नंतर सरेंडर होतातच ना? जर आपण रूढी-परंपरांनाच शरण जात असू तर त्या स्वातंत्र्याचा कितपत अर्थ आहे? आजही स्त्री-मुक्तीबाबत जर आधुनिक स्त्री वरवरचा उथळ विचार करत असेल ती पुन्हा मूळपदावर जायला वेळ लागणार नाही. पुरुषप्रधान संस्कृतीत तिला हवं ते तिनं मिळवलं आणि ती आनंदाने राहू लागली, अशी ही सोयीची वाटणारी छान-छान परीकथाही नाही!

**पण तुम्ही तर नेहमीच स्त्रीबद्दल सकारात्मक विचार करता...**

हो. मी पॉझिटिव्ह विचार करते आणि तिच्या भवितव्याबद्दल पूर्ण आशावादीही आहे. फेमिनिझम किंवा स्त्रीवाद हा आपल्याकडे नकारात्मक अर्थाने घेतला जातो म्हणून माझे विचार नकारात्मक वाटत असतीलही, पण स्त्रीवाद हा मानवतावादाचाच भाग असल्यामुळे तो सकारात्मक असाच अर्थ निर्माण करतो. त्यामुळेच मी आणि माझ्यासारख्या अनेक स्त्रिया त्यांच्या या सकारात्मक विचारांच्या शक्तीवर आज ना उद्या हे जग नक्कीच बदलून दाखवतील.

–विवेक सबनीस
पत्रकार, महाराष्ट्र टाइम्स.
vivek.sabnis@timesgroup.com



# वाचनवेडा राजाराम

अलीकडे मला छोट्या माणसांतील मोठेपणा शोधण्याचा छंदच लागलाय जणू. या नादात मला राजाराम मिळाला. तसं त्याचं नाव राजाराम पाटील. बी.ए.च्या तिसऱ्या वर्षात शिकतो, माझ्या महावीर महाविद्यालयात. मराठीत तो बी.ए. होणार. केव्हा होतो कुणास ठाऊक. यावर्षी परीक्षेचा फॉर्मच भरला नाही. का विचारले तर म्हणाला फॉर्म फी भरायला पैसे नव्हते. येणार कोठून नि कसे? दरमहा शे-पाचशे रुपयांची पुस्तकं खरेदी दो-अडीच हजार रुपये पगारात येत राहिली तर!

राजारामचं गाव निगवे, वडणग्याजवळचं. शेती-भाती नाही. समज आली तेव्हा तो कोल्हापूरला आला. अजब पुस्तकालयात हरकाम्या झाला. राजारामनं पुस्तकाच्या दुकानातच नोकरी करायचं ठरविलं होतं. त्याचं एकमेव कारण होतं वाचनवेड. घरची ओढग्रस्त परिस्थिती. ग्रंथालयाची वर्गणी भरायची इच्छा असूनही भरू न शकणाऱ्या राजारामनं वाचनवेड भागविण्याचा नामी उपाय शोधला. पुस्तकाच्या दुकानातच नोकरी करायची म्हणजे आपल्याला हवी ती पुस्तकं वाचायला मिळतील. पण असलं काय नि कसलं काय? गिऱ्हाईक उरकता-उरकता संध्याकाळ कशी व्हायची ते कळायचं नाही.

वाचनाचं वेड त्याला स्वस्थ बसू देईना. त्यानं पुस्तक विकत घेण्याचा उपाय शोधून काढला. दिवसभर काम करायचं नि रात्री सपाटून वाचायचं. शिवाय पुस्तकाचंच दुकान ते. रद्दीत निघालेली पुस्तकं वाचत त्याचं वाचन प्रगल्भ झालं. मराठीची जाण विकसित झाली. तो 'मेहता मराठी ग्रंथजगत', 'ललित', 'प्रिय रसिक', 'साहित्यसूची' वाचू लागला. निवडक पुस्तकं वेचून वाचायच्या छंदापोटी त्यानं एकदा शेजारच्या मेहता बुक सेलर्सच्या अनिलभाई मेहतांची विकेटच घेतली. त्यानं 'आहे मनोहर तरी' मागितलं. मेहता म्हटले, 'विकत घ्यावं लागेल.' राजाराम नम्रपणे निर्धाराने म्हणाला, 'विकतच मागतोय.' अनिलभाई उडालेच. आता राजाराम अधीमधी येऊन पुस्तकं खरेदी करू लागला. सारस्वत-पारखी अनिलभाईंनी त्याची साहित्यिक जाण जोखली नि आपल्या दुकानात ठेवून घेतलं.

राजारामची माझी गाठ अनिलभाईंकडेच पडली. मी एकदा संदर्भ शोधत होतो. त्या पिसाट अवस्थेत राजारामनं माझ्यापुढे विलक्षण पद्धतीनं ठेवलेल्या



पुस्तकांमुळे तर मी स्तिमितच झालो. कारण तो संदर्भ माझे विद्यापीठ व महाविद्यालयातील एम.ए. पीएच.डी. झालेले प्राध्यापक मित्रसुद्धा देऊ शकले नव्हते. तुम्हाला खरं वाटणार नाही. राजाराम 'ललित'चा वर्गणीदार आहे. त्याला पगार अडीच हजारच आहे, पण तो हुक्की आली की पाचशे रुपयांची पुस्तके खरेदी करतो. 'भाषिक कौशल्याचा विकास', 'शालेय प्रशासन', 'भावनिक बुद्ध्यांक', 'वंदे मातरम्', 'विचाराचा आविष्कार' अशी त्याने निवडलेल्या पुस्तकांची नावे असतात. रोज गावी सायकलने ये-जा करतो. बसचे पैसे वाचवितो नि वाचतो.

राजारामचं वाचनवेड पाहिलं की, माझ्या मनात येतं, मराठी शिक्षक, प्राध्यापकाची एखादी जागा कुठं निर्माण झाली की त्याला नेमावं. तो शैक्षणिकदृष्ट्या पात्र नसेल पण भाषा व साहित्याची त्याला असलेली जाण तो तथाकथित पात्र शिक्षकांपेक्षा विद्यार्थ्यांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचवू शकेल. कारण त्याच्यात वाचनाची न संपणारी तहान आहे. शाळा, कॉलेज, विद्यापीठातील वाचकांच्या प्रतीक्षेतील ग्रंथालयं राजारामसारख्या वाचनवेड्या तरुणांना मुक्तद्वार नि मुफ्तद्वार करून दिली तरच वाचनवेड वाढेल, जगेल! असं वाटतं.

**प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे**
**कोल्हापूर**

## विशेष वार्ता



# दिग्गजांच्या मांदियाळीत 'स्वामीकार' रणजित देसाई पुरस्कार सोहळा संपन्न

ज्येष्ठ गीतकार सुधीर मोघे यांच्याकडून पुरस्कार स्वीकारताना श्री. संदीप खरे

ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनादीदी, प्रख्यात कादंबरीकार विश्वास पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव तसेच विजया राजाध्यक्ष, दिग्दर्शिका-अभिनेत्री स्मिता तळवलकर, गीतकार सुधीर मोघे, कांचन घाणेकर आदी कला व साहित्यक्षेत्रातील दिग्गजांच्या उपस्थितीत आठ एप्रिल रोजी कोल्हापुरातील शाहू स्मारक भवनात 'स्वामी'कार रणजित देसाई पुरस्कार सोहळा संपन्न झाला. याच सोहळ्यात रणजित देसाई यांच्या कन्या पारु नाईक यांच्या 'मोहिनी' या कादंबरीचे तर 'स्वामी' कादंबरीच्या पंचविसाव्या आवृत्तीचेही प्रकाशनसमारंभ पार पडले.

मेहता पब्लिशिंग हाऊस फौंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या स्वामीकार रणजित देसाई पुरस्कारांचे यंदाचे सातवे वर्ष होते. 'संदीप खरे' यांना 'मौनाची भाषांतरे' या काव्यसंग्रहासाठी, 'अपर्णा वेलणकर' यांना 'लेडीज कूपे' या पुस्तकाच्या अनुवादासाठी तर 'डॉ. रणजित मिरजे' यांना 'दक्षिणायन- केपहॉर्न ते कॅरेबियन' या प्रवासवर्णनासाठी या पुरस्काराने गीतकार सुधीर मोघे यांच्या हस्ते गौरवण्यात आले. तसेच या तिन्ही पुस्तकांची मुखपृष्ठरचना करणाऱ्या चंद्रमोहन कुलकर्णी यांचाही याप्रसंगी सुलोचनादीदींच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना अपर्णा वेलणकर म्हणाल्या, '१९८९ साली दै. पुढारीचे तत्कालीन संपादक दत्ता सराफ यांची झालेली भेट ही आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. पत्रकारिता क्षेत्राची सूक्ष्म जाण दै. पुढारीच्या तत्कालीन मार्गदर्शकांमुळे झाली. आजचा पुरस्कार दै. पुढारीच्या त्या मार्गदर्शकांना व त्या वास्तूला मी अर्पण करत आहे.' दै. पुढारीची वार्ताहर म्हणून रणजित





पुरस्कार स्वीकारताना अपर्णा वेलणकर

देसाईंसारख्या दिग्गजांची मुलाखत घेताना आलेले अनुभव. सदर मुलाखतीत रणजितदादांनीच नवखेपणा हेरून मला सांभाळून घेण्याचा प्रसंग अशा रोचक आठवणींना वेलणकर यांनी उजाळा दिला. 'पुस्तक वाचनाचे संस्कार घडवणारे अनिल मेहता यांनी त्यांचे संपूर्ण दुकान माझ्यासाठी खुले केले. हवी ती पुस्तके घेऊन जा आणि आवडेल ते विकत घे असा त्यांचा दंडक होता. 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या पुस्तकाच्या अनुवादासाठी अनिलभाईंनीच माझाच पाठपुरवठा केला व ते पुस्तक अनुवादित करवून घेतले. त्या पुस्तकाला साहित्य अकादमीचा अनुवाद पुरस्कार लाभला. असा पाठपुरावा करणारे प्रकाशक दुर्मिळ आहेत,' अशा शब्दांत अपर्णा वेलणकर यांनी अनिल मेहतांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

डॉ. रणजित मिरजे यांनी 'दक्षिणायन' पुस्तक लिहिताना जाणवलेल्या स्पॅनिश, ब्राझिलियन शब्दांच्या उच्चारांच्या अडचणी यापासून ते प्रवासवर्णन शब्दबद्ध करताना ललित लेखनाचा वापर या मुद्द्यांचा ऊहापोह केला.

पुरस्काराविषयी कृतज्ञता व्यक्त करताना संदीप खरे यांनी सादर केलेल्या काही कविता करवीरवासियांची विशेष दाद मिळवून गेल्या. 'या पुरस्काराने माझ्यावर नकळत दर्जेदार निर्मिती करण्याची जबाबदारी टाकली आहे,' अशा शब्दांत खरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



पुरस्कार स्वीकारताना डॉ. रणजित मिरजे


कवी-गीतकार सुधीर मोघे म्हणाले, 'रणजित देसाईंसारख्या असामान्य साहित्यिकांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार माझ्या हस्ते दिला गेला. हाच माझ्यासाठी मोठा सन्मान आहे. हा मान मी आयुष्यभर जपून ठेवीन.'

तिन्ही पुरस्कारविजेत्यांच्या लेखनाविषयी

बोलताना मोघे म्हणाले, ''लेडीज कूपे' या पुस्तकाचा अपर्णा वेलणकर यांनी केलेला अनुवाद कुठेही उणीव जाणवू देत नाही. त्याचवेळी मूळ कलाकृतीविषयी सुद्धा उत्सुकता निर्माण होते. डॉ. रणजित मिरजे यांचे प्रवासवर्णन हा सुखद धक्का आहे. जातिवंत भटक्या माणसाने ते केलेले लेखन आहे. संदीप खरे या उमद्या कवीची 'मौनाची भाषांतरे' म्हणजे उद्‌गार आणि स्वगत यातला संवाद आहे. कविता कागदावर बोलकी होते याचीच ही साक्ष आहे.'

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते रणजित देसाईंच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. प्रास्ताविक आणि आभारप्रदर्शन मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता यांनी केले. सूत्रसंचालन नीना मेस्त्री नाईक यांनी केले.

**(रणजित देसाई पुरस्कार २००५)**




## दक्षिणायन

### केपहॉर्न ते कॅरिबियन

डॉ. रणजित मिरजे

दक्षिण अमेरिकेतील अर्जेंटिना, चिली, ब्राझील, व्हेनेझुएला, पेरू, बोलिव्हिया या सहा देशांचे एका जातीवंत पर्यटकाने केलेले उमदे प्रवासवर्णन.

किंमत २५० रु.





**अपर्णा वेलणकर या आजघडीला मराठी साहित्य क्षेत्रातील आघाडीच्या अनुवादक म्हणून ओळखल्या जातात. 'मेहता पब्लिशिंग हाऊस' तर्फे त्यांनी अनुवादित केलेल्या प्रत्येक साहित्यकृतीला अनेक दर्जेदार मान-सन्मान प्राप्त झाले आहेत.**


***द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज***

अरुंधती रॉय

साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार
फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स पुरस्कार

**३००रु.**





***स्पीड पोस्ट***

शोभा डे

मो. ग. तपस्वी स्मृती पुरस्कार

**२५० रु.**


***लेडिज कूपे***

अनिता नायर

रणजित देसाई स्मृती पुरस्कार

**२५० रु.**






***द ब्रेडविनर***

डेबोरा एलिस

जी. ए. कुलकर्णी स्मृती पुरस्कार

**१०० रु.**

# विशेष वार्ता

## ‘मोहिनी’त आढळतो समृद्ध लिखाणाचा वारसा

**विश्वास पाटील**



**‘मोहिनी’ कादंबरीचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर**

‘गवयाचं पोर सुरातच रडतं’ या म्हणीप्रमाणे रणजित देसाईंसारख्या अजरामर लेखकाची लेक या नात्यानं ‘मोहिनी’ या कादंबरीची निर्मिती करून पारु नाईक यांनी ही परंपरा चपखलपणे जपली आहे, असे मत प्रख्यात कादंबरीकार विश्वास पाटील यांनी व्यक्त केले.

सातव्या रणजित देसाई पुरस्कार सोहळ्यात ‘पारु नाईक’ यांच्या ‘मोहिनी’ या कादंबरीचेही प्रकाशन झाले.

‘जीवनातील मांगल्याचा शोध साहित्यकाराने घ्यायचा असतो.’ ‘मोहिनी’च्या या पहिल्याच कादंबरीच्या निमित्ताने पारु नाईक या कसोटीला पुरेपूर उतरल्या आहेत. या कादंबरीच्या पानोपानी ‘मोहिनी’ या मनोरुग्ण स्त्री व्यक्तिरेखेचे चित्र-चरित्र उभे राहते हीच लेखिकेची मिळकत आहे, असे विश्वास पाटील यांनी नमूद केले.

ज्येष्ठ समीक्षिका ‘विजया राजाध्यक्ष’ यांनी वेगळा विषय वेगळ्या धाटणीत मांडण्याच्या पारु नाईक यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. रणजितदादांकडून पारुला जो शब्दांचा समृद्ध वारसा मिळाला त्याचं तिने सोनं केलं. दादांच्या संस्कारांची



वाचनीय अनुभूती पारुची ‘मोहिनी’ वाचताना देते. यातच तिच्या लेखणीचे यश सामावले आहे असे नमूद करून राजाध्यक्ष पुढे म्हणाल्या, अस्सल कोल्हापूरी शब्दवापरातून कोल्हापूरच्या संस्कृतीशी नाळ जोडणारी आणि मनाला चटका लावून जाणारी ही कादंबरी आहे. यामागे पारूचा असणारा प्रयत्नवादी दृष्टिकोण आणि विषयाचा खोलात जाऊन अभ्यास करण्याची तळमळ तिच्या लेखणीतून पुरेपूर जाणवते. दादांच्या ‘स्वामी’प्रमाणेच चित्रप्राय लेखणीचे कौशल्य मोहिनीचीही उजवी बाजू ठरली आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव म्हणाले, दादांनी मराठी साहित्यवर्तुळाला आपल्या लेखणीने जो परिघ दिला आहे तो खरोखरच अव्वल असा आहे. त्यांच्या कन्या पारु यांच्या मोहिनीतूनही तोच वाङ्मयीन वारसा एखाद्या पैठणीसारखा झळकतो आहे.

आपल्या कादंबरीविषयी मनोगत व्यक्त करताना पारु नाईक म्हणाल्या, दादांनी लिखाणाकरिता मला नेहमीच प्रोत्साहन दिले होते. त्यांनी साहित्याच्या बाळकडूचं ऋण फेडण्याचा माझा हा प्रयत्न आहे. ‘स्क्रिझोफ्रेनिया’ या मानसिक आजाराने ग्रस्त असलेली नायिका किती प्रकारे झगडते हे या कादंबरीतून मी दर्शविले आहे.


# मोहिनी




बाळाच्या अचानक मृत्यूनं मोहिनी
स्किझोफ्रेनिक होते आणि... कुटुंबाची
होरपळ, उपचार आणि हळूवार जपणूक
याचा पट मांडणारी, मनाचा ठाव
घेणारी कादंबरी

**किंमत १६०रु.**

**पारू मदन नाईक**

## विशेष वार्ता

# रणजित देसाई हे मराठी साहित्यसृष्टीचे ‘स्वामी’

**डॉ. आनंद यादव**




**स्वामीच्या विक्रमी २५व्या आवृत्तीचे प्रकाशन करताना डॉ. आनंद यादव**

ग्रामीण साहित्य जेव्हा पांढरपेशा मराठी साहित्याच्या वळचणीला जगत होते, त्या काळात कोवाडसारख्या आडवळणी गावात मराठी साहित्याचा ‘स्वामी’ जन्माला आला. अशा शब्दांत डॉ. आनंद यादव यांनी रणजित देसाई यांच्या स्मृतीला अभिवादन केले.

सातव्या रणजित देसाई पुरस्कार सोहळ्यातच ‘स्वामी’च्या विक्रमी पंचविसाव्या आवृत्तीचे प्रकाशन झाले.

तमाम मराठी जनतेला मंत्रमुग्ध करणाऱ्या ‘स्वामी’ या कादंबरीने मराठी साहित्यविश्वात अजरामर स्थान प्राप्त केले आहे, असे गौरवोद्‌गार काढून डॉ. यादव पुढे म्हणाले, १९६२ साली रणजित देसाई यांची ‘स्वामी’ ही कादंबरी प्रकाशित झाली. त्याआधीही ते ग्रामीण कथा लिहीत असत. रणजितदादांच्या साहित्याचा स्पर्श आमच्या मनाला विद्यार्थिदशेतच झाला. दादांच्या लेखणीतून उतरणारी भाषा वाचताना माझ्यासारख्या शेतकऱ्याच्या पोराला ते आपल्याच गावातलं वर्णन वाचत असल्याची अनुभूती येते. कोल्हापूरच्या मातीने असंख्य प्रतिभावंत घडवले आहेत. दादांचं नाव त्या यादीत अग्रक्रमावर आहे. दादांच्या आजवरच्या साहित्याचा गाभा त्यांच्या ‘स्वामी’च्या प्रत्येक पानातून भरून उरला आहे. म्हणूनच स्वामी ही मनाच्या गाभ्यात जाऊन भिडते.



## विशेष वार्ता

# मान्यवरांनी उलगडले दादांच्या स्मृतींचे भावबंध

मेहता पब्लिशिंग हाऊस फौंडेशनतर्फे आयोजित सातव्या रणजित देसाई पुरस्कार समारंभाच्या निमित्ताने कोल्हापुरात कला व साहित्य क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली होती. यानिमित्ताने कोल्हापूर प्रेस क्लबने या सर्वांशी एकत्रित वार्तालाप आयोजित केला होता. त्या वार्तालापप्रसंसगी या मान्यवरांनी दादांच्या तसेच कोल्हापूरातील आठवणींना दिलेला उजाळा–

‘रंगल्या रात्री अशा’च्या निमित्ताने भालजी पेंढारकरांबरोबर प्रभातमध्ये रणजितदादांशी ओळख झाली. त्याचे बंध मैत्रत्वाच्या नात्यात कधी गुंफले गेले हे समजले नाही. कधी लहान मुलासारखा हट्ट करणारे दादा कधी कधी समजूतदारपणाचा कळस गाठत. दादांशी सूर जुळले आणि निर्व्याज नातंच आकाराला आलं. म्हणून कोवाडचं घर मला नेहमीच माहेरपणाची सावली देतं.

**–सुलोचनादीदी.**

दादांकडे मी नेहमीच आदर्श म्हणून पाहात आले आहे. दादांचा निखळ साहित्याविष्कार घडताना मी पाहिला आहे. इंग्रजी साहित्याचं प्रचंड वाचन, अगणित संदर्भांचा खजिना आणि ते मांडण्याची उपजत प्रतिभा ही दादांची समृद्धी होती. कोल्हापूरला येताना जी आत्मीयता, आपुलकी वाटते ती दादांसारख्या मोजक्या लोकांच्या ओढीतूनच.

**–विजया राजाध्यक्ष.**

दिग्दर्शिकेच्या नजरेतून पाहताना दादांची ‘मधुमती’, ‘अबोली’ या साहित्यकृतीतील प्रत्येक वर्णन कलाकृती बनवण्याची प्रेरणा देते. दोन ओळींमधला अर्थ शोधण्याची जी उर्मी असते, ती दादांच्या लेखनात होती म्हणूनच दादांची कादंबरी आजही पुन: पुन्हा वाचावीशी वाटते.

**–स्मिता तळवलकर.**

दादांचे लेखन वाचताना कुठेतरी आपल्या लेखनकौशल्यालाही प्रेरणा मिळत असल्याचे वाटते.

**–कांचन घाणेकर.**

साहित्यिक या नात्याने दादा महान होतेच. मात्र ते एक माणूस म्हणूनही खूप मोठे होते. तीन लाखांच्या घरात प्रती संपलेली त्यांची ‘स्वामी’ प्रकाशित करण्याची संधी मेहता पब्लिशिंग हाऊसला लाभली ही भाग्याची गोष्ट वाटते.

**–अनिल मेहता.**

दादा माझे फक्त वडील नव्हते, तर मित्र होते. मार्गदर्शक होते. आज माझी पहिली कादंबरी प्रकाशित होताना ते नसण्याची जाणीव कशानेही भरून निघणार नाही.


**–पारु नाईक.**


## साहित्याच्या अभ्यासकांना अत्यंत उपयुक्त असे संदर्भ ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| ● साहित्याची निर्मिती प्रक्रिया | डॉ. आनंद यादव | १३०रु. |
| ● १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह | डॉ. आनंद यादव | १५०रु. |
| ● साहित्याचा अन्वयार्थ | डॉ. नागनाथ कोतापल्ले | १५०रु. |
| ● मराठी कादंबरी - चिंतन आणि समीक्षा | चंद्रकांत बांदिवडेकर | १४०रु. |
| ● मराठी कादंबरीचा इतिहास | चंद्रकांत बांदिवडेकर | १७०रु. |
| ● वाङ्मयेतिहास - सद्यस्थिती आणि अपेक्षा | गो. म. कुलकर्णी/ द. दि. पुंडे | २००रु. |
| ● आयोजित समीक्षा - लक्षणे आणि पडताळणी | अरविंद कुलकर्णी | १२०रु. |






## मोहिनी

**स्किझोफ्रेनियाने भग्न केलेल्या संसाराची चटका लावणारी कहाणी**

**पारू मदन नाईक**

‘मोहिनी’ ही कादंबरी लिहिणाऱ्या पारू मदन नाईक या स्वामीकार रणजित देसाई यांच्या कन्या. आपल्या वडिलांच्या लेखनगुणांचा वारसा त्यांच्यातही उतरला आहे याची साक्ष या कादंबरीवरून पटते.

“या कादंबरीतील पात्रे आणि प्रसंग काल्पनिक आहेत. कोणा व्यक्तीशी यातील घटनांचे साम्य आढळले तर तो केवळ योगायोग समजावा” अशी सूचना कादंबरीच्या आरंभीच छापण्यात आलेली आहे. अशी सूचना आवर्जून छापण्यात येते तेव्हा तिच्यामागील गर्भित उद्दिष्ट हे अधिक प्रकर्षाने लक्षात येते आणि वाचकांना जणू ते अप्रत्यक्ष– आव्हानच असते, “शोधून काढा यातले खरे-खोटे काय ते!” लेखक-प्रकाशकांच्या या खेळामध्ये मग वाचकही सहजपणे सामील होतात; आणि खरे काय आहे हे ओळखूनही खेळाचे नियम पाळून ‘हा सर्व योगायोगच’ असे म्हणत कथा-कादंबरीचा आस्वाद घेण्यात रमून जातात. जवळच्या माणसांबद्दलचे सत्य सांगणे अवघड असते; ते सांगायला आणि पचवायलाही जड जाते. पण तरीही लेखक त्या अग्निदिव्यातून जाण्यासाठी तयार होतो, आणि त्यासाठी जरूर ती किंमत मोजतो– तेव्हा त्याच्याबद्दल सहानुभूतीच वाटू लागते. खरे-खोटे आणि योगायोग यांचा फारसा बागुलबुवा न करता, कादंबरीच्या त्या चौकटीत जे आले आहे त्यावरच लक्ष केंद्रित करणे आणि त्यामधील अंतर्गत सुसंगती शोधणे हेच वाचक म्हणून आपले परम कर्तव्य ठरते.

एक वाचक म्हणून ‘मोहिनी’च्या संहितेकडे पूर्ण अवधान देणे म्हणूनच इष्ट!

एक नामवंत सतारवादक प्रतापराव. खानदानी इनामदारांचे धाकटे चिरंजीव. म्हणून सरंजामशाही दरारा. वैभवशाली वाडा. नोकरचाकर.

त्यांचा विवाह मोहिनीशी होतो. मामलेदार शिवाजीराव यांची मोहिनी ही

**मोहिनी उंबरठ्यावरचं माप ओलांडून प्रतापरावांच्या वाड्यात प्रवेश करते. संसारात रमते. सतारही शिकू लागते. लाडकी पत्नी लाडकी शिष्याही होते. प्रतापराव तिच्यासाठी अत्यंत कलाकुसर केलेली सता मिरजेहून आणतात.**

कन्या. लग्नसोहळ्यात पंचक्रोशीतील हजारो लोकांची पंगत झडते. ''बेबी, सुखानं संसार कर. आजपासून प्रतापरावांचं घर ते तुझं घर.'' म्हणताना शिवाजीरावांचा, वडिलांचा गळा दाटून येतो. मोहिनी उंबरठ्यावरचं माप ओलांडून प्रतापरावांच्या वाड्यात प्रवेश करते. संसारात रमते. सतारही शिकू लागते. लाडकी पत्नी लाडकी शिष्याही होते. प्रतापराव तिच्यासाठी अत्यंत कलाकुसर केलेली सतार मिरजेहून आणतात.

मोहिनीला दिवस जातात. सासरी-माहेरी आनंदच आनंद. कोल्हापूरच्या रुग्णालयात नक्षत्रासारखी गोड मुलगी होते... राणीच्या बाललीलांनी वाडा गजबजून जातो...

दुसऱ्या वेळीही मुलगीच होते. 'राधा'ला हौसेखातर शर्टपँट घालून मुलासारखे वाढवले जाते.

तिसऱ्या वेळी मुलगा होतो. राम. आपण त्याला सतारवादक करू या म्हणत प्रतापराव त्याचे बारसे थाटात साजरे करतात.

परंतु चार महिन्याच्या रामला अचानक ताप येतो. डॉक्टर धावून येतात. औषधे, इंजेक्शने देतात... पण राम मोहिनीच्या मांडीवरच शेवटचा श्वास घेतो. ''अर्धा तास झाला बघा. आता कुठं शांत झोपलाय'' म्हणून मोहिनी त्याला कवटाळून बसते. डॉक्टर हादरतात. वहिनींना या शॉकमधून बाहेर काढायला हवं असं प्रतापरावांना सांगतात. दासी जना वहिनीसाहेबांकडून रामला घेते...

पुरुषमंडळी रामवर अंत्यसंस्कार करून येतात.

मोहिनी मात्र ''रामला आणा'' असाच मंत्र जपत राहते. ''डॉक्टर बघा ना, माझ्या रामला कुणी आणून देत नाही मला...''

डॉक्टर तिला त्या शॉकमधून बाहेर काढण्यासाठी म्हणतात, ''राम, आता परत येणार नाही. तो आपल्याला सोडून गेला आहे.''

मोहिनी त्यांच्याकडे विचित्र नजरेने बघते. स्वत:च्या खोलीत जाते. दार आतून बंद करून घेते... सर्वजण घाबरतात.

...कसाबसा ती दरवाजा उघडते. पण माझा राम कुठं आहे असा तिचा धोशा चालूच...

''अगं, राम या जगात नाही.'' म्हटलं तर मोहिनी प्रतापरावांच्या अंगावर धावून जाई.

अशा वेळी राणी-राधा यांना पलीकडच्या वाड्यात आपल्या काकांकडे रहायला



**''ही स्किझोफ्रेनियाची केस आहे. हा झटका आला की पेशंट व्हायोलंट होतो. तो झटका कधीही येऊ शकतो. एरव्ही पेशंट नॉर्मल असतो. पण झटका आल्यावर त्याचे वास्तवाचे भान हरपते. हिला शॉक ट्रीटमेंट देऊन बरे वाटेल.''**

पाठवले जाई.

डॉक्टरांनी सल्ला दिला– वहिनींना मिरजेला हॉस्पिटलमध्ये ठेवा.

प्रतापराव म्हणाले, ''तेवढं सोडून काहीही सांगा. हॉस्पिटलमधले वातावरण मोहिनीला सहन होणार नाही. ती वेडी थोडीच आहे? रामच्या जाण्याने तिला धक्का बसला आहे. तो धक्का ती विसरू शकत नाही.''

दुसऱ्या दिवशी पहाटेच मोहिनी उठून गावभर रामच्या शोधात गल्लीबोळातून फिरत राहिली. तान्ह्या मुलाला पाजणाऱ्या एका बाईच्या हातून त्या मुलाला जबरदस्तीने ओढून घेऊन आपल्या छातीशी कवटाळले. ''रडू नको रे माझ्या रामा. हे बघ मी आले ना तुझ्याजवळ'' म्हणू लागली.

..ती बाळाची आई धीराची. म्हणाली, ''वहिनीसाब, सापडला ना तुमचा राम... मग चला वाड्यात. त्याला भूक लागलीय. दूध पाजू त्याला...''

एकदा सतारवादनाच्या कार्यक्रमासाठी दूर जात असताना प्रतापराव मोहिनीला माहेरी सोडतात. तेथेही एका बारशाला गेल्यावर ती व्हायोलंट होते. माझं बाळ करीत विहिरीकडे धावते.

शेवटी प्रतापराव कृपामाई हॉस्पिटलमध्ये मोहिनीला दाखल करतात. डॉ. देव सिग्धार प्रतापरावांना सांगतात, ''ही स्किझोफ्रेनियाची केस आहे. हा झटका आला की पेशंट व्हायोलंट होतो. तो झटका कधीही येऊ शकतो. एरव्ही पेशंट नॉर्मल असतो. पण झटका आल्यावर त्याचे वास्तवाचे भान हरपते. हिला शॉक ट्रीटमेंट देऊन बरे वाटेल.''

पंधरा दिवसांनी पेशंटला प्रतापराव घरी नेतात. त्यावेळी डॉक्टर सल्ला देतात, ''पुन्हा झटका आला तर पेशंटला येरवडा मेंटल हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करा. तिथे उत्कृष्ट ट्रीटमेंट मिळेल.''

...एके दिवशी सतार वाजवायला प्रतापराव बसले तर मोहिनीने त्यांच्या हातातली सतार घेऊन स्वत:च ती वाजवणे सुरू केले... ऐकणारे थक्क!

रात्री मोहिनी जनाला लाथाबुक्क्यांनी मारते. प्रतापराव तिला आवरतात. तर ती प्रतापरावांचा सदरा फाडते. आरडाओरडा करते. डॉक्टर तिला झोपेचे इंजेक्शन देतात. थोरले बंधू दादा प्रतापरावांना म्हणतात, ''बाळ, स्वत:ला आवरा.''

''दादा, मी कुठं चुकलो का हो? बदल म्हणून हिला फिरायला घेऊन गेलो. मामासाहेबांनी पण माहेरी नेऊन सर्व प्रयत्न केले. हा परमेश्वर माझी काय म्हणून परीक्षा घेतोय?''

**मामासाहेब, तारुण्य कसंही निघून जातं. वृद्धापकाळ घालवणं फार कठीण... त्यासाठी मी हा लग्नाचा निर्णय घेतला आहे... मोहिनीला घटस्फोट द्यावा लागेल...**

तेवढ्यात मोहिनी डॉक्टरांवरच हल्ला चढवते. डॉक्टरांच्या कपाळातून रक्त भळाभळा वाहू लागते. प्रतापराव तिच्या कमरेला घट्ट धरून ठेवतात. विठोबा मोहिनीला खुर्चीला बांधतो. डॉक्टर पुन्हा इंजेक्शन देतात...

–मोहिनीला येरवडा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येते.

डॉ. देव तिला तपासतात. प्रतापरावांना धीर देतात. स्पेशल वॉर्डमध्ये ठेवण्याची व्यवस्था करतात. आवश्यक ती कागदपत्रे भरून घेतात.

रुग्णालयातील उपचार, इतर पेशंट स्त्रिया, त्यांच्या नाना तऱ्हा, मोहिनीच्या मूडमधील चढउतार, यांची माहिती विस्ताराने येते.

एकदा एक खिळा घेऊन मोहिनी स्वत:ला जखमा करून घेते... प्रार्थनेत भाग घेते...

एकदा राणी आईला पत्र पाठवते. ते पत्र वाचून मोहिनी अस्वस्थ होईल अशा भीतीने डॉ. साठे तिच्याकडे ते पत्र देण्याचे लांबणीवर टाकतात. पंधरा ऑगस्टला मोहिनी कार्यक्रमात सतार वाजवून दाखवते. सर्वजण टाळ्यांचा कडकडाट करतात. सोशल वर्कर मॅडम रानडे मोहिनीला शाबासकी देतात. ''तू लवकर बरी होशील'' म्हणतात.

मोहिनीचा भाऊ विक्रम तिला भेटायला येतो. त्याने आणलेला खाऊ ती बकाबका खाते... प्रतापरावांचा फोटो असलेला दैनिकाचा कागद टराटरा फाडते... ''मला ते विसरले बघा'' म्हणून डॉक्टरांकडे रडते.

टीनएजर्स राणी-राधा एकदार भेटायला येतात तर मोहिनी म्हणते, ''मला फसवता काय ग? माझी राणी सहा वर्षांची आहे आणि राधा चार वर्षांची... खोटं बोलताय तुम्ही... जा पाहू इथून. नाहीतर मार खाल माझा!''

डॉ. देव मोहिनीला सांगतात, ''मोहिनी, तुला हॉस्पिटलमध्ये येऊन दहाबारा वर्षे झाली. मग मुली मोठ्या नाही का होणार? त्या तुझ्याच मुली आहेत...''

पण मोहिनीला ते खरे वाटत नाही.

राणीची बाहुली ती हिसकावून घेते. बाहुलीचा मुका घेते...

राणी-राधा यांच्या शिक्षणाची सोय भोपाळला करण्यात येते. मावशीकडे.

नवीन सोशल वर्कर मंदाकिनी द्रविड मोहिनीची केस हातात घेतात. पंधरा वर्षांपेक्षा जास्त काळ रुग्णालयात असणाऱ्या पेशंटमध्ये मोहिनीची केस त्यांना जास्त इंटरेस्टिंग वाटते.



**द्रविडबाई एकदा मोहिनीला घेऊन कोल्हापूरला येतात. आईवडिलांना, भावंडांना भेटतात... मोहिनी घरी अगदी शहाण्यासारखे वागते. तेव्हा तिला डिसचार्ज देण्याचा निर्णय डॉ. देव घेतात...**

...एक दिवस प्रतापराव आपल्या श्वशुरांना भेटून सांगतात, ''मामासाहेब, आम्ही दुसरं लग्न करायचा निर्णय घेतला आहे. जिच्याशी मी लग्न करणार ती विधवा आहे. तिला पण तीन मुली आहेत... हे लग्न नसून एक वृद्धपणाची सोबत आहे... मोहिनी स्किझोफ्रेनियाची पेशंट आहे. ती कधीच बरी होणार नाही असं डॉक्टर म्हणतात... उद्या मुली लग्न करून सासरी जातील. मग मी एकटाच! मामासाहेब, तारुण्य कसंही निघून जातं. वृद्धापकाळ घालवणं फार कठीण... त्यासाठी मी हा लग्नाचा निर्णय घेतला आहे... मोहिनीला घटस्फोट द्यावा लागेल...''

शिवाजीराव अस्वस्थ होतात. त्यांचे मित्र गोविंदराव त्यांना समजावतात. ''बेबी १८ वर्षे रुग्णालयात आहे... एवढ्या वर्षांत प्रतापरावांचा विचार आपण कधी केलाय का? बिचाऱ्याला फक्त सतारीनंच साथ दिली... या निर्णयात काय गैर आहे? मोहिनीचे वडील म्हणून नाही, तर एक माणूस म्हणून प्रतापरावांचा तुम्ही विचार करा... मन मोठं करून परवानगी द्या.'' (पृष्ठ ११०)

द्रविडबाई एकदा मोहिनीला आळंदीला घेऊन जातात. ज्ञानदेवांच्या समाधीवर डोके टेकल्यावर मोहिनीत एकदम बदल घडून येतो. पहिल्यापेक्षाही ती शांत होते... स्वच्छ राहते- कामे करते.

शिवाजीराव मोहिनीला एका कागदावर सही मागतात. ''प्रतापरावांनी तुला सोडचिठ्ठी दिलीय. ते दुसरं लग्न करणार आहेत.''

मोहिनी म्हणते, ''चला सुटले बाबा. डोक्यात सारखे त्यांचेच विचार असायचे. त्यांच्या तब्येतीची काळजी वाटायची. बरं झालं. त्यांची काळजी घेणारं कुणीतरी येतयं. मी अशी वेडी! हे तरी किती वर्षं वाट बघणार?''

मोहिनी द्रविडबाईंना म्हणते, ''आबा आले. वाटले मला घरी नेतील. पण मी खरंच वेडी. मला कोण घरी घेऊन जाणार? आता मी इथंच राहणार. हेच माझं घर... हेच आपलं गोकुळ.''

मोहिनीत हळूहळू फरक पडत जातो.

एकदा दामिनी प्रतापरावांना न सांगता मोहिनीला भेटायला येते. मोहिनीची अवस्था बघून त्यांना रडू येते... द्रविडबाईंशी बोलून मोहिनीची चांगली व्यवस्था करायला सांगते. ''मला तुमची बहीण समजा...'' असं दामिनी म्हणते आणि विचारते, ''मी इथं कशाला आलेय हे माहीत आहे का तुम्हांला?''

मोहिनी म्हणते, ''हो. तुम्ही मला गावी घेऊन जाणार. आपण दोघी एकत्र

**ही कादंबरी स्किझोफ्रेनिया झालेल्या एका स्त्रीची आहे हे खरे आहे; पण ती स्किझोफ्रेनियाबद्दलची जनमानसातली जाणीव जागृती लिहिण्याच्या उद्देशानेही लिहिलेली आहे. अध्यात्माद्वारे त्यावर तोडगा सापडू शकतो असा विचार मांडण्यात येतो.**

राहणार. यांची सेवा करणार... आपण शेतावर फिरायला जाऊ. एकत्र सतार शिकू... जना, विठोबा बरे आहेत ना?''

प्रतापराव मग मोहिनीला भेटतात, ती त्यावेळी सांगते, ''अहो काय हे? किती थकलाय तुम्ही? सगळे केस पांढरे झालेत...''

प्रतापराव म्हणतात, ''अगं असं काय करतेस... तुझे केस पण पांढरे झालेत. राधाचं लग्न झालं. ती गरोदर आहे. आपण आजी-आजोबा होणार. राणीचंही यंदा लग्न झालंय...''

द्रविडबाई एकदा मोहिनीला घेऊन कोल्हापूरला येतात. आईवडिलांना, भावंडांना भेटतात... मोहिनी घरी अगदी शहाण्यासारखे वागते. तेव्हा तिला डिसचार्ज देण्याचा निर्णय डॉ. देव घेतात...

मोहिनी हॉस्पिटलमधून घरी येते... माहेरी राहते... जुन्या स्मृतींमध्ये रमते. ...प्रतापरावांचा आणि दामिनीचाही तोवर घटस्फोट झालेला असतो. ते तिला भेटायला अधूनमधून येतात. राधा-राणीही भेटायला येतात.

एकदा मोहिनीला राधा-राणी आपल्या वाड्यावर घेऊन येतात. जुन्या आठवणींना उजाळा मिळतो. सर्वांची त्या चौकशी करतात.

हॉस्पिटलमधल्या २२ वर्षांचीही कधीकधी याद येते. तेथील डॉक्टर्स, स्टाफ, द्रविडबाई...

आणि एक दिवस मोहिनीला पहाटेपहाटेच स्वप्न पडते...

आपण आळंदीला गेलो आहोत. ज्ञानदेवांच्या समाधीचं महत्त्व द्रविडबाईंनी समजावून सांगितलं. ''मला माझ्या गोकुळात पोचवा– असं मी ज्ञानेश्वर महाराजांना मागितलं... आता मी खरंच संपूर्ण गोकुळासह आळंदीला आले.''


ही कादंबरी स्किझोफ्रेनिया झालेल्या एका स्त्रीची आहे हे खरे आहे; पण ती स्किझोफ्रेनियाबद्दलची जनमानसातली जाणीव जागृती लिहिण्याच्या उद्देशानेही लिहिलेली आहे. अध्यात्माद्वारे त्यावर तोडगा सापडू शकतो असा विचार मांडण्यात येतो. पण तरीही आपल्या निकटवर्तीयांच्या आयुष्यातील एका अवघड अशा पर्वाचा हा घेतलेला शोध म्हणजे एका परीने कॅथार्सिसचाच प्रकार आहे. या भूमिकेतून पाहता हे लेखन करणे किती जड गेले असेल याची कल्पना येते.

ही कादंबरी वाचल्यावर 'मोहिनी'चा विसरण पडणे कठीण जाईल.

**पृष्ठे : २३२ ● किंमत : १६०रु. ● सभासदांना : १२०रु. ● पोस्टेज : २०रु.**




**अपंगत्वावर यशस्वीपणे मात करून फिनिक्स पक्षाप्रमाणे पुन्हा भरारी घेणाऱ्या काही प्रेरणादायक व्यक्तीमत्वांची ही चरित्रे, ही प्रेरक तर आहेतच मात्र अपंगत्वाकडे पाहण्याची नवीन दृष्टीही देतील.**




**स्वतःच्या अपंगत्वाशी जीवनातील संघर्षाशी लढून, अपंगांसाठी प्रचंड कार्य उभ करणाऱ्या, एका जिद्दी स्त्रीच्या यशाचं हे आत्मकथन.**

**चाकाची खुर्ची**

नसीमा हुरजूक

**किंमत १८०रु.**

**आपल्या मुलीच्या अपंगत्वाशी जिद्दीने लढणाऱ्या कुटुंबाची ही प्रयत्नगाथा.**

**फिटे अंधाराचे जाळे**

भालचंद्र करमरकर

**किंमत १२०रु.**







**शेवटच्या टप्प्यावर असलेल्या कर्करोगाशी प्रचंड मनोबलाने झगडून विजयी झालेल्या वीराची यशोगाथा.**

**द जॉय ऑफ कॅन्सर**

अनुप कुमार **अनु.** माधुरी शानभाग

**किंमत १५०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# लिव्हिंग हिस्ट्री

**राष्ट्राध्यक्ष पतीच्या मागे कसोटीच्या क्षणी भक्कमपणे उभे राहणाऱ्या हिलरी क्लिंटनचा धीरोदत्त बाणा**

**अनु. सुप्रिया वकील**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या आठ वर्षांच्या कारकीर्दीत (१९९३-२०००) अमेरिकेची सर्वांगीण प्रगती झाली, जनकल्याण योजनेचा लाभ घेणाऱ्यांनी त्या योजनेवर विसंबून राहण्याऐवजी रोजगाराकडे कायमचे वळावे यासाठी त्यांना मदत व प्रोत्साहन देणे यावर भर देण्यात येऊन, १ कोटी ४१ लाखांपैकी ८० लाखांना रोजगार लाभला– कोट्यवधी मातापित्यांना अर्धवेळ अल्पउत्पन्न नोकऱ्या देण्यात आल्या. त्यांना वैद्यकीय सुविधा, भोजन, किमान मोबदल्यात वाढ, करकपात याद्वारे रोजगारक्षेत्रात सामावून जाण्यास आधार देण्यात आला. दारिद्र्यरेषेखालील ऐंशी लाख कुटुंबांना त्यामुळे ती रेषा पार करणे शक्य झाले... इतरही क्षेत्रात खूप काही घडले. त्यामध्ये राष्ट्राध्यक्षांची पत्नी म्हणून हिलरी क्लिंटननेही सक्रिय पुढाकार घेतला होता... अमेरिकॉपर्सने दोन लाख तरुणांना नोकरीची संधी व महाविद्यालयीन शिष्यवृत्ती देऊन वेल्फेअर टू वर्क टू पार्टनरशिप ही संकल्पना प्रत्यक्षात आणली. १९९६ च्या निवडणुकीत बिल क्लिंटन यांना चांगले मताधिक्य मिळाले... फॅमिली लीव्ह लॉच्या कक्षा वाढवण्यात आल्या. दत्तक कायद्यात सुटसुटीतपणा आणण्यात आला. विद्यार्थी कर्ज, बालक व वृद्ध आरोग्य सुविधा, किमान वेतनवृद्धी याबाबत सुधारणा करण्यात आल्या. या सर्व बाबतीत हिलरी क्लिंटन पाठपुरावा करीत राहिली होती.

–पण याच दरम्यान मोनिका लेविन्स्की प्रकरण उघडकीला येते आणि बिल क्लिंटनच्या प्रतिमेला जबरदस्त हादरा बसतो. हिलरी क्लिंटनलाही त्यामुळे आपल्या पायाखालची जमीनच कोणी काढून घेतली आहे असे वाटते. परंतु पतीच्या मागे ती भक्कमपणे उभी राहते आणि त्यामुळे अत्यंत अडचणीच्या आणि बदनामीच्या



**राजकीय जीवनात असलेल्या प्रत्येक स्त्रीने आपली कातडी गेंड्यासारखी राखली पाहिजे हा मंत्र हिलरीच्या अंगी मुरलेला होता. त्यामुळे बऱ्याच गोष्टी सोसता येतात- पण एकाकीपणा उरतोच.**

त्या कालखंडातही बिल क्लिंटन अविचल राहतो. २१ जानेवारी १९९८ रोजी वृत्तपत्रात ती बातमी येते; तेव्हा बिल क्लिंटन सकाळीच पत्नीला लवकर उठवून सांगतो, ''आजच्या वृत्तपत्रात एक बातमी आहे. तिच्याबद्दल तुला कल्पना असायला हवी... व्हाइट हाऊसमध्ये शिकाऊ उमेदवार असलेल्या मोनिका लेविन्स्की या तरुणीशी माझे संबंध असल्याचा त्या बातमीत उल्लेख आहे.''

राष्ट्राध्यक्षांविरुद्ध काही फौजदारी स्वरूपाचे आरोप आढळतात का यादृष्टीने केनिथ स्टार यांच्या चौकशीकामाच्या दरम्यान विचारणा सुरू झाली होती.

या घटनेच्या संदर्भातील पार्श्वभूमी बिल क्लिंटन आपल्या पत्नीला स्पष्ट करून सांगतात. स्वयंस्फूर्तीने काम करणाऱ्या मोनिकाने नोकरी शोधण्याच्या संदर्भात बिल क्लिंटनची भेट घेऊन मदत मागितली होती. त्यावेळी त्यांनी तिचे म्हणणे सहानुभूतिपूर्वक ऐकून घेतले होते; पण त्याचा चुकीचा अर्थ घेऊन तिने निराधार आरोप केलेले आहेत. ''आपण कोणतेही गैरवर्तन केलेले नाही'' असे त्यांचे म्हणणे होते.

हिलरीला ते ऐकून नवरा खरा बोलत आहे की नाही हे नीट कळले नाही. लेविन्स्की प्रकरण हे राजकीय विरोधकांच्या व्यूहरचनेचाही भाग असू शकेल असेही हिलरीला वाटले. कारण अध्यक्षीय उमेदवारी जाहीर झाल्यापासून असे अनेक आरोप होत राहिले होते. आणि हिलरीलाही चोर, खुनी अशा विशेषणांचा मारा सहन करावा लागला होता.. या नव्या प्रकरणाने राजकीय संकट उभे राहणार हेही तिला जाणवले. राष्ट्राध्यक्षावर महाभियोग चालवावा, राजीनामा मागावा असाही पवित्रा विरोधी पक्ष घेऊ शकतात याची कल्पना तिला आली.

अशावेळी आपण या प्रसंगी खंबीर आहोत याची खात्री व्हाइट हाऊसमधील सर्व स्टाफला देणे जरूर होते.

हिलरी ते काम बरोबर बजावते. आपण या आणीबाणीला तोंड देणार आहोत आणि पूर्वी लढलो त्याप्रमाणे आताही लढणार आहोत असा निर्धार आपल्या देहबोलीद्वारे कर्मचाऱ्यांपर्यंत ती पोहोचवते. आपले सर्व कार्यक्रम नेहमीप्रमाणे चालू ठेवते.

बिल क्लिंटनबद्दलच्या बातम्या वृत्तपत्रे तिखटमीठ लावून देत होते; टीव्हीवरही हे प्रकरण चवदारपणे दाखवण्यात येत होते. हिलरीचीही अवस्था मोठी अवघड होत होती. लोक तिच्याबद्दल भलतीच कणव दाखवत होते. राजकीय जीवनात

**पण अमेरिकन जनतेने दोन सज्ञान प्रौढ व्यक्तींमधील परस्परसंमतीने होणाऱ्या संबंधांमध्ये काही गैर नाही असा पवित्रा घेतला. एखाद्या व्यक्तीच्या सार्वजनिक कार्यावर अशा संबंधामुळे प्रतिकूल परिणाम होतो असे अमेरिकन जनतेला वाटत नाही.**

असलेल्या प्रत्येक स्त्रीने आपली कातडी गेंड्यासारखी राखली पाहिजे हा मंत्र हिलरीच्या अंगी मुरलेला होता. त्यामुळे बऱ्याच गोष्टी सोसता येतात– पण एकाकीपणा उरतोच. आपण स्वत:भोवती हे कवच धारण करून, आपल्या भावभावनांचा छडा लावायला हवा आणि आल्या प्रसंगाला तोंड द्यायला हवे, असा निर्धार त्या करतात.

त्याच दिवशीच्या पत्रकारपरिषदेत त्या सांगतात, ''हे आरोप चुकीचे आहेत अशी माझी खात्री आहे.''

''बिल क्लिंटन यांच्यावर हे हल्ले का चढवले जात आहेत?''

''राष्ट्राध्यक्षपदाच्या त्यांच्या कायदेशीर वैधतेला सुरुंग लावण्यासाठी... राजकीयदृष्ट्या त्यांचा पराजय करणे शक्य नसल्याने त्यांच्यावर हे वैयक्तिक हल्ले होत आहेत...''

२७ जानेवारीला राष्ट्राध्यक्ष स्टेट ऑफ द युनियन अॅड्रेस संसदेपुढे देतात. त्या भाषणावर काँग्रेस सदस्य बहिष्कार टाकणार का अशीही चर्चा सुरू झाली. काही जणांनी तसा तो टाकलाही. हिलरीने पतिराजांना पूर्ण पाठिंबा दर्शविला. बिल क्लिंटन यांचे भाषण जबरदस्त व ठाशीव झाले.

...मोनिका लेविन्स्की प्रकरणाचा गाजावाजा होतच राहिला. मोनिकाशी क्लिंटन यांचे संबंध अयोग्य, अनैतिक होते याची हिलरीला कल्पना येते. ''सात महिन्यांपूर्वी ही गोष्ट मी तुला सांगू शकलो नाही'' म्हणून बिल क्लिंटन तिची क्षमा मागतात. हिलरीला रडू येते. ''तू माझ्याशी खोटं बोललास?'' ''मला माफ कर. मी तुला आणि चेल्सीला झळ पोहोचू नये असा प्रयत्न करीत होतो'' हे नवऱ्याचे म्हणणे ऐकून ती हतबुद्ध होते.

विवाहबंधनातल्या विश्वासाला मोठा तडा गेला होता.

आपल्या मुलीला हे कसं सांगावं असा प्रश्न तिला पडला.

त्यासाठी समुपदेशकाचा सल्ला घेण्यात आला.

हा तिच्या आयुष्यातला सर्वात उद्ध्वस्त करणारा, धक्कादायक आणि काळजाच्या ठिकऱ्या करणारा अनुभव होता...

अशा वेळी आपण मनोमन तसेच हृदयात एक शांत कप्पा शोधून, तिथे या भावभावनांचा उलगडा करून घ्यायला हवा असा विचार हिलरी करते.

बिल क्लिंटन यांना भावनिक दृष्ट्या बसलेल्या धक्क्याच्या त्याच काळात



**आगामी काळात आपली निवेदने आणि आपल्या कृती या देशाच्या भवितव्यावर परिणाम घडवणार आहेत हे जाणून आपण एका पारड्यात राष्ट्राध्यक्षपद दुसऱ्या पारड्यात आपलं विवाहबंधन यातलं कोणतं पारडं जड- हे ठरवायला हवं असा विचार हिलरी करते.**

साक्ष देण्यासाठी आणि राष्ट्राला उद्देशून देण्याच्या निवेदनासाठी तयारी करणे भाग होते.

त्याच सुमाराला आयर्लंडमध्ये अतिरेक्यांच्या टोळीने कार बाँबद्वारे २८ लोकांना मृत्यूमुखी धाडले... शांतता प्रस्थापना कार्यात बिल क्लिंटन यांनी आयरिश नेत्यांबरोबर बऱ्याच वाटाघाटी करून मार्ग काढला होता– त्या प्रयत्नाला खीळ बसली याचे दु:ख त्यांना झाले.

केनेथ स्टार आयोगापुढे बिल क्लिंटन यांनी चार तास साक्ष दिली.

त्याच रात्री बिल क्लिंटन यांना राष्ट्राला उद्देशून भाषण करायचे होते.

त्या भाषणाबद्दल वृत्तपत्रांनी नापसंतीचा सूर लावला **पण अमेरिकन जनतेने दोन सज्ञान प्रौढ व्यक्तींमधील परस्परसंमतीने होणाऱ्या संबंधांमध्ये काही गैर नाही असा पवित्रा घेतला.** एखाद्या व्यक्तीच्या सार्वजनिक कार्यावर अशा संबंधामुळे प्रतिकूल परिणाम होतो असे अमेरिकन जनतेला वाटत नाही– असे जनमत चाचण्यांद्वारे प्रकट झाले.

हिलरी क्लिंटन यांना या सर्व मन:स्तापापासून काही काळ दूर जायचे होते. त्या मार्थाज् वाइनयार्डमध्ये जातात. त्यावेळी वृत्तपत्रांना निवेदन देतात, ''हा श्रीमती क्लिंटन यांच्या आयुष्यातला सर्वोत्तम दिवस नाही ही गोष्ट स्पष्टच आहे. त्यांची सर्व भिस्त धार्मिक श्रद्धेवर यावेळी आहे.''

आपल्या विवाहबंधनातला उरलासुरला विश्वास दृढ करण्यासाठी काही मार्ग सापडतोय का याचा शोध त्यांना घ्यायचा होता.

''तुमच्या नवऱ्याचं तुमच्यावर खरंखुरं प्रेम आहे. तुम्ही त्यांना माफ करू शकाल'' असं मॉरिस टेम्पलमन सांगतात. तर ''अगदी दृढ वीण असलेली लग्नंसुद्धा संकटातून जात असतात... आपल्यापैकी कुणीच परिपूर्ण नसतं. आपण समुद्रपर्यटनाला जाऊ या'' असं वॉल्टर क्रांकाइट हे पत्रकार मित्र सांगतात...

त्यानंतर घरातला ताण कमी कमी होत जातो.

आपलं विवाहबंधन टिकेल का? टिकावं का?...

विवाहबंधनासाठी आपण लढायचं का? राष्ट्राध्यक्षपदासाठी लढायचं का?

वीस वर्षांहून जास्त काळ आपला पती, मित्र, सुखदु:खाचा भागीदार, मुलीचा प्रेमळ पिता असणारा बिल... त्यानं विश्वासभंग केला असला तरी वर्षानुवर्षे शत्रूंच्या हाती कोलित दिले गेलेले आहे; अशावेळी आपण त्याला

पाठिंबा द्यायलाच हवा असा निर्धार हिलरीचा होतो.

आपल्या नवऱ्यानं जे केलं ते नैतिकदृष्ट्या चूक होतं तसंच माझ्याशी खोटं बोलणं आणि अमेरिकी जनतेची दिशाभूल करणं हे चूक होतं असं हिलरी म्हणते; **पण नवऱ्याचं हे पतन म्हणजे देशाशी विश्वासघात नव्हता... बिलला न्यायासनासमोर खेचण्यास कोणताही सबळ आधार नाही.** केनेथ स्टार आणि त्याच्याशी संबंधित लोक या घटनेचा आकसबुद्धीनं गैरवापर करत असतील तर ही देशाच्या दृष्टीने भयावह बाब आहे... आगामी काळात आपली निवेदने आणि आपल्या कृती या देशाच्या भवितव्यावर परिणाम घडवणार आहेत हे जाणून आपण एका पारड्यात राष्ट्राध्यक्षपद दुसऱ्या पारड्यात आपलं विवाहबंधन यातलं कोणतं पारडं जड– हे ठरवायला हवं असा विचार हिलरी करते.

जगात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून बिल क्लिंटन यांनी अमाप परिश्रम घेतले होते. आयरिश, बोसनियन, सर्बियन, क्रोएटस, कोसोवार्स, इस्रायली, पॅलेस्टेनियन, ग्रीक, तुर्क, बुरून्डियन अशा अनेकांशी वाटाघाटी केल्या होत्या. याचा हिलरीला अभिमान असतो.

**बिल क्लिंटन यांच्यावर महाभियोग चालवणे हा कायद्याचा दुरुपयोग आहे असेही हिलरीला वाटत होते. मोनिस्की प्रकरण हा फारतर पत्नी व मुलगी यांच्या अखत्यारातला मामला आहे; राजकीय दबावासाठी ते वापरता कामा नये अशी हिलरीची भावना होती.**

महाभियोग नसावा असे ६० टक्के अमेरिकेचे जनमत होते.

या कसोटीच्या काळात दलाई लामा फोन करून भेट घेऊन हिलरीला सांगतात, ''माझ्या मनात नेहमी तुमची आठवण असते. तुमच्या संघर्षाचे स्मरण असते.'' दलाई लामा हिलरीला एक शुभ्र प्रेअर स्कार्फ भेट म्हणून देतात. 'दलाई लामांच्या त्या उद्‌गारांनी मला त्या काळात कटुता आणि संताप यांच्या आवर्तात गुंतून न पडता कणखर बनण्याची प्रेरणा दिली' असे हिलरींना वाटते.

–हिलरीचे हे आत्मकथन अमेरिकेत बेस्ट सेलर्स यादीत दीर्घकाळ झगमगत राहिले. मराठी वाचकांसाठी ते सुप्रिया वकील यांनी अनुवादित केले. अल्पावधीतच मेहता पब्लिशिंग हाऊसने ते प्रसिद्ध करून बाजारात आणले.

अमेरिकेतील एक कर्तृत्ववान महिलेची ही कहाणी अनेक अपरिचित परिचित तपशील घेऊन येते. एका अनोख्या विश्वासात घेऊन जाते. राजकारणाचे बारकावे दाखवते. वैयक्तिक जीवनातले कसोटीचे क्षण उलगडून दाखवते.

एक पत्नी, माता, मुलगी, बहीण, सून, वकील, कार्यकर्ती आणि कायदेतज्ज्ञ, सिनेटर म्हणून आपल्यापुढे एक संपन्न व्यक्तिमत्त्व उभे करते.

**किंमत : ४००रु. ● सभासदांना : ३००रु. ● पोस्टेज :३०रु.**





# दर्जेदार कन्नड साहित्याचे उत्कृष्ट मराठी अनुवाद



**वंशवृक्ष**

**डॉ. एस्. एल्. भैरप्पा**

**अनु. उमा कुलकर्णी**




महाभारताची एक विलक्षण प्रत्ययकारी अनुभूती देणारी कलाकृती.

**किंमत ३५०रु.**

सनातन धर्मपरंपरा आणि बदलती जीवनमुल्ये यातील संघर्षाचे कौटुंबिक पातळीवर उमटणारे भावकल्लोळ.

**किंमत १७०रु.**




**अवस्था**

**यू. आर. अनंतमूर्ती**

**अनु. उमा कुलकर्णी**

**सुधा मूर्ती**

**महाश्वेता**




सडलेल्या राजकीय, सामाजिक जीवनातूनही मानवी मूल्यांचे दर्शन घडवणारी कादंबरी.

**किंमत ११०रु.**

एका कोडाने ग्रस्त तरुणीची धीरोदात्त संघर्षकहाणी.

**किंमत १२०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**




# केतकर वहिनी

**कोकणातल्या एका खेड्यात खटल्यांना तोंड देत एकाकी जीवन खंबीरपणे जगणाऱ्या जिद्दी व्यक्तिमत्त्वाचे दर्शन**

**उमा कुलकर्णी**

'केतकर वहिनी' ही एक खरीखुरी जीवनकहाणी आहे आणि ती लिहिली आहे विख्यात अनुवादक म्हणून नावाजलेल्या उमा कुलकर्णी यांनी.

केतकर वहिनी या उमा कुलकर्णी यांच्या नातलग नाहीत; उमाताईंच्या एका मैत्रिणीच्या त्या आई. सहज म्हणून कोकणातल्या त्यांच्या गावी मैत्रिणीबरोबर उमाताई गेल्या आणि त्यांच्या आईच्या– केतकरवहिनींच्या– तेथील जीवनशैलीने भारावून गेल्या. पुढे पंधरावीस वर्षांच्या काळात अनेकदा भेटीगाठी होतात आणि त्यातून केतकर वहिनींचे वेगवेगळे पैलू उमजत गेले. तशात इ.स. २००० मध्ये केतकर वहिनींना आदर्श माता म्हणून पारखे मातोश्री पुरस्कार देण्यात आला; त्यामुळे त्यांच्या खडतर जीवनाचा आलेख काढण्याची कामगिरी उमाताईंवर येऊन पडली; आणि एका परीने 'केतकर वहिनी' या पुस्तकाचाही पाया घातला गेला. पुरस्कारानंतरच्या भेटींमध्ये केतकर वहिनी अधिकाधिक मोकळेपणाने पूर्वजीवनावर बोलू लागल्या. जुन्या घटनांचे चित्रदर्शी स्मरणरंजन करण्यात रस घेऊ लागल्या; आणि कोकणातल्या एका आडवळणाच्या गावात नवऱ्याच्या खुनानंतरही खंबीरपणे एकाकी राहून आपल्या २५० एकर शेतीची काळजी घेणाऱ्या, त्यासाठी कोर्टकचेऱ्यांमध्येही बेदरकारपणे जाणाऱ्या आणि गावातील लोकांवर योग्य ती जरब बसवूनही त्यांच्या आदराला पात्र झालेल्या केतकरवहिनींच्या जीवनसंघर्षाची ही कहाणी सिद्ध करण्याची प्रेरणा उमाताईंना मिळाली.

मालतीबाई माधवराव केतकर यांनी ऐंशीचा टप्पा ओलांडला आहे; आणि आज त्या पुणे शहरात राहात आहेत; पण त्या मनोमन करंबवण्याच्या केतकर वहिनीच आहेत अशी उमाताईंची भावना आहे आणि ती भावनाच 'केतकरवहिनी'च्या पानापानावर प्रकट होत असल्याचे जाणवते.



केतकर पंचक्रोशीचे खोत आहेत. त्यांना खूप मान आहे. लोक त्यांना गोड खोत म्हणून ओळखतात. त्यामुळे स्थळाचे पारडे आणखी वजनदार होते. ''तुम्ही आमच्या दारात लग्न लावून द्या म्हणजे झालं...''

केतकरवहिनींच्या आयुष्याबद्दल सर्वसामान्य वाचकालाही अप्रूप वाटावे अशा अनेक घटनांचे जास्त नाट्य या कहाणीत विखुरलेले आहे.

मुंबईतील मालाड उपनगरातील विष्णू धोंडदेव खरे यांची व्हर्नाक्युलर फायनल झालेली कन्या इंदू हिच्यासाठी कोकणातल्या करंबवणे गावचे स्थळ सांगून येते. नवऱ्या मुलाला एक भाऊ आणि दहा सुशिक्षित बहिणी. गावालगतची अडीचशे एकर जमीन. केतकरांकडे गेल्यावर आपल्याला पुढं शिकायला मिळेल हा विचार इंदूच्या मनात येतो– आणि ती मनोमन हे स्थळ आपले मानून चालते. आई आपल्या भावाला या केतकरांच्या गावी पाठवून परिस्थिती बघून ये सांगते. भाऊ येऊन सांगतो– केतकर पंचक्रोशीचे खोत आहेत. त्यांना खूप मान आहे. लोक त्यांना गोड खोत म्हणून ओळखतात. त्यामुळे स्थळाचे पारडे आणखी वजनदार होते. ''तुम्ही आमच्या दारात लग्न लावून द्या म्हणजे झालं...''

मुंबईहून मोठ्या बोटीने दाभोळची खाडी, लहान बोटीने दाभोळ ते गोवलकोट मार्गावरच्या 'करबोण'च्या किनाऱ्यावर वीसएक वधूपक्षीय मंडळी उतरतात. स्वागताला आलेल्या नोकराच्या हातातल्या मिणमिणत्या कंदिलाच्या उजेडात आपले सामान घेऊन तेथील धर्मशाळेत पोहोचतात. त्या धर्मशाळेत थोडं सामान ठेवून कोकणच्या भूतांचं, सापविंचवांचं भय पावलागणिक घोळवत, सारेजण उतरण्याची व्यवस्था केलेल्या गुरं बांधायच्या पक्क्या वाड्यात मुक्काम करतात. **वाटेत काकू म्हणते, ''हे काय हो? इतकी का मुलगी जड झालीय म्हणून या वनवासाला पाठवायची? आपण याच पावली माघारी वळू या. सोन्यासारखी पोर भुताखेताच्या तोंडी का द्यायची?''**

**त्यावेळी इंदीच्या मनात येते, ''आता आपण लग्न मोडून निघून गेलो तर केतकरांच्या घराण्याची या परिसरात केवढी बेअब्रू होईल! केवढं कीर्तिवंत घराणं! केवढं सुशिक्षित!''**

तीन दिवसांनंतरचा मुहूर्त! वेगवेगळे विधी. गावजेवण. त्यात कुळवाडी आणि इतर जातीचीच माणसं जास्त; ब्राह्मणडोकी अगदीच कमी हे बघून आई हैराण होते.

पण सासरकडून मुलीच्या अंगावर घातलेले भरपूर दागिने बघून सुखावते.

शेजारपाजार नसलेल्या पण माणसांनी गजबजलेल्या केतकरांच्या सुखनिवासात सासऱ्यांना मामा आणि सासूला आई म्हणत आपल्या पतीबरोबर नवपरिणित

**तीनचार डोंगरांमध्ये पसरलेले करंबवणे गाव. बांदरवाडी, सन्नाकवाडी, गावठाणवाडी, वरलीवाडी या चार कुळवाड्यांच्या वाड्या आणि बंदराजवळची बुद्धवाडी. मध्येच चांभाराची वस्ती. मुसलमानांची काही घरं. ब्राह्मणाची घरं फक्त तीनच.**

'मालती' राहू लागते. अविवाहित नणंद ठकूताईही तेथेच राही. नवऱ्याच्या नऊ बहिणी आणि धाकटे भाऊ शिक्षण-नोकरीच्या निमित्ताने आधीच गाव सोडून अन्यत्र राहायला गेलेले... तशात या लग्नाच्या वेळीच निमंत्रणावरून केतकर कुटुंबात तेढ आल्याने वाटण्या होतात. चिपळूणचे घर पुतण्याकडे जाते. जास्तीच्या जमिनीसाठी सोने देऊन करंबवण्याचे घर सासऱ्यांकडे राहते. हे घर एक गुंठा जागेवर चिऱ्याच्या पायावर बांधलेले. पडवी, बैठकीची खोली, माजघर, स्वंयपाकघर, कांडणाचं अंगण, आतलं अंगण... प्रचंड वाडा. न्हाणीघरं. साडेपाच एकरला चारी बाजूला दाट झाडी व छोटी भातेशेते.

तीनचार डोंगरांमध्ये पसरलेले करंबवणे गाव. बांदरवाडी, सन्नाकवाडी, गावठाणवाडी, वरलीवाडी या चार कुळवाड्यांच्या वाड्या आणि बंदराजवळची बुद्धवाडी. मध्येच चांभाराची वस्ती. मुसलमानांची काही घरं. सगळ्या वाड्या मिळून त्यावेळी चारपाचशेची वस्ती. ब्राह्मणाची घरं फक्त तीनच. केतकी, बिवली आणि मालदोली ही तीन जवळची गावं. दीडदीड तासाच्या चालण्याच्या अंतरावर. अडीच किलोमीटरवर बंदर. तेथे किराणा सामान मिळे. चिपळूण अठरावीस किलोमीटर. तेथे जाण्यासाठी डोंगर चढून; केतकी गावातून धबधब्यासारखे पऱ्हे पार करून जावे लागे. पायी यायचे नसेल तर चिपळूणवरून गोवळकोटपर्यंत पायी– तिथून नावेने करंबवण्याच्या बंदरापर्यंत.

अशी नाठाळ निसर्गाच्या आणि दुर्गम परिसरात राहूनही केतकर कुटुंब आपल्या परीने सुखवस्तू जीवन जगत होते. १९३८ साली त्या दुर्गम गावात केतकरांच्या घरात शिलाईचे मशीन होते. भरपूर भांडी होती, विहिरीवर पायरहाटानं पाणी काढून देण्यासाठी नोकर होते, पाच हॉर्सपॉवरचा डिझेलपंपही होता. मोठा गोठा होता. पेट्रोमॅक्स, घड्याळ, सायकल, टाइपरायटर– अशा शहरी सुखसोयींची चाहूल तिथवर पोहोचलेली होती.

इंदूचे यजमान माधवराव केतकर. कमालीचे पितृभक्त. शेतीवाडीची कामे दक्षतेने पाहणारे.

गाव लहान. अडीचशे एकर शेती. कुळांना दिलेली. पण कुळेही सर्वच काही सज्जन अशातला प्रकार नाही. कोणी अडवणूक करणारी. अजिबातच खंड न देणारी. कोणी जमीन बळकावून बसणारी. त्यामुळे कोर्टकचेऱ्या सारख्या चालू. कुळांच्या हिताचे नवे कायदे. त्यामुळे शेतीच्या संदर्भात खटल्यांवर खटले.



**कोर्टात खुनाचा खटला उभा राहतो. त्यांचे घड्याळ आणि अंगठी घेऊन मुंबईला पळालेल्या शिवा ऐरेला अटक करण्यात येते. ती घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या मुलाची साक्ष होते. शिवा ऐरे स्वतः गुन्हा कबूल करतो...**

माधवराव ते स्वत:च चालवत. त्यासाठी कायद्याचा अभ्यास करीत...

सागवानाची रोपे त्यांनी शेतात सर्वत्र लावलेली. आंबा आणि इतर फळांचे रस आटवून हवाबंद डब्यांतून शहरात पाठवायचे मनसुबे बाळगत...

इंदिराबाईंना चार अपत्ये होतात. दोन दोन वर्षांच्या अंतराने. मोठा प्रभाकर. त्यानंतर चतुरा, शोभा आणि शकुंतला या तीन मुली. पहिल्या तिघांना शिक्षणासाठी उज्जयिनीच्या घरात पाठवण्यात येते.

स्वातंत्र्योत्तर काळात संरक्षित कूळकायदा झाला. आपणच मालक असल्याच्या तोऱ्यात कुळे वागू लागली. खंड भरायची टाळाटाळ करू लागली. त्यामुळे कुळांवर खटले भरणे क्रमप्राप्त ठरले. निकाल बहुतेक केतकरांच्या बाजूने लागत. कुळे दुखावली जात. कधीमधी वादावादीचे प्रसंग येत.

**माधवरावांचा खून–**

१९५३ मध्ये आषाढी एकादशीला माधवराव कोर्टाच्या कामासाठी चिपळूणला जातात... सव्वीस जुलै या तारखेला चिपळूणला त्यांचे वडील कागदपत्रे घेऊन जातात. सत्तावीसला कोर्टात तारीख असते; पण माधवराव येतच नाहीत...

शोधाशोध सुरू होते. पोलिसांकडे तक्रार नोंदवली जाते. वृत्तपत्रात माधवराव बेपत्ता अशी बातमी येते. नातलग गर्दी करतात. भयानक पाऊस. आणि तेरा दिवसांनी माधवरावांचे प्रेत सापडते. मृतदेहाला दगड बांधून तो खाडीत टाकण्यात येतो. तो दगड सुटून देह वर येतो. दाभोळपर्यंत वाहत जाऊन भरतीच्या वेळी काठावर फेकला जातो. पोलीस पंचनामा करतात. कपड्यांवरून ओळख पटते. बारा ऑगस्टला ही बातमी करंबवण्याला कळते.

कोर्टात खुनाचा खटला उभा राहतो. त्यांचे घड्याळ आणि अंगठी घेऊन मुंबईला पळालेल्या शिवा ऐरेला अटक करण्यात येते. ती घटना प्रत्यक्ष पाहणाऱ्या मुलाची साक्ष होते. शिवा ऐरे स्वत: गुन्हा कबूल करतो... पण कोर्टात सर्वच्या सर्व अकराही आरोपी निर्दोष सुटतात. साक्षीदार उलट तपासणीच्या वेळी उलटतात. 'अण्णांनी घड्याळ माझ्याकडे दुरुस्तीसाठी दिले होते–' असे शिवा सांगतो.

गावातले वातावरण गढूळ होते. घरावर रात्रीबेरात्री दगड पडू लागतात. कोणीतरी धमक्या देते. घराभोवती कोणी तरी फिरताना जाणवते. सारेच धास्तावतात.

रात्री निवांतपणे झोप घेणेही शक्य होत नाही.

एकदा मामांना मारायला कोणीतरी घरात घुसतो... पण मामा धीर सोडत

**केतकरवहिनी त्या गावातच राहून आपल्या शेतीवाडीकडे लक्ष देतात. खंबीर होतात. कोणी नाहक टीका केली तर सौम्यपणे पण तोडीस तोड उत्तर द्यायला सरावतात. आपले वागणे चोख ठेवतात.**

नाहीत. गावकरी विरोधात असूनही खटल्यांकडे लक्ष देतात. कागदपत्रे हेच माझे साक्षीदार म्हणत ते आपली बाजू कोर्टात मांडतात. त्या कागदपत्रांचा अभ्यास केतकरवहिनीही करतात...

मुले ग्वाल्हेरला शिकायला होती. सुटीत ती येत. पण घराबाहेर राहिल्याने त्यांच्यावर वेगवेगळे संस्कार झाले. त्यांचे स्वभावही भिन्न भिन्न आहेत हे केतकरवहिनींना जाणवते.

**घरातच झालेला खुनी हल्ला—**

घरातच झालेल्या खुनी हल्ल्यामुळे मामा मनातून कुठेतरी हादरलेले असतात. आपले घर एखाद्या संस्थेला देऊन आपण वृद्धापकाळ शहरात काढावा असे त्यांच्या मनात येते. मात्र अशा संस्थेने आपल्या सुनेची आणि तिच्या मुलांची पूर्ण आर्थिक जबाबदारी विशिष्ट काळापर्यंत घ्यायला हवी ही त्यांची अट होती...

केतकरवहिनी त्या गावातच राहून आपल्या शेतीवाडीकडे लक्ष देतात. खंबीर होतात. कोणी नाहक टीका केली तर सौम्यपणे पण तोडीस तोड उत्तर द्यायला सरावतात. आपले वागणे चोख ठेवतात. **''आपल्याला नीट राहायचं असेल तर केवळ नीट राहून चालणार नाही. ते इतरांनाही दाखवावं लागतं.''** हे लक्ष्मीमामीचं सूत्रही व्यवस्थित आचरतात.

मामांना वार्धक्यामुळे चिपळूणला कोर्टात जाणे अवघड होऊ लागते तेव्हा केतकरवहिनींना ते म्हणतात, ''इंदे, दोन खटले सुरू आहेत. काय करायचं? ते पुढं सुरू ठेवायचे की कसं?''

स्वयंपाकपाणी, गुरांना चारापाणी, पाहुणेरावळे, आलागेल्याची ऊठबस, शिक्षणासाठी परगावी असणाऱ्या मुलांची काळजी, कसवातल्या कामांची व झाडांची काळजी, सासूसासऱ्यांची सेवा यातच तीस-बत्तीस वर्षे गेलेल्या केतकरवहिनी... खटले चालवण्याशिवाय इथं जगता येणार नाही हे वास्तव जाणून होत्या.

...तशात सासूबाईंचे निधन होते... सासरे हाय खातात. दोन महिन्यांनी तेही जगाचा निरोप घेतात...

**''तू तुझं पहा''—**

मुली येतात. अंत्यदर्शनासाठी आलेल्या बौद्धवाडीतल्या माणसांना आणि कृष्णा पाटील यांना एक नणंद बोलते, ''तुमच्यामुळे मामा गेले. आणि आता आलेत मोठे दर्शन घ्यायला.'' त्यामुळे ती माणसे दर्शन न घेता जातात...



**''भावनेच्या भरात जाऊन कुठलेही पाऊल उचलायचे नाही. इथे राहायचे असेल तर सर्वप्रथम आपल्या मर्यादा ओळखून राहिलं पाहिजे... इथली माणसं केवळ खडूनं लिखापढी केली म्हणून घाबरून मागं सरण्यासारखी नाहीत.**

त्याचबरोबर या नणंदा घरातली रोख रक्कम दान करून टाकतात. आणि वहिनीला म्हणतात, ''तू तुझं पहा. एवढ्या जमिनी आहेत. त्यांचं काहीही कर. पण यानंतर तुझ्या मुलांचं शिक्षण आणि त्यांची लग्नं हे तुझं तू बघायचं... कुळांकडून खंड वसूल कर. हवं तर शेत विकून टाक. त्यातून तुझा आणि मुलांचा खर्च भागव.''

**उत्तरार्धात खटल्यांचा ससेमिरा—**

१९६० साली सासरे वारले; आणि केतकरवहिनींना आपल्या घरादाराची, शेतीवाडीची, कोर्टकचेऱ्यांची सगळी जबाबदारी उचलावी लागली.

या पुस्तकाचा उत्तरार्ध त्यांच्या हिंमतीची, दक्षतेची, संघर्षाची कहाणी सांगणारा आहे.

गावातील बहुसंख्य लोक या एकट्या राहणाऱ्या बाईला येथून कसे हुसकावून लावावे याच्या योजना आखण्यात मग्न. त्यासाठी कोर्टकचेऱ्यात खोटेनाटे खटले दाखल करण्यात तत्पर. खंड बुडवण्यात, जमिनीवर अतिक्रमण करण्यात अग्रेसर. त्यांना घाबरवून टाकण्यासाठी रात्रीबेरात्री घराभोवती लोक फेऱ्या मारत. झाडावरची फळे काढत. भुताखेताची भीती दाखवत. जवळपास वाघाची पावलं अधूनमधून दिसत. सापविंचवाचा वावर असे. कधी आग्या मोहोळ उठे. सागवानाची झाडं कोणी तोडून नेई. पकडले तर धमक्या देत. पंचनामा होऊनही हे प्रकार कमी होत नसत. पण शांत राहावे लागे.

''भावनेच्या भरात जाऊन कुठलेही पाऊल उचलायचे नाही. इथे राहायचे असेल तर सर्वप्रथम आपल्या मर्यादा ओळखून राहिलं पाहिजे... इथली माणसं केवळ खडूनं लिखापढी केली म्हणून घाबरून मागं सरण्यासारखी नाहीत. त्याचबरोबर प्रकरण तडीस नेण्यापर्यंत पेलणार नसेल तर योग्य वेळी माघार घेऊन मानानं तडजोड करून मोकळं व्हायचं.'' अशी काही सूत्रे समोर ठेवून केतकरवहिनी त्या अस्वस्थ आणि विपरीत वातावरणात खंबीरपणे पाय रोवून तब्बल तीसपस्तीस वर्षे संघर्ष करीत राहिल्या याचे खरोखरच अप्रूप वाटते.

सासूसासऱ्यांच्या मृत्यूनंतर तीन गावांत पसरलेल्या अडीचशे एकरांच्या शेतीवाडीचा पसारा सांभाळण्याची जबाबदारी एकट्या केतकरवहिनींवर पडली. खटल्यांच्या नोटिसा येत, तारखा पडत तेव्हा त्यांना सामोरे जाणे अटळच ठरले. मुलांची शिक्षणं, लग्नं आणि चरितार्थ चालवायचा तर हाती असलेली

**आपल्या जमिनींची माहिती त्या मिळवतात. त्यांच्या चतुःसीमा, त्यातील कुळे वगैरे सर्व माहिती त्यांना होते. मामांची डायरी त्यासाठी कामाला येते. गावात मानानं राहायचं असेल तर कायद्याची लढाई लढतच राहावी लागणार ही खूणगाठ त्या मनाशी बाळगतात.**

शेती व्यवस्थित राखायलाच हवी. इथली माणसं ओळखून त्यांच्याशी जुळवून घेत आणि प्रसंगी टक्कर देत राहायला पाहिजे– हे त्यांना कळून चुकले. (९४)

चिपळूणला जाऊन साने वकीलांना भेटून केतकरवहिनी मुखत्यारपत्रासाठी तलाठ्याकडे अर्ज करतात. मामांच्या माघारी सोळा वारस. साधा सातबाराचा उतारा घ्यायच्या अर्जावरही सोळा जणांच्या सह्या लागणार. तेव्हा तलाठीच सुचवतो की एकत्र कुटुंबप्रमुख म्हणून तुम्ही तुमचं नाव लावून घ्या. जमिनीवर मालकी मात्र ज्याची त्याची राहील. तसा अर्ज केल्यावर तहसीलदार पंधराजणांना नोटिशी पाठवतात. कोणाचाही आक्षेप येत नाही... मुखत्यारपत्र मिळते.

नंतर प्रत्यक्ष मामलेदारापुढे खटला चालवणे. त्यात साने वकील मार्गदर्शन करतात. त्यांचा आत्मविश्वास वाढवतात.

पहिल्याच केसमध्ये केतकरवहिनींच्या बाजूने निकाल लागतो. मनावरचे दडपण कमी होते.

खाजणाच्या जमिनीत तेराजणांनी आपली नावे कुळे म्हणून लावल्याने ते प्रकरण नंतर त्या हाती घेतात. दावा लावतात. या तेरा जणांची नावे चुकीची लावली आहेत. ती कमी करावी असा त्यांचा मुद्दा. जमीन खाजणाची असल्याने इथे कुळकायदा लावण्याचा प्रश्नच येत नाही हा त्यांचा युक्तिवाद मामलेदार मान्य करतात. निकाल त्यांच्या बाजूने लागतो. या दोन खटल्यांमुळे गावात त्यांचा दबदबा वाढतो. लोक त्यांना टरकून राहू लागतात.

तरीही खटल्यातून खटले निघत राहतात.

आपल्या जमिनींची माहिती त्या मिळवतात. त्यांच्या चतु:सीमा, त्यातील कुळे वगैरे सर्व माहिती त्यांना होते. मामांची डायरी त्यासाठी कामाला येते. गावात मानानं राहायचं असेल तर कायद्याची लढाई लढतच राहावी लागणार ही खूणगाठ त्या मनाशी बाळगतात. (पृष्ठ १०१) त्यांना खुनाच्या धमक्या पाठवल्या जातात तेव्हा त्या खान नावाच्या पोलिस अधिकाऱ्याकडे जातात. खानसाहेब त्यांच्या पाठीशी असल्याचे आश्वासन देतात. त्यानंतरचे पोलीसप्रमुखही ते पाळतात. केतकरवहिनींना त्रास देणाऱ्या सैनिकाला पोलीस प्रमुख दम भरतात, ''तुला नीट नोकरी करायची आहे ना? मग गावच्या राजकारणात शिरू नकोस. नोकरी गमावून बसशील.'' तेव्हा त्या सैनिकाचा सगळा रुबाब झटकन उतरतो.

पोलिस स्टेशन ही सभ्य बायकांनी येण्याची जागा नव्हे असे खानसाहेब



**कोकणातले हे चारपाचशे वस्तींचे गाव. शंभरदीडशे घरांचे गाव. पण केतकरवहिनींच्या वाट्याला या गावातल्या अनेक कुटुंबाचे विपरीत वर्तनच येते. अनेकजण अनधिकृत कब्जा करतात. खोटे खटले भरतात. खंड थकवून वर शिरजोरी करतात.**

म्हणतात. पण पोलिसखात्याने त्यांना नेहमीच चांगला अनुभव दिला आहे, असे केतकरवहिनी आवर्जून सांगतात. (पृष्ठ १०३)

कोकणातले हे चारपाचशे वस्तींचे गाव. शंभरदीडशे घरांचे गाव. पण केतकरवहिनींच्या वाट्याला या गावातल्या अनेक कुटुंबाचे विपरीत वर्तनच येते. अनेकजण अनधिकृत कब्जा करतात. खोटे खटले भरतात. खंड थकवून वर शिरजोरी करतात. हक्कशाबिती आणि नुकसानभरपाईसाठी केतकरवहिनींना सारखे जागरूक राहावे लागते. या लोकांच्या वागण्यातला खोटेपणा, बेरकीपणा, स्वार्थीपणा– यांना सीमा नाही.

केतकरवहिनींच्या जमिनीवर एसटीचा थांबा केला जातो. त्यांना अजिबात न विचारता. तेव्हा गावाच्या विरोधात केतकरबाईंना एकाकी उभे राहून दाद मिळवावी लागते.

मुख्यमंत्री बॅ. अंतुले यांच्या कारकीर्दीत अशा कुळांच्या खटल्यांचे प्रमाण खूप वाढते. केतकरवहिनींच्या बाजूने पांडुरंग शिगवण केसचा निकाल लागतो तेव्हा ढोल वाजवून त्या जमिनीचा ताबा घेतात. पंधरा वर्षे त्यांना ही केस लढवावी लागलेली असते.

प्रॉमिसरी नोटा लिहून घेऊन काहींना व्यवसायासाठी पैसे दिल्यावरून, अनधिकृत सावकारीबद्दल केतकरवहिनींच्या घरावर छापा टाकण्यात येतो. त्या सांगतात– प्रॉमिसरी नोटवर पैसे देणे ही सावकारी नाही. त्यासाठी लायसन्सची गरज नसते. तपासणी अधिकाऱ्यांना त्यामुळे निमूट काढता पाय घ्यावा लागतो. (पृष्ठे १४५)

सावर्ड्याच्या शाळेतला शिक्षक गोंधळी कोर्टाकडून सूट मिळवतो, पण नंतर जप्तीची नोटीस पाठवतो. ''या बाईला कुठं पोचवतो ते बघा'' अशी फुशारकी मारतो. तेव्हा केतकरवहिनी त्याच्या पगारातले पैसे कापून घेण्यासाठी बीडीओला तयार करतात. मुद्दल वसूल होते. (पृष्ठे १४७)

मुलामुलींची लग्ने यथावकाश होतात. मुले मार्गी लागतात.

आपल्या निवासस्थानाची जागा माधव वासुदेव न्यासाला देऊन, विश्वहिंदूपरिषदेकडे त्याची व्यवस्था त्यांनी सोपवली. तेथे वसतिगृह काढण्यात आले आहे. तिथं राहून मुले चिपळूणला जाऊन-येऊन शिक्षण घेऊ शकतात. घराचा मोठा भाग न्यासाला दिला असला तरी काही भाग सामाईक ठेवला आहे. सगळीकडे लक्ष ठेवणे त्यामुळे संस्थेला सोयीचे ठरते. (पृष्ठे १५८)

**''कोकणातील अशा वातावरणात राहिल्याने आपल्या कर्तृत्वालाही मर्यादा पडल्या. आधुनिक जीवनाची जी स्वप्ने पतीने वा सासऱ्यांनी रंगवली होती, ती प्रत्यक्षात आणता आली नाहीत''**

केतकरवहिनींना आज काय वाटते?

''खटले भरून मला कधीच पैसा करायचा नव्हता. पैसा मिळवायचा असता तर– ती विकत द्या म्हणून आलेल्या ऑफर्स स्वीकारता आल्या असत्या. राहतं घर आणि परसाव यासाठी एक मुसलमान गिऱ्हाईक दहा लाखाची रक्कम द्यायला तयार होता. तोही चाळीस वर्षांपूर्वी. शेती विकून पुण्यामुंबईत बंगला बांधून राहणारे अनेक लोक त्यावेळीही होते.'' कुळांबरोबरचे संबंध चांगले राहावेत असा त्यांचा प्रयत्न असे. एकतर खंड वेळेवर द्या, नाहीतर जमिनी रीतसर विकत घ्या. हवं तर हप्त्यानं रक्कम द्या... पण अनेक कुळांना जमीन फुकटात हवी असे. तलाठ्याला पैसे चारून काहीजणांनी आपली नावे लावून घेतली. तेव्हा त्यांच्याशी लढणे भाग होते. पैसा मिळवणं व साठवणं हे ध्येय मुळातच नसल्याने अनेक खटले त्यांनी तडजोडीने मिटवले. सरकारी दरापेक्षा कमी रकमेत कुळांना जमिनी विकल्या. ''कोकणातील अशा वातावरणात राहिल्याने आपल्या कर्तृत्वालाही मर्यादा पडल्या. आधुनिक जीवनाची जी स्वप्ने पतीने वा सासऱ्यांनी रंगवली होती, ती प्रत्यक्षात आणता आली नाहीत'' अशी खंत त्यांना वाटते.

माधवरावांचा खून करणाऱ्या आरोपी व्यक्तींनी पुढच्या काळातही वैर चालवले. वहिनींना नाना परींनी त्रास दिला. खटले चालवले.

वहिनींच्या जमिनीत गावकऱ्यांनी देऊळ बांधले. न विचारता. तेव्हा बाईंनी ते बांधकाम बेकायदेशीर आहे अशी तक्रार केली. मंदिराला ती जमीन विकत द्या असे काही पुढाऱ्यांनी मगरूरीने म्हटले तेव्हा वहिनींनी म्हटले, ''विकत? नको रे बाबा. देवळासाठी जमीन विकत देऊन मला कुठं घरावर सोन्याची कौलं चढवायची आहेत?'' तेव्हा रीतसर कागदपत्रे करण्यात येतात.

पासष्ट वर्षे कोकणात काढल्यावर आता त्यांनी सगळे खटले आवरते घेतले. जमिनींचे व्यवहार पुरे करत आणले.


ऐंशी वर्षे पार केलेल्या केतकरवहिनी मुलांकडे शहरात रहायला आल्या तरी करंबवण्यात त्यांचा जीव गुंतलेला होता.

उमा कुलकर्णी यांनी त्यांची ही चटका लावणारी कहाणी वाचकांपुढे ठेवली आहे.

चार एप्रिल रोजी केतकरवहिनींचे बडोदा येथे निधन झाले. त्यांना आपल्यावरचे पुस्तक पाहता आले याचे समाधान वाटते. त्यांच्या स्मृतीला अभिवादन.

**पृष्ठे : १९६ ● किंमत : १५०रु. ● सभासदांना : ११३ रु. ● पोस्टेज:२०रु.**






**चला जाणून घेऊ या !**

## क्रियायोग

**कुंडलिनीजागृतीचा अनुभव घेण्याचा सर्वात सरळ आणि परिणामकारक मार्ग**

**रवींद्रकुमार अनु.सुभाष जोशी**

द ॲकॅडमी ऑफ कुंडलिनी योगा अँड क्वान्टम सोल या दिल्लीतील संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रवींद्रकुमार (स्वामी आत्मानंद) यांचे 'क्रियायोग' हे छोटेसेच पुस्तक कुंडलिनीविषयक उद्बोधक गुह्य ज्ञान खुले करणारे म्हणून प्रत्येक जिज्ञासूने आत्मसात करणे आवश्यक आहे. हठयोगाचा दोन वर्षे अभ्यास केल्यावर देहशुद्धी आणि मनाचे स्थैर्य प्राप्त होऊ शकते. तसे झाल्यावर पुढचा टप्पा क्रियायोगाद्वारे साधायचा असतो. कुंडलिनीचा अनुभव घेण्याचा हा सरळ पण परिणामकारक मार्ग आहे असा रवींद्रकुमार यांचा दावा आहे. आपल्या अनुभवाद्वारे सिद्ध झालेल्या पद्धती त्यांनी या पुस्तकात प्रस्तुत केल्या आहेत.

नकारात्मक विचारसरणीचे सकारात्मक विचारसरणीत रूपांतर करण्यासाठी क्रियायोगाचा फायदा होतो. तमोगुण, रजोगुण आणि सत्त्वगुण यांपैकी एक गुण दुसऱ्या दोघांना वरचढ होतो तेव्हा त्या प्रबळ गुणालाच महत्त्व प्राप्त होते. गुरूकडून शिष्याकडे या पद्धतीने कुंडलिनी जागृतीचे ज्ञान व तंत्र एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत राहते. आसनमुद्रा आणि प्राणायाम यांचा क्रियायोगात समावेश होतो. मनाशी संवाद साधणारी प्राण ही ऊर्जा असते. शरीरात योग्य रासायनिक स्राव वाहते ठेवल्याने मन स्थिर व शांत राहते.

क्रियायोगाने एका बाजूला भौतिक संवेदना व वस्तू यांचे ज्ञान होते; तर दुसऱ्या बाजूला मन:शांती प्राप्त होते. हेच वेगळ्या शब्दांत पुढीलप्रमाणे सांगता येते.

१) अमृताची निर्मिती करणे व त्याच्या प्रवाहाची दिशा बदलणे
ते मणिपूर चक्राकडे खाली वाहत जाऊन जळून जाते.
२) अमृताची दिशा वरच्या केंद्राकडे वळवणे. म्हणजे ते वाया जात नाही.

**हठयोगाचा दोन वर्षे अभ्यास केल्यावर देहशुद्धी आणि मनाचे स्थैर्य प्राप्त होऊ शकते. तसे झाल्यावर पुढचा टप्पा क्रियायोगाद्वारे साधायचा असतो. कुंडलिनीचा अनुभव घेण्याचा हा सरळ पण परिणामकारक मार्ग आहे असा रवींद्रकुमार यांचा दावा आहे.**

शरीरात वापरले गेल्याने शरीर टवटवीत राहते.

कुंडलिनी तंत्राचे प्रसरण (तनौती) व मुक्त करणे (त्रान्यांती) हे दोन तंत्रभाग आहेत. शिव व शक्ती या दोन विरुद्ध गोष्टींचा योगाभ्यासाद्वारे मिलाफ घडवून आणला जातो.

दक्षिण मार्गात आचार व कृती यांच्या सात्त्विक शुद्धतेला महत्त्व असते.

वाममार्गात वैषयिक बाबींना, स्त्रीपुरुष मीलनाला महत्त्व असते. स्त्री-पुरुष यांच्या समागमातूनही कुंडलिनी जागृती होऊ शकते. योगाभ्यास आणि कामेच्छा यांच्या एकत्रीकरणातून शारीरिक आनंदाकडून शुद्ध स्वरूपाच्या आनंदाकडे व पूर्णत्वाकडे लक्ष वळून आपला तिसरा डोळा उघडतो. खरी ज्ञान अनुभूती मिळते.

सिद्धासन, वज्रासन, वज्रोली, सहजोली, मुद्रा, त्रिबंध आणि प्राणायाम याद्वारे वीर्यपतन लांबवून, समागमाचा अवधी लांबवता येतो... जेवढा अवधी जास्त तेवढा आत्मज्ञानप्राप्तीचा संभव जास्त.

समागमाचा अवधी वाढवण्यासाठी स्त्रीसाधकांनी सिद्धयोनी आसन, वज्रासन, त्रिबंध, सहजोली मुद्रा यांचा सराव करावा.

स्त्रीपुरुष यांनी या क्रियेत परस्पर सहकार्य करणे कुंडलिनी जागृतीला पोषक, प्रेरक ठरते. वाममार्गाने कुंडलिनी जागृती जलदगतीने होऊ शकते. जैविक यंत्रणेला आध्यात्मिकतेची जोड लावून ती सक्षम होते.

क्रियायोगामध्ये नाडी व चक्रे यांच्या जागृतीला महत्त्व असते.

क्रियायोगात ८० प्रकारच्या क्रिया अंतर्भूत आहेत.

चक्राची ध्यानधारणा, नाद संचलन, वायूसंचलन, शब्दसंचलन, विपरीत करणी, सिद्धासन व सहज योनी आसन, खेचरी मुद्रा, बिंदू छेदन, शक्तिसंचलन यांच्याशी क्रियायोग संबंधित आहे. सहस्त्रार फुलवणे, चक्रस्पंद, शक्तिपात, कुंडलिनी जागृती, प्रकाशदेहाचे दर्शन, स्वत:ला स्वत:च्या प्रकाशकोशाच्या व देहकोशाच्या पलीकडे जाऊन पाहणे या सर्व गोष्टीही कुंडलिनी जागृतीच्या निदर्शक होत.

आधुनिक काळात जपानी अतींद्रियक मानसशास्त्रज्ञ हिराशी मोतोयामा यांनी याबाबत बरेच संशोधन केले आहे. **मेरुदंड, मेरिडिअन आणि त्यांच्याशी संबंधित इंद्रिये यांच्या कार्याचे मापन करण्यासाठी एक उपकरण त्यांनी विकसित केले आहे.** या उपकरणाद्वारे नाडीच्या तीन अवस्थांचे मोजमाप करता



**मूलाधारपाशी जगणाऱ्यांना ऐषारामाची चटक लागते. क्रोध, अहम् जास्त.स्वाधिष्ठानापाशी जगणाऱ्यांना विषयभोगात रस वाटतो. मणिपूरपाशी जगणाऱ्याला सामर्थ्याची इच्छा असते. आध्यात्मिक ओढ वाटते.**

येते.

१) स्थिर स्थितीतील/शरीराचे नेहमीचे मोजमाप.

२) सौम्य अथवा संवेदनाविरहित उद्दीपन अवस्थेतील मोजमाप.

३) उद्दीपनानंतरचे परिणाम- शरीराचे नैमित्तिक कार्य. मूळ पेशींची प्रतिकारशक्ती.

ईडा, पिंगला या नाड्यांमध्ये पूर्ण समतोल असणारे योगी हे सर्व व्याधींपासून मुक्त राहतात. सामान्य माणसांत हा समतोल आढळत नाही.

मुख्यत्वे डाव्या नाकपुडीने श्वास घेणाऱ्यांची स्मरणशक्ती क्षीण होते. डोके दुखते. हृदय व यकृत यांची क्षमता कमी होते. बद्धकोष्ठता, पेप्टिक अल्सर इ. तक्रारी उद्‌भवतात.


मुख्यत्वे उजव्या नाकपुडीने श्वास घेणाऱ्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास असतो.

आपल्या शरीरात सात चक्रे आहेत. ज्या ज्या चक्रात माणूस चक्राच्या ज्या पातळीवर जगतो तसा त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन असतो.

* मूलाधारपाशी जगणाऱ्यांना ऐषारामाची चटक लागते. क्रोध, अहम् जास्त.
* स्वाधिष्ठानापाशी जगणाऱ्यांना विषयभोगात रस वाटतो.
* मणिपूरपाशी जगणाऱ्याला सामर्थ्याची इच्छा असते. आध्यात्मिक ओढ वाटते.
* अनाहतमध्ये जगणारा क्षमाशील, सहनशील, करुणामय असतो.
* विशुद्धीच्या पातळीवर माणसाला वाचासिद्धी प्राप्त होते.
* अज्ञानाच्या पातळीवरील माणसाच्या मुक्त मनाची दारे उघडली जातात.

चक्रांच्या या परिणामांचे मूल्यमापन डॉ. मोतोयामा खास उपकरणांद्वारे करू शकतात. चक्रे अस्तित्वात आहेत; ती जागृत झालेल्या व्यक्तींच्या अवयवांच्या कार्यपद्धतीत फरक पडलेला दिसतो असा त्यांचा निष्कर्ष आहे.

**पृष्ठे : ७२● किंमत : ३०रु. ● सभासदांना : २२रु. ● पोस्टेज :२०रु.**




## व्हाईट मुघल्स

जेम्स कर्कपॅट्रिक हा हैद्राबादच्या संस्थानातील इंग्रजांचा राजदूत त्याच संस्थानातील मुस्लीम दिवाणांच्या नात्यातील खैरून्निसा नामक मुलीच्या प्रेमात पडतो इस्लाम धर्म स्वीकारून तिच्याशी लग्नही करतो.
अठराव्या शतकात घडलेली एका ब्रिटीश व मुस्लीम तरुण-तरुणीची वास्तव प्रेमकहाणी

विल्यम डॅलरिंपल **अनुवाद :** सुधा नरवणे

## द लायन्स गेम

नेल्सन डेमिली **अनुवाद :** अशोक पाध्ये

जागतिक दहशतवादाने अमेरिकेलाही ग्रासले. याचा परिणाम न्यूयॉर्क येथील जागतिक व्यापार संघटनेची इमारत पाडण्यात आली. ही कादंबरी त्या आधी लिहीलेली आहे त्यामुळे दहशतवादी अमेरिकेवर किती चिडून आहेत? व का चिडून आहेत आणि सरकारी यंत्रणा याची किती गांभीर्याने दखल घेते हे या कादंबरीतून स्पष्ट कळते.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**



## व सं त गं धा

(कोरियन लोकसाहित्यातील प्रेमकहाणी)

अनु. माधवी कोल्हटकर

**किंमत १२० रु.**




संस्कृत साहित्यातील मुग्ध पण विदग्ध अशी शकुंतला
आणि आर्य पतिव्रता सावित्री या नायिकांची आठवण
करून देणारी ही चुन ह्यांगची कथा.
पण ही फक्त एका व्यक्तीची कहाणी राहत नाही. याचबरोबर
कोरियातील सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीचेही
आपल्याला यातून दर्शन घडते.
कोरियाकडे आलेल्या आणि नंतर त्यांनी जोपासलेल्या
चिनी वारशाची तोंडओळख होते
कोरियन भाषेतून थेट मराठीत आलेला हा पहिला अनुवाद.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

साधंसुधं...

# मुके झरे

प्रमोदिनी वडके-कवळे

सहज गप्पा मारताना जेव्हा प्रेमाचा विषय निघतो किंवा वेगवेगळे 'डेज' साजरे करताना तरुणाईचा उत्साह सळसळताना दिसतो. तेव्हा मला मागच्या पिढीतल्या दोन 'प्रेयसीं'ची हटकून आठवण येते.

पार्वतीचं लग्न झालं तेव्हा तिचं वय होतं अवघं नऊ वर्षाचं. नवरामुलगा म्हणजे शंकरराव सतरा वर्षाचे. म्हणजे त्यामानाने थोडे 'समजूत'दार. पण त्यांची 'समज' त्यांच्या कुटुंबाभोवतीच गुरफटलेली होती. विधवा आई आणि धाकटा अनंता हे दोघे म्हणजे शंकररावांचं सर्वस्व. तारुण्यातल्या कोमलहळव्या भावना त्यांच्या मनात उगवल्याच नव्हत्या असं नाही. पण ते अंकुर पालवण्यासारखी आजूबाजूची परिस्थिती नव्हती.

पार्वतीची अवस्था त्याच्याही पुढची. लग्न, संसार, प्रेम विवाहसौख्य या कुठल्याच शब्दाचा तिला परिचय नव्हता. नवव्या वर्षी लग्न होईपर्यंत ती गर्भश्रीमंत माहेर आणि पहाडासारख्या भावाचा आधार यांच्या सावलीतच वाढली होती. शंकरनानांशी लग्न होऊन ती त्यांच्या तालेवार घरात येईपर्यंत त्यांच्या घराचे वासे फिरले होते. अडल्यापडल्याला उपयोगी पडताना शंकरराव स्वत:च कफल्लक होऊन बसले होते. वडिलांचा आधार उरला नव्हता तरी अजूनही त्यांचा परोपकारी स्वभाव तसाच होता. जोडीला ध्येयवाद आणि काम म्हणजेच देव आणि श्रम हीच पूजा असे आधुनिक विचार. कुठच्या कामाची लाज वाटत नव्हती. कष्ट हेच त्यांचं शक्तिवर्धक होतं. माहेरच्या श्रीमंतीत उंच गेलेला पार्वतीच्या नशिबाचा झोका जमिनीवर येऊन अक्षरश: आदळला होता.

फुलांवरून चालायची सवय असलेल्या नऊ वर्षाच्या पार्वतीला शेणगोठा धुणीभांडी असली कामं जमायची नाहीत. मग सासूचा संताप वाढायचा पण शंकररावांवर मन:पूर्वक प्रेम करणाऱ्या पार्वतीने त्यांच्यासाठी दोन्हीची सवय करून घेतली. कामाची आणि सासूच्या वाक्ताडनाचीही. आयुष्यभर ती महापुरातलं लव्हाळं होऊनच जगली.

धाकट्या अनंताची बायको दिसायला नक्षत्रासारखी पण तिच्या पोटी मूल नाही म्हणून सासूबाई तिला टोचून बोलायच्या. अनंताला दुसरं लग्न करण्याचा



आग्रह धरायच्या. वर्षाआड पाळणा हलणारी पण सामान्य रूपाची मोठी जाऊ आणि पोटी मूल नसलेली देखणी धाकटी जाऊ दोघी आपापला सासुरवास सोसत होत्या. या सगळया उन्हाळ्यात सावली होती ती शंकररावांच्या मृदू स्वभावाची आणि कधीक्वचित मिळणाऱ्या सहवासाची.

पार्वतीच्या धाकट्या मुलीला घशात गाठी झाल्या म्हणून शंकरराव तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी तिला मुंबईला घेऊन गेले. शस्त्रक्रिया यशस्वी झाली पण घरी येताना रामदास बोटीने दगा दिला.

पार्वतीच्या आयुष्यात पुन्हा हिंदोळ्याचे झोके. रोज नव्या बातम्या यायच्या. काल मुंबईजवळ दोघंजण बेशुद्धावस्थेत सापडले. त्यातला एकजण शंकररावांसारखा दिसत होता. बेपत्ता लोक जिवंत असण्याची शक्यता आहे. आशा आणि निराशा, कुठे स्थिर व्हायचं.

पदरात चार मुलं. त्यातला धाकटा केवळ दीड वर्षाचा. हळूहळू बातम्या यायच्या बंद झाल्या आणि पार्वतीला आपलं भागधेय कळून चुकलं. नेहमीसारखंच तिने ते विनातक्रार स्वीकारलं. नशिबाविरुद्ध खळखळ करण्याइतकं तिचं मन उथळ नव्हतं. आता तिने स्वत:ला चुलीजवळ बांधून घातलं. आयुष्यातली कोणतीही चैन कोणताही आनंद आपल्यासाठी नाही असं ती स्वत:च्या मनाला समजावत असतानाच नशिबाने पुन्हा तिच्यासमोर एक गाजर धरलं. धाकट्या जावेला दिवस राहिल्याचं लक्षात आलं.

पार्वती मनाशीच हसली. ''मला ठाऊक होतं तुम्ही मला वाऱ्यावर सोडणार नाही.''

मनातली ही भावना तिने कुणापाशी बोलून दाखवली नाही. पण त्या दिवसापासून तिच्या मनाने उभारी धरली. नंददेवकीने कृष्णजन्माची केली नसेल एवढ्या आतुरतेने पार्वती जावेच्या बाळाची प्रतीक्षा करत राहिली. इंदिराला कळा सुरू झाल्या आणि पार्वतीची लगबग वाढली. चेहऱ्यावर बाळाच्या स्वागताची उत्सुकता आणि 'सगळं नीट होईल ना?'चा अनावर ताण दाटलेला. वर्षानुवर्ष त्यांच्या घरी येणाऱ्या सुईणीलाही आश्चर्य वाटलं. स्वत:च्या बाळंतपणाच्या वेळीही पार्वतीच्या जिवाची एवढी घालमेल झालेली तिने पाहिली नव्हती.

बाळाने पहिलं ट्यँहा केलं आणि पार्वतीच्या मनावरचं ओझं उतरलं. आज तिच्या नशिबाचा झोका आशेच्या बाजूला स्थिरावला होता. इंदिराला मुलगाच झाला होता. त्या नवजात बाळाला हातात घेउन पार्वतीने प्रेमाने आंदोळले. त्याच्या अर्धमिटल्या डोळ्यांत ओळखीची खूण शोधायचा प्रयत्न केला. इंदिरा पहिलटकरीण होती. वयाने अगदी लहान नव्हती पण तिला घरकामाचा उरक नव्हता आणि मुलं जोजवायचीही सवय नव्हती. मग बाळाचा ताबा पार्वतीनेच

घेतला. आपली कामं उरकून ती बाळाचं करायची. इंदिरा केवळ जन्म देणारी आणि दूध पाजणारी आई होती. बाकीचं मातृत्व पार्वतीने सांभाळलं.

रामदास बोटीच्या दुर्घटनेला जेमतेम वर्ष झालं होतं. बाळाचं बारसं करण्याचा उत्साह कुणाच्याच मनात नव्हता. तरी बाळाला पाळण्यात घालायचं ठरलं तेव्हा एरवी अबोल असलेल्या पार्वतीने पुढे होऊन सांगितलं. ''बाळाचं नाव चंद्रशेखर ठेवा.''

''का ग?'' कुणीतरी विचारलं. घरातल्या कोणत्याच पूर्वजाचं ते नाव नव्हतं.

''ते महादेवाचं नाव आहे.'' तिने खालमानेने म्हटलं. तिथेच उभा असलेला अनंता चमकला. वहिनीच्या मनातलं अव्यक्त काय ते त्याला नेमकं समजलं आणि त्यानेही पुढे ते जन्मभर जपलं.

नाव सुचवलं तरी शेखरला पार्वतीने कधी नावाने हाका मारल्या नाहीत. त्याच्या पाठीवर इंदिराला आणखी दोन मुलगे झाले. त्या भावांपाठी एक बहीणही झाली. सगळ्या बाळंतपणात पार्वतीने भरपूर काम केलं. पण भरभरून माया मात्र एकट्या शेखरवरच! कारण त्याच्या येण्याने तिला शंकररावांच्या प्रेमाची खूण पटली होती.

पुढे पार्वतीचे दिवस बदलले. तिचे चौघे मुलगे कर्तेसवरते झाले. त्यांना शालीन आज्ञाधारक सुनांची साथ मिळाली. सगळी सुखं हात जोडून समोर उभी राहिली.

समाधानाने जगणं संपवून मृत्यूच्या उंबरठ्यावर असलेल्या पार्वतीने आपल्या मुलांना सांगितलं. ''आता डॉक्टरवैद्य कोणी नको. फक्त भाऊला बोलवा.''

शेखरचा स्वभाव एरवी तसा कोरडाच. नात्याबित्यांपेक्षा व्यवहाराला जास्त महत्त्व देणारा. पण पार्वतीसाठी आपल्या व्यस्त कार्यक्रमात बदल करून तो तातडीने आला. त्याला बघितल्यावर पार्वती समाधानाने हसली. तिची वाचा गेली होती. पण ती खुणेनेच म्हणाली ''माझी खात्री होती तू येशील. आता माझ्या मुखात तेवढं गंगाजळ घाल.''

आणि चौघंही मुलं बाजूला उभी असताना भाऊच्या मांडीवरच तिने प्राण सोडला.

बाजूला उभ्या असलेल्या अनंताचं मन थरथरलं. याला कोणतं प्रेम म्हणायचं? मृत्यूनंतरही बांधून रहाणारी ही निष्ठा पार्वतीने कुठून मिळवली असेल?

सुशिला आणि भगवंतरावांचा संसारही असाच. माहेरच्या श्रीमंत घरातून उठून आलेली चार भावांची ही एकुलती एक बहीण. भगवंतरावांच्या संसारात तिने कितीतरी आर्थिक चढउतार सोसले. पण कधी माहेरी तक्रार केली नाही. क्वचित कधीतरी दोघांचे वाद व्हायचे पण तेव्हा रागाच्या भरातही तिच्या तोंडून



चुकूनही भगवंतरावांच्या गरिबीचा उल्लेख व्हायचा नाही. मुलांची एखादी हौस पुरवता आली नाही की हताशपणे ती देवाला विचारायची मी एवढं तुझं करते तरी तू का त्या गरीब माणसाला असा छळतोस? म्हणजे शेवटी ठपका देवालाच! पण आपल्या दरिद्री तुटपुंज्या संसाराबद्दल तिने भगवंतरावांना मात्र कधीच दोष दिला नाही. कधी माहेरी एखादं कार्य निघालेलं असायचं. सुशिला जायचा बेत करायची पण एसटीच्या भाड्यापुरतेही पैसे जवळ नसायचे. भगवंतरावांना तिचं मन मोडायचं नसे. पण पैशाचं सोंग तरी कुठून आणणार? तिच्या माहेरच्या गावाला जाणारी एकुलती एक एसटी सकाळी नऊला सुटायची. मग साडेआठपर्यंत धावपळ करून भगवंतराव कसेबसे पैसे जमवायचे आणि नऊला सुशिला गाडीत चढायची. दरवेळी हीच धावाधाव. पण तरीही माहेरी गेल्यावर कधी तिचं तोंड वाकडं नसायचं. माहेरच्या श्रीमंतीचं तिला जेवढं कौतुक होतं तेवढाच भगवंतरावांच्या संसाराबद्दल अभिमान होता.

एखाद्याचं नशीबच दुष्काळी प्रदेशासारखं रखरखीत असतं. सुखाचा ओलावा संपन्नतेची हिरवळ त्याच्या वाट्याला कधी येतच नाही. भगवंतरावांचही तेच झालं. आणि त्यांच्या नशिबाला आपलं नशीब बांधून घेणाऱ्या सुशिलालाही मग ही रखरख सोसावी लागली.

भगवंतराव गेले आणि तिचे दिवस पालटले. मुलं कर्ती झाली. आलिशान घर बांधलं. आईसाठी स्वतंत्र खोली, मोठ्ठं देवघर अशा सोयी केल्या. ज्या सुशिलाला माहेरी जाताना साध्या एसटीच्याही भाड्याचे पैसे जमवावे लागायचे तिला तिच्या मुलांनी एसीच्या गारव्यात बसवून सगळ्या तीर्थयात्रा घडवल्या. ती आजारी पडली तेव्हा तिच्यासाठी महागडे औषधोपचार केले. सुरुवातीला हलाखीचे दिवस भोगले तरी आता आईच्या आयुष्यात कोणतंही न्यून राहिलं नाही असंच तिच्या मुलांना वाटलं.

तिची तब्येत खूपच बिघडली म्हणून सासरी गेलेली मुलगी आईला भेटायला आली तेव्हा सुशिलाने आपल्या खोल गेलेल्या आवाजात तिला कपाटातला दागिन्यांचा डबा काढायला सांगितला. त्यातले दागिने आपल्या इच्छेनुसार मुलीसुनेला देउन तिने मुलाला जवळ बोलावलं आणि त्याच्या हातात एक रुपयाच्या नोटांच्या दोन जुन्या घड्या देऊन सांगितलं, ''ही माझी सगळ्यात मोठी इस्टेट. ही सांभाळ. अण्णा गेले तेव्हा त्यांच्या खिशात या दोन नोटा होत्या.''

कोकणातल्या भरल्या विहिरींना झरे लागलेले असतात. विहीर खणताना आतून एखाद्या कारंज्यासारखी पाण्याची धार उसळून येते आणि पाहतापाहता तो खड्डा पाण्याने भरून जातो. या जलप्रवाहाला जिवंत झरा म्हणतात.

पण कधीकधी मात्र बाजूच्या कपारीतून एखादी अगदी कळे न कळेशी धार


झुळझुळत येते. या धारेला उसळता जोर नसतो पण सातत्य असतं. त्या धारेचं पाणी एवढं स्वच्छनिवळ असतं की बरेचदा इथे पाणी वहातंय हे पाहणाराच्या लक्षातही येत नाही. उसळत्या झऱ्याचा जोर कमी होतो. उन्हाळ्यात त्याचं पाणी आटतं. पण कपारीतलं हे पाणी मात्र कधीच वहायचं थांबत नाही. या जलप्रवाहाला मुका झरा म्हणतात.

पार्वतीची आणि सुशिलाची आठवण आली की मला हे रूपकही आठवतं. आपलं अस्तित्व जाणवू न देता विहिरीच्या पोटात अखंड झुळझुळणाऱ्या त्या मुक्या झऱ्यापेक्षा दुसरी कोणती समर्पक उपमा त्यांच्या प्रेमाला सापडेल?

— — — — — — — — — — —

***प्रमोदिनी वडके-कवळे***
प्राजक्त, अपूर्वा हौ. सोसायटी, सर्व्हे नं. ६०,
सुखसागरनगर क्र. २, गल्ली क्र. १०,
कोंढवा बुद्रुक, पुणे ४११०४८



स्त्रीचा हळवेपणा, अंतरंगातल्या भावभावना तरलपणे मांडणारे आगळे वेगळे कथासंग्रह



द स्ट्रीम विदिन

अनु. मीना वैशंपायन
किंमत : १३०रु.

इंटरप्रिटर ऑफ मॅलडीज्





मूळ लेखिका : झुंपा लाहिरी
अनु. भारती पांडे
किंमत : १७०रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**





**वि. स. खांडेकरांचे विचारमंथन**




**दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी**

जनसामान्यांच्या आत्मिक शक्तीला जागवणाऱ्या भारतीय महापुरुषाचं महात्मायन

**संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत ७०रु.**

— — — — — — — — — — — — — — — — — —




**वन्हि तो चेतवावा**

नव्या मूल्यांसह नवा भारत घडवण्यासाठी आजही मार्गदर्शक असे खांडेकरांचे विचार मंथन

**संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत ७०रु.**

— — — — — — — — — — — — — — — — — —



**अज्ञाताच्या महाद्वारात**

प्रगल्भ समाजचिंतकाच्या भूमिकेतून केलेली भारतीय समाजमनाची परखड चिकित्सा- आजही तंतोतंत लागू पडणारी!

**संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत ५०रु.**

— — — — — — — — — — — — — — — — — —



**सांजसावल्या**

शेवटच्या काळातील वि. स. खांडेकरांचे चिंतनगर्भ लघुनिबंध

**संपादक : डॉ. सुनीलकुमार लवटे**

**किंमत ८०रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# पुरस्कार

## * पुण्यभूषण पुरस्कार

त्रिदल संस्थेतर्फे देण्यात येणारा पुण्यभूषण पुरस्कार यंदा कष्टकऱ्यांच्या चळवळीचे प्रणेते डॉ. बाबा आढाव यांना जाहीर झाला आहे.

सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेल्या बालशिवाजीची प्रतिकृती आणि एक लाख रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप असून जून महिन्यामध्ये पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याचे त्रिदलचे अध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी सांगितले.

पुण्यभूषण पुरस्कार समारंभादरम्यान स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या नामदेव घोलप, दिनकर सातारकर, उषा देसाई, दिनकरराव पाटील आणि डॉ. ताराचंद राकेचा या पुण्यातील स्वातंत्र्यसैनिकांना दगडूशेठ हलवाई गणपतीची प्रतिमा आहे.

विधायक कार्याला बळकटी देण्यासाठी पुण्यभूषण फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली असून त्रिदलतर्फे गेल्या १७ वर्षांपासून सुरू असणाऱ्या पुण्यभूषण पुरस्कारापाठोपाठ पुढील वर्षापासून विश्वभूषण पुरस्कारही देण्यात येणार आहे.

आत्तापर्यंत योगाचार्य बी. के. एस. अय्यंगार, मोहन धारिया, डॉ. जयंत नारळीकर, प्रतापराव गोडसे, उद्योगपती राहुल बजाज, डॉ. के. बी. ग्रॅन्ट, चंदू बोर्डे आदींना पुण्यभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

## * जनसंवाद साहित्य पुरस्कार

कांतराव रामतीर्थकर सार्वजनिक वाचनालय, सुभाषनगर, किनवट तर्फे जनसंवाद साहित्य पुरस्कार दरवर्षी मराठीतील उत्कृष्ट साहित्याला दिला जातो. यंदा हा पुरस्कार मराठीतील ख्यातनाम कवी सुधाकर गायधनी, नागपूर यांच्या महावाक्य या काव्यग्रंथाला देण्यात आला. वर्ष २००६-०७ या वर्षी मराठी भाषेतील उत्कृष्ट कथासंग्रहाला हा पुरस्कार देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

लेखकांनी आपल्या कथासंग्रहाच्या दोन प्रती पाठवाव्यात. कथासंग्रह हा वर्ष २००१ ते २००५ या कालावधीत प्रकाशित झालेला असावा. सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. दि. ३१/५/२००६ पर्यंत कथासंग्रह पाठवावेत. पत्ता- श्री. उद्धव रामतीर्थकर, सचिव कांतराव रामतीर्थकर,



सार्वजनिक वाचनालय सुभाषनगर, किनवट ४३१८०४ जि. नांदेड.

## * डॉ. गंगाधर पानतावणे यांना महर्षी विठ्ठल शिंदे पुरस्कार

वाई येथील रा. ना. चव्हाण प्रतिष्ठानचा महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक व आंबेडकरवादी तत्त्वज्ञानाचे अभ्यासक डॉ. गंगाधर पानतावणे १० एप्रिलला पुरोगामी विचारवंत भाई वैद्य यांच्या हस्ते देण्यात आला. सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात संशोधनात्मक कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जातो.

डॉ. पानतावणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मराठीचे (भाषा व साहित्य) विभागप्रमुख म्हणून काम पाहिले आहे. ते गेली ४० वर्षे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्व लेखन साहित्य संपदेचा व व्याख्यानांचा अभ्यास करीत आहेत.

## * विजय तेंडुलकर यांना 'सलाम' पुरस्कार

ज्येष्ठ मराठी नाटककार विजय तेंडुलकर यांना लिटल मॅगझिनचा 'सलाम' (साऊथ एशियन लिटरेचर अवॉर्ड फॉर द मास्टर्स) पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. दक्षिण आशियातील उत्कृष्ट साहित्य कृतींबद्दल लिटल मॅगझिन पुरस्कार सुरू करण्यात आले असून यंदाचे हे पहिलेच वर्ष आहे. केरळबाहेर आपल्या इंग्रजी कवितांबद्दल प्रसिद्ध असलेल्या मल्याळी लेखिका कमला दास यांना मल्याळी कथांबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. बंगाली कवी शमसूर रहमान यांना कवितांबद्दल सन्मानित करण्यात आले आहे. रहमान हे बांगलादेशच्या मुक्ती संग्रामात सहभागी होते. पुण्यामध्ये राहणारे ऑटोमोबाईल इंजिनिअर जयंत संकृतायन यांना त्यांनी लिहिलेल्या 'सुनामी' या कथेबद्दल लिटल मॅगझिनचा पुरस्कार देण्यात आला आहे.

## * कवी प्रवीण बांदेकर यांना 'दुखी' पुरस्कार

'उर्मी', जालना या वाङ्मयीन संस्थेच्या वतीने देण्यात येणारा राय हरिश्चंद्र साहनी 'दुखी' पुरस्कार सावंतवाडी येथील कवी प्रवीण बांदेकर यांच्या 'खेळखंडोबाच्या नावाने...' या दीर्घ कवितेला जाहीर झाला आहे. लोकवाङ्मय गृहातर्फे प्रकाशित झालेल्या या कवितेस रु. ११,१११ चा पुरस्कार ३० मार्च रोजी 'कवितेचा पाडवा' कार्यक्रमात डॉ. राजन गवस यांच्या हस्ते देण्यात आला.

'आम्ही कवितेचे देणे लागतो' या भूमिकेतून गेली नऊ वर्षे मराठीतील लक्षणीय कवीचा व कवितेचा सन्मान व्हावा म्हणून कवितेचा पाडवा साजरा करण्यात येतो. या निमित्ताने मराठीतील कसदार कविता संग्रहाला 'दुखी' नावाने काव्यलेखन करणाऱ्या उर्दू कवी साहनी यांच्या नावे पुरस्कार देण्यात येतो.

पुरोगामी विचारधारेशी नाते सांगणारी बांदेकर यांची कविता सद्य:कालीन मूल्यव्यवस्थेतील पडझड तसेच लोकसंस्कृती, बोलीभाषा, परंपरा यांचा जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर होऊ लागलेला ऱ्हास सूक्ष्मपणे टिपते, असे परीक्षण समितीने म्हटले आहे.

### * कवी मंगेश काळे यांना 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार'

महाराष्ट्र मंडळ, कराड या संस्थेतर्फे दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण पुरस्कार' या वर्षी मंगेश नारायण काळे यांच्या 'शक्तिपाताचे सूत्र' या काव्यसंग्रहास प्रदान करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण पुरस्कारासाठी कथा, कविता, कादंबरी आणि ललित लेखन या साहित्यप्रकारांचा एकेका वर्षी विचार होतो. यावर्षी कविता हा साहित्यप्रकार पारितोषिकासाठी विचारात घेण्यात आला होता. २००१ ते २००४ या कालखंडातील कविता संग्रहांतून प्रा. डॉ. विलास खोले, विजय कुवळेकर व रेखा-इनामदार-साने यांनी 'शक्तिपाताचे सूत्र' या कविता संग्रहाची एकमुखाने शिफारस केली.

### * रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार

महाराष्ट्र सरकारतर्फे सुरू करण्यात आलेला रंगकर्मी जीवनगौरव पुरस्कार पुढील वर्षापासून प्रभाकर पणशीकर जीवनगौरव पुरस्कार या नावाने दिला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी 'प्रभाकर पणशीकर अमृतसंपदा महोत्सवा'च्या समारोप सोहळ्यात केली. (मात्र पणशीकरांनी जिवंतपणी आपल्या नावाने पुरस्कार ठेवू नये अशी विनंती केली.)

माटुंग्याच्या यशवंतराव चव्हाण नाट्यमंदिरात तीन दिवस अलोट गर्दीत चाललेल्या आपल्या अमृतसंपदा महोत्सवाला मिळालेला प्रतिसाद पाहून स्वत: प्रभाकर पणशीकर सद्‌गदित झाले होते. अमृतमहोत्सव समितीने सव्वा दोन लाख रुपयांची थैली आणि मानपत्र देऊन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पणशीकरांचा सत्कार केला.

या सत्काराला उत्तर देताना पणशीकर म्हणाले : मी खरोखरच या सन्मानाला व तुमच्या प्रेमाला पात्र आहे का असा मला प्रश्न पडतो. 'तो मी नव्हेच' या नाटकातील मो. ग. रांगणेकर यांनी मला दिलेल्या भूमिकेमुळे एक नट उदयाला आला असा गैरसमज पसरला. आणि हा गैरसमज मी चाळीस वर्षे टिकवू शकलो हीच माझी कमाई.

सत्कार सोहळ्याच्या आधी सादर झालेल्या 'पंत रिटायर होतायत' या दीर्घांकाच्या शेवटी स्वत: पणशीकरांनीच रंगभूमीवर एंट्री घेतली आणि त्यांनी भावविवश होऊन ईश्वराला प्रार्थना केली की, मला पुनर्जन्म मिळायचाच असेल तर तो महाराष्ट्रातच, प्रभाकर पणशीकराचाच मिळू दे. आणि मला साथ द्यायला पुन्हा कानेटकर, शिरवाडकर, अत्रे, दारव्हेकर, काशिनाथ घाणेकर आणि सतीश दुभाषी जन्माला येऊ देत. सत्कार सोहळ्यासाठी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे उपस्थित होते.

### * रामनाथ गोएंका पत्रकारिता पुरस्कार

भारतीय पत्रकारितेतील गुणवत्तेच्या 'इंडियन एक्सप्रेस' वृत्तसमूहातर्फे २००४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या 'रामनाथ गोएंका पत्रकारिता पुरस्कारा'च्या पहिल्या मानकऱ्यांमध्ये एकूण सोळा पत्रकारांची निवड करण्यात आली.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या हस्ते १२ एप्रिल रोजी एका भव्य समारंभात या पत्रकारांना गौरवण्यात आले. बरखा दत्त, वर्गीस जॉर्ज व प्रवीण स्वामी यांना वर्षातील सर्वोत्कृष्ट पत्रकार म्हणून निवडण्यात आले. महाराष्ट्रातून 'लोकमत'चे सोपान पंढरीपांडे हे या पुरस्काराचे मानकरी ठरले.

### केशव कोठावळे पारितोषिक

केशवराव कोठावळे पारितोषिक समितीने या वर्षीच्या पुरस्कारासाठी भानू काळे यांच्या 'बदलता भारत' या वैचारिक ललित ग्रंथाची निवड केली. १५ हजार १५१ रुपये, मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

डॉ. सुभाष भेण्डे, डॉ. अरुणा ढेरे, प्रा. अनंत देशमुख यांच्या निवड समितीने पुरस्काराबाबत आपला अभिप्राय व्यक्त करताना म्हटले आहे की, जागतिकीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर झपाट्याने बदलणाऱ्या भारताचा, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या संदर्भात या पुस्तकात घेतलेला वेध, प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेला आहे.

'बदलता भारत' हे पुस्तक मौज प्रकाशन गृह, मुंबई यांनी प्रसिद्ध केले आहे.

### शाहू मोडक स्मृती पुरस्कार

ज्येष्ठ दिवंगत अभिनेते शाहू मोडक स्मृती पुरस्कारासाठी यंदा 'कालनिर्णय'चे सर्वेसर्वा ज्योतिर्भास्कर जयंत साळगावकर यांची निवड झाली आहे. प्रसिद्ध बालकलाकार ओम भूतकर, बालगायिका ऐश्वर्या मुजुमदार आणि सामाजिक कार्याबद्दल संदीप शर्मा हेही १२ व्या शाहू मोडक स्मृती पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि पाच फळांची करंडी, असे या पुरस्काराचे स्वरूप असल्याचे प्रतिष्ठानच्या प्रमुख प्रतिभा मोडक यांनी सांगितले. ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचनाबाईंसह नेमण्यात आलेल्या निवड समितीमध्ये सदानंद केळकर, चारुदत्त सरपोतदार यांच्यासह मान्यवरांचा समावेश होता.

❐

*साहित्यविश्वात ऐतिहासिक कादंबरीला रणजित देसाई यांनी नवे आयाम दिले. आज ऐतिहासिक कादंबरीलेखनाचा जो काही प्रवाह वहात आहे त्याचा मूळ स्त्रोत रणजित देसाईंच्या लेखनातून आला आहे*

**विजया राजाध्यक्ष**


**देसाईंच्या काही वेगळ्या कलाकृती..**




कलावंतांच्या जीवनाचे अनोखे दर्शन घडवणाऱ्या कथा


**बाबुलमोरा**

**१२५ रु**

पशुपक्ष्यांचे अंतर्मन व्यक्त करणाऱ्या प्राणीकथा

**मोरपंखी सावल्या**

**६० रु.**



शहरातील लोकजीवनाचे दर्शन घडवणाऱ्या कथा

**प्रपात**

**९० रु.**

**पोस्टेज प्रत्येकी २० रु.**




## २००६ साली प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी

| पुस्तकाचे नाव | लेखक | किंमत |
|---|---|---|
| **कादंबरी** | | |
| **फॉर युअर आईज ओन्ली :** | | |
| इयान फ्लेमिंग | अनु. अनिल काळे | १२०/- |
| **साऊथ बाय जावा हेड :** | | |
| ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये | २५०/- |
| **केतकरवहिनी** | उमा कुलकर्णी | १५०/- |
| **मोहिनी** | पारू मदन नाईक | १६०/- |
| **लिव्हिंग हिस्ट्री :** | | |
| हिलरी रॉडहॅम-क्लिन्टन | अनु. सुप्रिया वकील | ४००/- |
| **मयादा - इराकची कन्या :** | | |
| जीन सॅसन | अनु. भारती पांडे | २५०/- |
| **वसंतगंधा** | माधवी कोल्हटकर | १२०/- |
| **रिकामा देव्हारा** | वि. स. खांडेकर | १००/- |
| **दोन ध्रुव** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **क्रौंचवध** | वि. स. खांडेकर | १८०/- |
| **हिरवा चाफा** | वि. स. खांडेकर | १५०/- |
| **कथासंग्रह** | | |
| **कुंकू पुसणारा हात** | व. कृ. जोशी | १४०/- |
| **चरित्रे** | | |
| **जे आर डी : एक चतुरस्त्र माणूस** | माधुरी शानभाग | १००/- |
| **खाली जमीन वर आकाश** | डॉ. सुनीलकुमार लवटे | १५०/- |
| **खगोलशास्त्र विषयक संदर्भ ग्रंथ** | | |
| **अंतरिक्षाचा वेध** | सुधा रिसबूड | १५०/- |
| **कलाविषयक** | | |
| **वेरूळ लेण्यातील शिल्पवैभव** | राधिका टिपरे | २००/- |

**मेहेंदी**

| | | |
|---|---|---|
| **अमृताज् मेहेंदी डिझाईन्स** | अमृता खोड्चे | ५०/- |

**आरोग्य**

| | | |
|---|---|---|
| **वजन कमी करण्यासाठी योगसाधना** | अनु. डॉ. सुभाष दांडेकर | ५०/- |

**मार्गदर्शनपर**


| | | |
|---|---|---|
| **चला जाणून घेऊ या! चक्रं आणि नाडी :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! ज्योतिषविद्या :** विजय कुमार | अनु. शरद गोगटे | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! क्रियायोग :** रवींद्र कुमार | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! केसांची निगा :** मीनाक्षी सिन्हा, रिना राजगोपाल,सुश्मिता बॅनर्जी | अनु. मीना टाकळकर | ३०/- |
| **चला जाणून घेऊ या! ॲक्युप्रेशर :** डॉ.सावित्री रमय्या | अनु. सुभाष जोशी | ३०/- |
| **शांततेनं काम करा!** : पॉल विल्सन | अनु. सुनंदा अमरापूरकर | २४०/- |

**बाल वाङ्मय**

| | | |
|---|---|---|
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **छोटु किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३०/- |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३०/- |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३०/- |





## काही महान भारतीय व्यक्तिमत्व संबंधित अभ्यासकांच्या लेखणीतून




### इंदिरा

इंदिरा नेहरू गांधी यांचे जीवनचरित्र

**४०० रुपये**




### मदर टेरेसा

प्रतिमेच्या पलीकडे

मदर टेरेसांचे सेवाकार्य, त्यांचा जीवनालेख एका तटस्थ पत्रकाराच्या नजरेतून

**ॲन सेबा** अनुवाद **अनंत बेदरकर**

**२५० रुपये**




आधुनिक भारताचे प्रेषित

### स्वामी विवेकानंद

**गौतम घोष** अनुवाद **माधव मोर्डेकर**

**१८० रुपये**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# वाचकांचा प्रतिसाद




**'संभाजी' या कादंबरीला वाचकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. वाचकांच्या प्रेमाचा, प्रतिक्रियांचा ओघ प्रचंड आहे आणि तो अव्याहतपणे वाहत आहे. त्यातील काही मोजक्या व प्रातिनिधिक प्रतिक्रिया**

संभाजी महाराजांच्या प्रतिमेला आपण जो न्याय दिला आहे, त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. आपल्यासारख्या सृजनशील मानसिकता असलेल्या लेखकाचे आभार मानण्यासाठी अचूक शब्द आमच्याकडे नाहीत. शब्दांशिवाय आमच्या भावना आपण समजून घ्याव्या.

**—श्यामकांत पाटील**
**सचिव, छत्रपती श्री संभाजी महाराज सेवा संस्था, श्रीक्षेत्र बुद्रुक**

शिवछत्रपतींच्या पुत्राच्या वाट्याला आलेली अखेर वाचताना मन हेलावून जाते. मृत्यूला असे शौर्याने सामोरे जाणे फार थोड्यांना शक्य असते. आपली कादंबरी वाचून झाल्याबरोबर आम्ही संभाजीमहाराजांच्या समाधीचे वढू बुद्रुक येथे जाऊन दर्शन घेतले. तेथील योगेश शाहीर यांचे काव्यही मनाला खूपच भिडले...

**—डॉ. अश्विनी माईणकर, सासवड (पुणे)**



आपली जबरदस्त निरीक्षणशक्ती, भाषासौंदर्य, वर्णनकौशल्य यांचा प्रत्यय पानापानावर येतो. गडकिल्ले, गर्द झाडी, निबीड घाट, सागर, दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या यांची वर्णने पुनः पुन्हा वाचावीशी वाटतात. प्रत्येक प्रकरणाला अर्थपूर्ण शीर्षक, उत्तम रेखाटने, रंगीत छायाचित्रे यामुळे उत्सुकता वाढतच राहते. संभाजी, येसूबाई, औरंगजेब, शहजादा अकबर, दुर्गादास राठोड, रायाप्पा वगैरे व्यक्तिचित्रे कायम स्मरणात राहतील.

**—सौ. शैला गोखले, दादर, मुंबई २८**

संभाजीराजांचा हा इतिहास अभिमान, नव्हे स्वाभिमान जागृत करणारा आहे, हे आपण दाखवून दिले आहे. आम्हां मराठी लोकांना इतिहासातून बोध घेऊन भविष्यात वाटचाल करण्याची निकड कधी वाटली नव्हती. त्यामुळे अनेक शौर्यगाथा लिहिल्या जाऊनही आमचा मूळचा संकुचित पिंड काही केल्या बदलत नाही. या संकुचितपणाचा, वतनदारीवृत्तीचा त्रास पूर्वीच्या शूरवीरांना जसा झाला तसा आजही होत आहे हे आपल्या लक्षात यायला हवे.

**—डॉ. श्री. ल. पुलकुंडवार, मंत्रालय, मुंबई**

'संभाजी' या अभ्यासपूर्ण पुस्तकाबद्दल धन्यवाद. संभाजीराजांचे मेहुणे गणोजी शिर्के आणि मराठा विरोध आपण दाखवला आहे हे योग्य वाटत नाही. मराठ्यांनीच महाराजांना पकडून दिले हा इतिहास नसावा असे वाटते व असलाच तरी तो पूर्ण नष्ट कसा होईल हे सांगावे हीच कळकळीची विनंती.

**—विश्वंभर काशीद, सोलापूर**

'संभाजी'चा शेवट खूपच हुरहुर लावणारा आहे. संभाजीराजांबद्दल खूप गैरसमज आहेत, त्यांचे निराकरण आपल्या ग्रंथामुळे होईल.

**—अनिल पाटकर, जळगाव**

बिलामत या सुरुवातीच्या प्रकरणातले गोदूचे साहस आणि अखेरच्या क्षणी परटाची जना... या दोघी सामान्य समाजातील; पण त्यांची राष्ट्रनिष्ठा फार मोठी होती. धनगरांच्या मुलांना गणोजी शिर्के यांना आपण चुकीने मदत केल्याची कल्पना आल्यावर त्यांनी पश्चात्तापाने राजांकरिता केलेले बलिदान सामान्यांची निष्ठा प्रकट करते. एक स्वातंत्र्यसैनिक म्हणून मला वाटते की स्वातंत्र्यलढ्यात सातारा, मिदनापूर, बलिया या जिल्ह्यांत झालेल्या जनआंदोलनांबद्दल आपण लिहावे.

**—बाबुराव पाटील किदळकर, मसूर (सातारा)**

इतिहासातील प्रसंग रंगविण्याची आपली शैली मला मोहून टाकते. ऐतिहासिक कादंबऱ्यांमध्ये युद्धं, प्रदेशावर कब्जा, किल्ले यांचे तपशील मिळतात; परंतु तत्कालीन समाजजीवन, आहार, वैद्यक याबद्दल ढोबळपणे लिहिलेले जाणवते. एक डॉक्टर म्हणून मला निरनिराळ्या राजांना झालेल्या व्याधींबद्दल आणि उपचारांबद्दल जिज्ञासा वाटते. त्या दृष्टीने अभ्यासाची साधने आपल्या पाहण्यात आली असतील तर त्याबद्दल कळवावे.

**—डॉ. मधुसूदन जोशी, चिपळूण (रत्नागिरी)**

महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या ग्रंथालयांत संभाजी ही कादंबरी असायला हवी. त्यामुळे पुढच्या पिढ्यांना त्यांच्या अलौकिक कर्तृत्वाची थोडीफार जाणीव होत राहील. स्वराज्याच्या दुसऱ्या छत्रपतीने मरणयातना कशा भोगल्या हे वाचताना अक्षरश: हृदयाला पीळ पडतो... आपण साई म्हणजे लेखणीचे साक्षात ईश्वर आहात.

**—चंद्रकांत परब, उपाध्यक्ष, भाजप, दहिसर**

शंभूराजांच्या वास्तव्याने व पदस्पर्शाने पावन झालेली ठिकाणे पाहण्याची उत्कट इच्छा 'संभाजी' वाचल्यावर निर्माण झाली. संगमेश्वर, मळेघाट, बहादूरगड, वढू बुद्रुक, सुधागड वगैरे ठिकाणी कसे जावे याबद्दल मार्गदर्शन हवे आहे.

**—परेश पंडित, विरार (प.)**

'संभाजी : वास्तव व अवास्तव' या शेवटी दिलेल्या टिपणातील सतरा स्पष्टीकरणात्मक मुद्द्यांमुळे संभाजीराजांबद्दलच्या गैरसमजुतींचे धुके विरून जाण्यास मदत झाली. संभाजीराजांचे नव्या प्रकाशात दर्शन घडले.

**—द्वारकाभाई पटेल, औरंगाबाद**

संभाजी वाचताना गेले सहा-सात दिवस एका आगळ्यावेगळ्या विश्वात, इतिहासात मन वावरत होते. कधी डोळे भरून येत होते, कधी मन रोमांचित होत होते, कधी हळहळत होते तर कधी क्रौर्य बघून धगधगत होते... शंभूराज. या तेजस्वी ताऱ्यावरचे मळभ दूर झाले आणि तो स्वयंतेजाने झळाळू लागला... 'संभाजी'ने मराठी साहित्यक्षेत्रात आपली राजमुद्रा उठवली आहे.

**—सौ. सुरेखा शहा, सोलापूर**






**'ज्ञानेश्वर माऊली' हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय. अनेक जाणकारांनी 'लोकसखा ज्ञानेश्वर' या वेगळ्या धाटणीच्या कादंबरीबद्दल आपली मते आवर्जून कळवली आहेत.**

'...आपली सर्वच पुस्तके वास्तव अनुभव कथन करीत असल्याने अत्यंत वाचनीय असतात. पण या सर्व पुस्तकांमध्ये तुमचे 'लोकसखा ज्ञानेश्वर' मला अधिकच आवडले आहे. कारण मला पाहिजे असलेल्या जीवनविषयक प्रश्नांची उत्तरे मला ह्या पुस्तकात मिळाली आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांवर असलेले 'बोल खंजीरेचे' आणि 'संत गाडगेमहाराज' ही दोन्ही पुस्तके मी पूर्वीच वाचली होती. पण माझ्या मनात असलेल्या प्रश्नांची उत्तरे मला त्यात मिळाली नाहीत. मात्र ते काम 'लोकसखा ज्ञानेश्वर' या पुस्तकाने केले आहे.

...ज्ञानेश्वरांचे जीवनाकडे पाहण्याचे तत्त्वज्ञान अत्यंत कमी शब्दांत पण विस्तृतपणे आपण आपल्या ह्या पुस्तकात प्रस्तुत केले आहे. अधात्म आणि विज्ञान यांची सांगड घालण्यासाठी समाजातील काही लोक धडपडत आहेत. त्यांना ह्या पुस्तकाची फार मदत होईल.

आतापर्यंत मी हे पुस्तक दोनदा वाचले आणि आता तिसऱ्यांदा वाचायला सुरुवातस केली आहे... आपल्या हातून अशाच प्रकारचे उत्तमोत्तम साहित्य निर्माण होत राहावे आणि आपणास ह्या कामासाठी दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रभुचरणी प्रार्थना!

**—प्रा. डी. जी. झिकार, कांदिवली (प.) मुंबई ६७.**

आपल्या कादंबरीतून 'लोकसखा ज्ञानेश्वरां'चं मंगल आणि भव्य दर्शन घडलं. आपली प्रासादिक आणि सोज्वळ शैली मनाला आगळावेगळा प्रगाढ आनंद देऊन जाते. आपला वेद-उपनिषदे-भागवतादी ग्रंथांचा सखोल अभ्यास आणि

त्यांचं प्रांजळ समीक्षण यांचाही प्रांजळ अनुभव प्रस्तुत कादंबरीतून आला. या कादंबरीच्या वाचनाने मला जो आनंद आणि समाधान लाभलं, त्याला तोड नाही.

...कादंबरीतील अनेक नाट्यपूर्ण प्रसंग वाचताना मन विदीर्ण होते, डोळ्यांतून अनावरपणे अश्रूधारा वाहू लागतात. शेवट वाचल्यावर तर शेक्सपिअरच्या अजरामर शोकांतिकांची आठवण तीव्रतेनं झाली. आपल्या सकस आणि समर्थ लेखणीचा हा आविष्कारही त्याच योग्यतेचा आहे... आपल्या परिश्रमाचे आणि प्रज्ञेचे मी मनापासून अभिनंदन करतो. कारण तुम्ही केवळ कादंबरी नव्हे तर एक महान ग्रंथ लिहिला आहे.

**—द्वारकाभाई पटेल (समीक्षक), औरंगाबाद**

'आजच आपली 'लोकसखा ज्ञानेश्वर' कादंबरी वाचली. कादंबरी उत्तमच आहे. सोळाव्या वर्षी 'ज्ञानेश्वरी'सारखा ग्रंथ लिहिणे हा ज्ञानदेवांच्या जीवनातील मोठाच चमत्कार आहे. हा चमत्कार कसा घडला, हा प्रश्न मलाही पडला होता. त्याचे स्पष्टीकरण आपण अतिशय समाधानकारक रीतीने दिले आहे, याचा मला आनंद झाला. आपण निसर्गप्रेमी शतकरी आणि कवी असल्यामुळे, हे आपणास सुचू शकले असावे.


या पुस्तकाच्या लेखनाच्या निमित्ताने आपणास बराच प्रवास करावा लागलेला दिसतो आहे. त्याच्या खुणा जागोजाग दिसतात. विशेष म्हणजे ज्ञानेश्वरांच्या जीवनातील तथाकथित चमत्कारांचे वास्तव स्पष्टीकरण दिले आहे ते पटण्याजोगे आणि आवश्यकही होते. सर्वच व्यक्तिरेखा ठळक आणि ठसठशीत उमटलेल्या आहेत.

संजीवन समाधीचा प्रसंग हाताळणे, हे एक आव्हानच होते. तो नाटकी किंवा कोरडा होण्याचा धोका होता. पण प्रदीर्घ जीवनाच्या आणि साहित्याच्या अनुभवाने कसदार बनलेल्या आपल्या प्रतिभेमुळे तो पुरेसा नाट्यमय आणि स्निग्ध चैतन्यमय झालेला आहे.'

**—प्रा. कमलाकर दीक्षित, कोल्हापूर**





## विश्वसाहित्यातील 'बेस्ट' — जॉन ग्रिशॅम




**जॉन ग्रिशॅम..... पाश्चात्त्य जगतातील एक नामवंत कादंबरीकार.**
**वकीलीचा व्यवसाय करणारे ग्रिशॅम यांनी लेखनाला प्रारंभ केल्यानंतर सुरुवातीच्या काळातील त्यांची 'द फर्म' ही कादंबरी अत्यंत गाजली. त्यानंतर मूळ व्यवसाय बंद करून ते पूर्णतः लेखनाकडे वळले.**
**मूळचे वकीलच असल्याने ग्रिशॅम मुख्यतः न्याययंत्रणेच्या पार्श्वभूमीवर कादंबऱ्या लिहितात. कायदा, मोठमोठ्या फर्म्स, त्यांच्यातील चुरस, अचाट बुद्धीकौशल्य, गुन्हेगारी, कृष्णकारस्थाने, कोर्टातील खळबळजनक खटले, पैशाची अतिरिक्त हाव, दहशतवाद ही ग्रिशॅम यांच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये आहेत.**


**पोस्टेज प्रत्येकी २५ रु.**




**द रेनमेकर**
**अनु. अनिल काळे**
**किंमत ३८०रु.**

**द पेलिकन ब्रीफ**
**अनु. रवींद्र गुर्जर**
**किंमत २८०रु.**




**द क्लायंट**
**अनु. माधव कर्वे**
**किंमत ३००रु.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

# वाचकांचा प्रतिसाद

## तस्लिमाने मने जिंकली

'लज्जा' कादंबरीमुळे जागतिक कीर्ती लाभलेल्या बांगलादेशीय लेखिका तस्लिमांबद्दल कमालीचे कुतूहल होते. मुस्लिम मूलतत्त्ववाद्यांनी मृत्युदंडाचे फर्मान काढल्याने देशत्याग करून त्यांना पाश्चात्य देशात आश्रय घ्यावा लागल्याने त्यांच्या जिवाच्या काळजीमुळे कुतूहल होते. मेहता पब्लिशिंग हाऊसमुळे कोल्हापूर शहरात त्यांचे आगमन झाले, ही घटनाच अपूर्व होती. साडी परिधान केलेली ही स्त्री बांगला संस्कृतीची प्रतिनिधी वाटली. त्यांचे अर्ध्या तासाचे लिखित भाषण सुलभ, प्रवाही, प्रसंगोचित, नादमधुर, चित्ताकर्षक वाटले. ज्यांना ही पर्वणी लाभली, ते नशीबवान म्हणावे लागतील. बॉडी लँग्वेज, पेहराव, सार्वजनिक ठिकाणच्या सभा-समारंभातील हालचाल व्यक्तिनुरूप भिन्न असते. तस्लिमांच्या ठायी असली प्रामाणिकपणा, सुसंस्कृत वळण, शालीनता, नम्रता, विद्वत्तेचा अपूर्व संगम दृष्टोत्पत्तीस आला. म्हणूनच तस्लिमा करवीरनगरीत आली अन् तिने इथल्या पुरोगामी वृत्तीच्या परंपरा संस्कृतीच्या माध्यमातून जपणाऱ्या शाहूनगरवासीयांच्या मनावर अधिराज्य गाजवले, असेच म्हटले पाहिजे. सुविद्य मुस्लिम व बहुजन समाजाची उपस्थिती लक्षणीय नसावी, याची खंत वाटते. इंग्रजीचा बागुलबुवा समजून अकारण धसका खाणाऱ्या बहुजनांच्या युवा पिढीने अशी संधी गमावू नये. तस्लिमासारख्या विविध क्षेत्रांतील जागतिक प्रसिद्ध व्यक्तींना मेहतांचा आदर्श बाळगून इतरांनी पाचारण करावे. नव्या करवीरसाठी त्याची गरज आहे. कार्यक्रम आखीव, नीटनेटका हा सुद्धा प्रशंसनीय पायंडा म्हणावा लागेल.

**—अप्पासाहेब करंबे-पवार, कोल्हापूर**

## बोध घ्यायला हवा

पुण्यात तसलिमा नासरिन यांचे व्याख्यान ऐकण्याचा योग आला. स्वदेशातील स्त्रियांची स्थिती सुधारावी म्हणून अन्यायी रुढींवर लेखणीद्वारे हल्ला चढविणारी ही स्त्रीविद्युल्लतेप्रमाणे तेजस्वी आहे. परागंदा जीवन जगायला लागूनही तसलिमा नासरिन यांचे देशप्रेम, मातृभूमीची ओढ मनाला चटका लावून गेली. आपल्या मातृभूमीशी साम्य असणाऱ्या कोलकत्यात काही काळ वास्तव्य करायला मिळावे



ही त्यांची भावना ऐकून स्वा. सावरकरांची जन्मठेप आठवली. त्या पार्श्वभूमीवर रोजच्या भ्रष्टाचार, अनीतीच्या बातम्या वाचून मन विषण्ण झाले. देशभक्तीची भावना नष्ट झाली की काय, अशी भीती वाटावी अशा या बातम्या असतात. तसलिमा नासरिन यांची देशभक्ती पाहून थोडातरी बोध घ्यायला हवा.

**—सौ. सरोज सोनवणे, पुणे**

## कोल्हापुरातील अनोखा कार्यक्रम

करवीनगरीत दररोज विविध कार्यकम होत असतात; पण मेहता बुक सेलर्सतर्फे आयोजित तसलिमा नासरिन यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम सुखद अनुभव देऊन गेला. कार्यक्रम अत्यंत आटोपशीर तर होताच, पण तो वेळेवर सुरू झाला. मुख्य आकर्षण होते ते प्रख्यात बंगाली लेखिका तसलिमा नासरिन. त्यांनी आपल्या आयुष्यातील विविध अनुभव व स्त्रीवर्गावर होणाऱ्या अत्याचारांचे अस्खलित इंग्रजीमध्ये विवेचन केले. विशेष म्हणजे सर्वांनी ते जीवाचा कान करून ऐकले. या अनोख्या कार्यक्रमाबद्दल सुनील व अनिल मेहता अभिनंदनास पात्र आहेत.

**—प्रा. अ. रा. जयतीर्थ, कोल्हापूर.**

नुकतीच आपण प्रकाशित केलेली काही पुस्तके वाचली. त्याबाबत हे पत्र.

सुधा मूर्ती यांचे 'वाईज अँड अदरवाईज' हे पुस्तक खूप भावले. लीना सोहोनी यांनी या पुस्तकाचा मराठी अनुवाद इतका उत्कृष्ट केलाय की मूळ पुस्तक इंग्रजीत असावे असे वाटतच नाही, तरुणांना हे पुस्तक विशेष आवडेल.


स्वाती व शैलेश लोढा लिखित 'चला उठा! कामाला लागा!' हे पुस्तकही फारच छान आहे. ते वैचारिक आहे. ह्यात बरीच बोधवाक्ये, सुवचने आहेत. अंजनी नरवणे यांनी अनुवाद उत्तम केला आहे.

विश्वास पाटील यांच्या 'संभाजी'चे साप्ताहिक सकाळ दिवाळी अंकामधील प्रकरण वाचले. त्या एका प्रकरणावरूनच त्या कादंबरीची व लेखकाची साहित्यिक उंची जाणवली. पुस्तक वाचून ती सार्थ ठरली. आपण अशी पुस्तके प्रकाशित करून फार मोठे समाजकार्य करत आहात. उत्तम पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. याबद्दल मी आपला ऋणी आहे.

**—एस. वाय. रानडे, आरवली, रत्नागिरी**

# श्रद्धांजली

### * मनोहर मारणे



पुणे येथील 'न्यू भारत बाइंडर्स'चे संचालक मनोहर मारणे यांचे १ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते.

मुळशी तालुक्यातील अंदगाव हे मारणे यांचे मूळ गाव. व्यवसायानिमित्त पुण्यात आले असता त्यांनी १९३५ साली 'भारत बुक बाईंडिंग वर्क्स'ची स्थापना केली आणि हळूहळू व्यवसायात आपला जम बसवला. १९८५ साली त्यांनी 'भारत बुक बाईंडिंग वर्क्स'चे नामकरण 'न्यू भारत बाईंडर्स' असे केले.

पुण्यातील 'मेहता पब्लिशिंग हाऊस', 'राजहंस', 'कॉन्टिनेन्टल' आदी प्रथितयश प्रकाशनसंस्थांची पुस्तके बाईंडिंगसाठी 'न्यू भारत'कडेच येत असत. 'रुचिरा', 'स्वामी', 'मृत्युंजय', 'पानिपत' सारख्या लोकप्रिय पुस्तकांची आकर्षक बांधणी 'न्यू भारत' मधूनच झाली.

अंदगाव तसेच परिसरातील अनेक सामाजिक संस्था व उपक्रमांना मारणे यांनी सदैव मदत केली. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, तीन मुली व नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### * ज्येष्ठ सारंगीवादक आणि गायक मधुकर खाडिलकर

ज्येष्ठ सारंगीवादक आणि गायक मधुकर खाडिलकर यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८६ वर्षांचे होते.

खाडिलकरांच्या पश्चात त्यांची कन्या, जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. नागपुरात पं. विनायकबुवा पटवर्धनांकडे शास्त्रीय संगीताचे पहिले धडे घेतल्यानंतर खाडिलकरांनी महंमद हुसेन खाँ यांच्याकडे सारंगीवादनाचे शिक्षण घेतले. सारंगीखेरीज संवादिनी, दिलरुबा आणि व्हायोलिन वादनाचाही त्यांनी रियाज केला.

पुणे आकाशवाणीचे 'ब' श्रेणीचे सारंगीवादक म्हणून २७ वर्षे काम केले.



हिराबाई बडोदेकर, ज्योत्स्ना भोळे, पं. भीमसेन जोशी यांच्यापासून संगीत क्षेत्रातल्या अनेक दिग्गज गायकांना खाडिलकरांनी साथसंगत केली. प्रसिद्ध नृत्यकार सुचेता चापेकर यांच्या परदेशातल्या कार्यक्रमांमध्येही त्यांचा सहभाग होता. गांधर्व महाविद्यालयाचा 'संगतकार' पुरस्कारासह अनेक सन्मान त्यांना मिळाले होते.

### * बालसाहित्यिक राजा मंगळवेढेकर

ज्येष्ठ बालसाहित्यिक राजा मंगळवेढेकर (वय ८१) यांचे १ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मंगळवेढेकर यांचा जन्म ११ डिसेंबर १९२५ रोजी पंढरपूर येथे झाला. तेथेच त्यांनी कला शाखेची पदवी संपादन केली. त्यानंतर स्वातंत्र्यलढ्यातही त्यांनी भाग घेतला. राष्ट्र सेवा दल, आंतरभारती, सानेगुरुजी कथामाला आदी सांस्कृतिक कार्यांशी त्यांचा निकटचा संबंध होता. सानेगुरुजींच्या प्रेरणेतूनच त्यांनी मुलांसाठी सुमारे २०० पुस्तके लिहिली. त्यात गोष्टी, गाणी, नाटके, चरित्रे, पत्रे, विज्ञान, निसर्ग आदी साहित्याचा समावेश आहे. 'अटकळ', 'चतुराई', 'बनवाबनवी' ही बालनाट्ये, 'आपले वनमित्र', 'गृहमित्र', 'आभाळमित्र', 'पुष्पमित्र', 'हिरवे सोबती ही निसर्ग परिचयमाला; तसेच 'प्रियदीपा' व 'प्रिय सौमित्र' हे त्यांचे पत्रसंग्रह गाजले. सानेगुरुजींची जीवनगाथा हे सानेगुरुजींचे चरित्र, तसेच मित्रायनमः, मित्राय मोनमो, मित्र देवो भवः या पुस्तकातून त्यांनी अनेक व्यक्तींचा परिचय करून दिला. १९८५ मध्ये पुण्यात भरलेल्या बालकुमार साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. तसेच, गेली ५० वर्षे महाराष्ट्रभर हिंडून त्यांनी खास मुलांसाठी कथाकथन केले.

राजाभाऊंना १९९५ मध्ये अखिल भारतीय सानेगुरुजी कथामालेचा बालसेवा, पुरस्कार तसेच कोपरगाव येथील स्वातंत्र्यसैनिक मामा गवारे फाउंडेशनचा बाल आनंद पुरस्कार, १९९७ मध्ये प्रा. बाबूराव शिरोळे बालसाहित्य पुरस्कार, फुलराणी थिएटरचा पंडित जवाहरलाल नेहरू स्मृती पुरस्कार आणि १९९९ मध्ये गदिमा पुरस्कार, असे अनेकविध सन्मान प्राप्त झाले होते.

### * 'हमलोग', 'बुनियाद'चे लेखक मनोहर श्याम जोशी

नावीन्यपूर्ण आणि प्रचंड लोकप्रिय ठरलेल्या दूरचित्रवाणी मालिकांचे लेखक, प्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि पत्रकार मनोहर श्याम जोशी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने ३० मार्च रोजी नवी दिल्ली येथे निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते.

'हमलोग', 'बुनियाद' सारख्या नावीन्यपूर्ण मालिकांद्वारे त्यांनी भारतीय दूरचित्रवाणीवर 'सोप ऑपरा'चे नवे पर्व सुरू केले होते.

मनोहर श्याम जोशी यांच्या मागे पत्नी आणि तीन मुलगे आहेत. उत्तरांचलमधील

अलमोडा येथे जन्मलेल्या जोशी यांनी ८० च्या दशकात ‘हमलोग’ मालिकेद्वारे भारतीय दूरचित्रवाणीची प्रतिमाच बदलली. त्यांनी लिहिलेली ‘हमलोग’ मालिका भारतीय दूरचित्रवाणीवरील पहिली कौटुंबिक मालिका होती. तिला प्रचंड लोकप्रियता मिळाली होती. ‘बुनियाद’, ‘कक्काजी कहीन’, ‘मुंगेरीलाल के हसीन सपने’, ‘जमीन असमान’, ‘गाथा’ या मालिकांद्वारे नवा इतिहास लिहिणाऱ्या जोशी यांनी बॉलिवूडलाही योगदान दिले होते. ‘हे राम’, ‘अप्पू राजा’, ‘पापा कहते है’ आणि ‘भ्रष्टाचार’ अशा वेगळ्या पठडीतील चित्रपटांचे ते लेखक होते. ‘कया’, ’कुरू कुरूस्व:’, ‘बातों बातों में’ अशी काही प्रसिद्ध पुस्तकेही त्यांनी लिहिली आहेत. गेल्या वर्षीच त्यांना साहित्य अकादमी पुरस्काराने गौरविण्यात आले होते. हिंदुस्तान टाइम्स समूहाचे हिंदी साप्ताहिक ‘हिंदुस्तान’ याचे ते संपादक होते. हिंदी ‘आऊटलूक’चेही ते नियमित सदरलेखक होते.

*** माजी ग्रंथालय संचालक कृष्ण उजळंबकर**

राज्याचे माजी ग्रंथालय संचालक आणि ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. कृष्ण मुकुंद उजळंबकर (वय ८२) यांचे १२ एप्रिल रात्री हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुली दोन मुलगे व नातवंडे असा परिवार आहे.

डॉ. उजळंबकर हैदराबादमध्ये नोकरी करीत असताना ‘ग्रंथालय’ नावाचे मासिक हिंदी व इंग्रजीतून चालविले. हैदराबाद ग्रंथालय संघाचे संस्थापक, भारतीय ग्रंथालय संघाचे उपाध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी सांभाळल्या. पुण्याच्या शासकीय विभागीय ग्रंथालयात कार्यरत असताना त्यांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले. ‘ग्रंथालयाची पाच सूत्रे’, ‘मराठवाड्याचे मानकरी’, ‘गाठ हिमालयाशी आहे’, ‘आम्ही असे लढलो’, ‘पाचामुखी परमेश्वर’, ‘आम्ही लढाई जिंकली’, ‘प्रतिभा’, ‘अभय’ असे विपुल साहित्य लेखन त्यांनी केले.

*** ‘केतकरवहिनी’ काळाच्या पडद्याआड**

कायद्याच्या लढाईत पतीचा मृत्यू झाल्यावर प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आयुष्यभर एकाकी लढा देणाऱ्या कोकणातील करंबवण्याच्या ‘केतकरवहिनी’ची रोमहर्षक कथा सांगणारे मेहता पब्लिशिंग हाऊसचे त्याच नावाचे पुस्तक सध्या गाजते आहे. त्यातील स्वाभिमानी तसेच कर्तृत्ववान नायिका असणाऱ्या मालतीबाई माधवराव केतकर या चार एप्रिल रोजी काळाच्या पडद्याआड गेल्या. पण या पुस्तकामुळे त्यांना भेटण्याची इच्छा असणाऱ्या असंख्य चाहत्यांना मात्र चुटपूट लागून राहिली! प्रसिद्ध डेंटिस्ट डॉ. राम काळे आणि प्रसिद्ध लेखक-समीक्षक डॉ. द. दि. पुंडे यांच्या त्या सासू होत. ‘केतकरवहिनी’ गेली तीन वर्षे पुण्यातच स्थायिक झाल्या होत्या.



# बालनगरी

**पुस्तक हातात धरा आणि थोडेसे फिरवा**
**आता चक्र फिरू लागले की नाही?**
**नाही? मग तुमचे डोळे तरी नक्कीच फिरू लागले असतील!**

बालनगरी

# खरा दानशूर कोण?

महाभारतामध्ये घडलेला हा एक प्रसंग आहे. एकदा श्रीकृष्ण व अर्जुन यांचा खरा दानशूर कोण या विषयावर वादविवाद चालू होता. अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारले, ‘श्रीकृष्ण, तुझ्या मतानुसार आम्हा सर्व कौरव-पांडवांमध्ये खरा दानशूर कोण आहे?’

श्रीकृष्ण म्हणाला, ‘अर्जुना, तुम्हा कौरव-पांडवांपेक्षा महारथी कर्ण हा सर्वात अधिक दानशूर आहे.’

अर्जुनाला श्रीकृष्णाचे हे उत्तर फारसे पटले नाही. कृष्णाचे मत एक ना एक दिवस आपण चुकीचे ठरवू असा निश्चय मनात बाळगून अर्जुन शांत बसला.

या गोष्टीनंतर काही काळ लोटला. एक दिवस एक ब्राह्मण अर्जुनाकडे आला व त्याला म्हणाला, ‘महाराज



नुकतेच माझ्या पत्नीचे निधन झाले आहे. आणि तिच्या शेवटच्या इच्छेनुसार तिचा अंत्यविधी केवळ चंदनाच्या लाकडातच करावयाचा आहे. मी पडलो गरीब. त्यामुळे चंदनाची लाकडे विकत घेऊ शकत नाही. आपण कृपा करून मला चंदनाची लाकडे मिळवून द्यावी.’

त्या ब्राह्मणाची अर्जुनाला दया आली. आपण या ब्राह्मणाची मदत केली पाहिजे असे त्याला वाटले. त्याने आपल्या सचिवाला बोलावले.

सचिव आल्यावर अर्जुन म्हणाला, ‘या ब्राह्मण महाराजांना जितकी चंदनाची लाकडे लागतील तेवढी आपल्या आगारातून देऊन टाका, ताबडतोब!’

पण सचिवाने अर्जुनाची क्षमा मागितली व तो म्हणाला, ‘महाराज, सध्या आपल्या आगारात एकही चंदनाचे लाकूड नाही. इतकेच काय बाजारातसुद्धा चंदनाचे लाकूड मिळणे अशक्य झाले आहे. त्यामुळे

नाही.’

सचिवाचे बोल ऐकून अर्जुनाचाही नाइलाज झाला व त्याने चंदनाच्या लाकडाची मदत न करू शकल्याबद्दल ब्राह्मणाकडे दिलगिरी व्यक्त केली.

त्याच सायंकाळी श्रीकृष्ण व अर्जुन बागेतून फेरफटका मारत असताना तोच ब्राह्मण अर्जुनाला दिसला. त्याच्या हातात चंदनाच्या लाकडांचे नक्षीदार ओंडके होते. अर्जुनाने हाक मारून त्या ब्राह्मणाला जवळ बोलावले व म्हटले, ‘हे ब्राह्मणदेव, तुम्हाला ही लाकडे कोठून मिळाली, कोणी दिली?’

ब्राह्मण म्हणाला, ‘हे अर्जुना, महारथी कर्णाने मला ही लाकडे मिळवून दिली.’

‘पण चंदनाच्या लाकडांचा साठा संपलेला असताना कर्णाकडे ही कुठून आली?’ अर्जुनाने आश्चर्याने विचारले.

ब्राह्मण म्हणाला, ‘अर्जुना, कर्णाकडेही चंदनाची लाकडे नव्हती, पण त्याच्या महालात चंदनाच्या लाकडांनी बनवलेले दार, खिडक्या तसेच पलंग होते; त्याने आपल्या सेवकांना बोलावून त्यांचे लाकूड माझ्या हवाली केले.

ब्राह्मणाकडून हे सर्व ऐकताच अर्जुन खूप खजील झाला.

शेजारी असलेला श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणाला, ‘पाहिलेस ना अर्जुना! कर्णच खरा दानशूर आहे तो!’



**खास बालमित्रांसाठी आमची सोप्या वैज्ञानिक प्रयोगांची पुस्तके**




घरातल्या निरुपयोगी वस्तू वापरून वैज्ञानिक उपकरणे कशी करावी, याचे मार्गदर्शन करणारे पुस्तक.

**छंदातून विज्ञान**

**डी. एस्. इटोकर**

किंमत ६०रु.




या पुस्तकातून वैज्ञानिक प्रयोगांची केवळ माहितीच दिली नसून, ते कसे करावेत हे सुद्धा सांगितले आहे.

**डी. एस्. इटोकर**

किंमत १००रु.

**वाचनातून विज्ञान**




अगदी सहज, सोपे, मुलांना आवडतील असे विज्ञान प्रयोग.

**विज्ञान गमती**

**डॉ. अरुण मांडे**

किंमत ५०रु.

पोस्टेज प्रत्येकी २० रु.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.**

**बोधकथा**

# चित्रकाराचे चातुर्य

इसवी सनाच्या सोळाव्या शतकात अफगाणिस्तानमध्ये अब्दुलशाह नावाचा सुलतान होऊन गेला. सुलतान म्हणजे संपूर्ण देशाचा राजा. तो खूप क्रूर आणि जुलमी होता. एका लढाईत त्याने आपला डावा डोळा गमावला होता. त्यामुळे आपल्या विद्रूप चेहऱ्याचा त्याला काहीसा राग येत असे.

ए क दा सुलतानाला आपले चित्र काढून घेण्याची हुक्की आली. त्याच्या राज्यातील तीन नामवंत चित्रकारांना त्याने राजवाड्यात बोलावले आणि आपले चित्र काढण्याचा हुकूम दिला.

पहिल्या चित्रकाराने चित्र काढताना सुलतानाचा आहे तसा चेहरा काढला. एका डोळ्याने आंधळा असलेला आपला चेहरा त्याला मुळीच आवडला नाही. त्यामुळे या चित्रकाराला त्याने देश सोडून जाण्याची आज्ञा केली.

दुसऱ्या चित्रकाराने हा सर्व प्रकार पाहिलेलाच होता. त्याने सुलतानाचे चित्र काढताना त्याचे दोन्ही डोळे चांगले दाखवले. सुलतानाला याचाही राग आला. हा चित्रकार आपल्याला जाणीवपूर्वक खूष करतो आहे असे वाटून सुलतानाने त्यालाही देशाबाहेर हाकलले.

तिसरा चित्रकार अधिक चतुर होता. त्याने सुलतानाचे चित्र काढताना चेहऱ्याची उजवी बाजूच दाखवली. कारण त्याचा उजवा डोळाच चांगला होता.

ते चित्र पाहताच सुलतान एकदम खूष झाला. चित्रकाराच्या प्रतिभेचे त्याला खूप कौतुक वाटले आणि मोठे बक्षीस घेऊन सुलतानाने चित्रकाराचा सन्मान केला.


**तात्पर्य : प्रसंगावधान राखून मार्ग काढला तर नक्कीच यश मिळते.**

## मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी मार्गदर्शक पुस्तके


वाढती स्पर्धा, होमवर्कचा दबाव, मानसिक ताणतणाव, अपुरा खेळ, टि. व्ही. चे आक्रमण, सतत खचणारा सांस्कृतिक पाया अशा सर्व अडथळ्यातून मुलांचे व्यक्तिमत्त्व कसे जोपासावे अन् पालकत्वाची जबाबदारी यशस्वीपणे कशी पार पाडावी? याचा साध्या सोप्या भाषेत मूलमंत्र देणारी अत्यंत मार्गदर्शक पुस्तके ही पुस्तके आपल्या संग्रही असलीच पाहिजेत.

**असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व**

डॉ. रमा मराठे




१२० रु.




**मुलांच्या समृद्ध जीवनासाठी**

डॉ. सुचित तांबोळी

१५० रु.


**आपल्या मुलांच्या यशस्वितेचा कानमंत्र**

अनंत पै

अनु. प्रशांत तळणीकर




८० रु.




**पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र**

संजीव परळीकर

७० रु.



## बालमित्रांसाठी 'हॅरी पॉटर' आता मराठीत...




**हॅरी पॉटर आणि परिस**

जे. के. रोलिंग

अनुवाद : बाळ उर्ध्वरेषे


**किंमत १६५ रु.**

## 'खास मुलांची' सुंदर चित्रांची रंगीत पुस्तके


**उमा खरे**




गंपू चिंपू आणि इतर कथा




मैत्रीचे मोल आणि इतर कथा




सिंड्रेला आणि इतर कथा

किंमत प्रत्येकी ३० रु.

एकत्रित पोस्टेज २० रु.

# बाल/कुमारवाङ्मय

| | | |
|---|---|---|
| **पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील रोचक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील प्रेरक गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **पंचतंत्रातील बोधपर गोष्टी** | अनिल किणीकर | २५ |
| **हितोपदेश : बोधप्रद कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : मनोरंजक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : प्रेरक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **हितोपदेश : रोचक कथा** | मोहन वेल्हाळ | २० |
| **जातक कथा : मनोरंजक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : प्रेरक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : रोचक** | निर्मला सारडा | २५ |
| **जातक कथा : शिक्षाप्रद** | निर्मला सारडा | २५ |
| **लाजवाब बिरबल** | निर्मला सारडा | २५ |
| **विनोदवीर बिरबल** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाचे चातुर्य** | निर्मला सारडा | २५ |
| **बिरबलाच्या रोचक गोष्टी** | निर्मला सारडा | २५ |
| **शेखचिल्लीचे किस्से** | निर्मला सारडा | २५ |
| **तेनालीरामचे चातुर्य** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीरामच्या रोचक गोष्टी** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीराम विनोदवीर** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **तेनालीरामच्या मनोरंजक कथा** | मंजूषा आमडेकर | २५ |
| **मन्नो** | मंजूषा आमडेकर | २५ |
| मोठ्यांच्या छोट्या गोष्टी | माधव मोर्डेकर | ३० |







# चित्रमय रंगतदार कथा

| | | |
|---|---|---|
| **टिंबक टू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **चतूर बोकोबा आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **नशीबवान शेखर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **सुंठ बिस्किटाचा माणूस आणि इतर कथा** | चारुता पुराणिक | ३० |
| **निद्राराणी आणि इतर कथा** | विजया देशपांडे | ३० |
| **जादूचं खीरपात्र आणि इतर कथा** | अरुंधती पंडित | ३० |
| **गम्मत गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **धमाल गोष्टी** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **मजेदार लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **आदर्श लोककथा** | मंजूषा आमडेकर | ३० |
| **बुडबुड्यांचे विमान आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **चालणारा हिमपुतळा आणि इतर गोष्टा** | अर्चना ओक | ३० |
| **छोटुसा पांढरा ससुकला आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **छोटू किल्लीवाला उंदीर आणि इतर गोष्टी** | अर्चना ओक | ३० |
| **लोखंड खाणारे उंदीर आणि इतर कथा** | वृषाली पटवर्धन | ३० |
| **गंपू चिंपू आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **मैत्रीचे मोल आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |
| **सिंड्रेला आणि इतर कथा** | उमा खरे | ३० |



**बालमित्रांनो,** आपल्या सर्वांनाच निरनिराळ्या प्रकारची कार्टून्स खूप आवडत असतात. मग ती टी. व्ही. वर दाखवली जाणारी असो किंवा एखाद्या बालमासिकातून येणारी असो; अशी काही कार्टून्स खूप लोकप्रियही झाली असे मिकी माऊस, मोगली, फास्टर पेुणे, स्पायडरमॅन, सुपरमॅन इत्यादी.

या अंकापासून अशा लोकप्रिय कार्टून्सची संपूर्ण माहिती आपल्याला वाचायला मिळेल. ते कार्टून सर्वप्रथम कोणी शोधले? त्याचा जगभर प्रसार कसा झाला? इ.


चला तर मग, आज सुरुवात करुया 'पिंगु' पेंग्वीन पासून...!

## पिंगु - पेंग्वीन

पेंग्वीन या समुद्राकाठी आढळणाऱ्या पक्षाला जगभर प्रसिद्धी मिळाली, ती त्याच्या कार्टूनमुळे. १९८० साली युरोपातील स्वित्झर्लंड देशात तेथील 'स्वीस टी.व्ही'ने 'पिंगु' नावाचा पेंग्विन कार्टून तयार केला. आणि तो आपल्या कार्यक्रमातून दाखवण्यास सुरुवात केली. त्या कार्यक्रमात 'पिंगु'च्या गमतीजमती दाखवण्यात युत असत. कोणताही संवाद नाही, केवळ पार्श्वसंगीताच्या आधारावर चालणाऱ्या 'पिंगुच्या' गमतीजमती चांगल्याच लोकप्रिय झाल्या. जगभरातल्या सर्व 'बालमित्रांना' हा कार्यक्रम तुफान आवडला.

पिंगु, त्याची लहान बहीण पिंगा, आणि पिंगुचा मित्र रॉबी, असे तिघेजण मिळून काय धमाल उडवतात, हे या मालिकेच्या प्रत्येक भागात दाखवण्यात येते. अगदी पाच वर्षाच्या मुलालाही सहज समजेल अशा छान छान गमतीजमती या कार्यक्रमात दाखवण्यात येतात.

### ओळखा पाहू कोण हे?



हे छायाचित्र आहे एका जगप्रसिद्ध शास्त्रज्ञाचे. हे शास्त्रज्ञ कोण आणि त्यांनी कोणता शोध लावला या प्रश्नाचे उत्तर आम्हाला पत्राद्वारे लगेच कळवा.

# आश्चर्यचकीत करणारी भाषेची काही वैशिष्ट्ये

- आज संपूर्ण जगात एकूण दोन हजार सातशे (२,७००) भाषा बोलल्या जातात तसेच त्या भाषांवर आधारित ७,००० उपभाषादेखील वापरात आहेत.

- 'बॉस्क्यू' ही जगातील सर्वात अवघड भाषा मानली जाते. 'स्पेन' व 'फ्रान्स' या देशांमधील काही भागात ही भाषा बोलली जाते. ही भाषा जगातल्या कुठल्याही भाषेशी संबंधित नाही. या भाषेत इतर कुठल्याही भाषेपेक्षा सर्वाधिक किचकट व गुंतागुंतीची वाक्यरचना आहे.

- अफ्रिका हा एकमेव असा खंड आहे, की जेथे एक हजार पेक्षा अधिक वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात.

- भारत हा एकमेव असा देश आहे की जेथे वेगवेगळ्या भाषा बोलल्या जातात.

- उत्तर अफ्रिकेतील जे 'न्हावी' आहेत त्यांच्या व्यवसायाची एक स्वतंत्र अशी भाषा आहे. विशेष म्हणजे त्यांची भाषा लेखी स्वरूपात उपलब्ध नाही.